वर्ष ११ वें अंक ३ रा

२१ फेब्रुवारी १९६०

# संजीवन

जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

1960

To know is good,
to live is better,
to be, that is perfect.

१९६०

जाणणें हें चांगलें,
आचरणें हें अधिक चांगलें,
तेंच होणें हें पूर्णत्व आहे.


-- श्रीमाताजी

वर्ष ११ अंक ३ रा

२१ फेब्रुवारी १९६०

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संपादकः

भालचंद्र लिमये

**संजीवन कार्यालय**

श्रीअरविन्द आश्रम, पाँडीचेरी

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ प्रार्थना आणि ध्यान | श्रीमाताजी | ३ |
| २ मातृवाणी | श्रीमाताजी | ६ |
| ३ गीतेचा संदेश | श्रीअरविन्द | ९ |
| ४ श्रीअरविंदांचा योग, तत्त्वज्ञान व आश्रम | मा. पुं. पंडित | १३ |
| ५ ज्योतिषां ज्योतिः । | गजराज | २१ |
| ६ आर्य | श्रीअरविंद | २६ |
| ७ श्रीमाताजींचीं प्रवचनें | श्रीमाताजी | २९ |
| १ साधनेचा संकल्प | | |
| २ दिव्य कुटुंब | | |
| ८ लिहिण्याच्या पद्धतींमध्यें फरक कां ? | श्रीअरविंद | ३४ |
| ९ स्वतंत्र विचारक्षमता | श्रीअरविंद | ३६ |
| १० अडचणींमध्यें असतांना | श्रीअरविंद | ४० |
| विद्यार्थी विभाग :— | | |
| ११ प्रेरक पत्रें (२) | नलिनीकांत गुप्त | ४२ |
| १२ चंद्रगुप्त व अशोक | नलिनीकांत गुप्त | ४४ |
| १३ सर्वांगीण विकासासाठीं | 'बुलेटिन' वरून | ५१ |
| १४ साहित्य-सत्कार | | ५३ |
| १५ आश्रम-वृत्त | | ५४ |


**वार्षिक वर्गणी—यथाशक्ति**

---


संपादक—भालचंद्र लिमयें.

प्रकाशक—'संजीवन कार्यालय', श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.

मुद्रक—श्रीअरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी.

55/1/60/850



THE MOTHER

वर्ष ११ अंक ३ रा

२१ फेब्रुवारी १९६०

# संजीवन



**तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,**
**देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलो.**

**ऋग्वेद–१. ५०. १०**

## प्रार्थना आणि ध्यान

१५ मार्च १९१४

माझ्या विचारांत तूं ओतप्रोत भरून राहिला आहेस, माझें हृदय, तसेंच माझें समग्र अस्तित्व तुझ्या सान्निध्यानें भारून, भरून गेलें आहे; शांति अधिकाधिक वाढत राहिली आहे. या शांतीमुळें कांहीं विशेष आणि अमिश्र सुख, प्रशांत प्रसन्नता निर्माण झाली आहे. ती विश्वव्यापी असून तुझ्यासमीप घेऊन जाणाऱ्या अथांग गभीरतेप्रमाणें प्रतीत होत आहे.

या नीरव आणि पवित्र रात्री ! अशा रात्रीच्या समयींच माझें ओथंबलेलें हृदय तुझ्या दिव्य प्रेमाशीं तादात्म्य पावत आहे. वस्तुमात्राशीं एकरूप होऊन जाण्यासाठीं, अखिल जीवनास आलिंगण्यासाठीं, सर्व विचारांना पुनर्जागृत करण्यासाठीं, सकल भावना विशुद्ध करण्यासाठीं, तुझ्या अद्‌भुत सान्निध्याची आणि परिणामतः उदित होणाऱ्या अवर्णनीय शांतीची जाणीव प्राणिमात्रांत जागृत करण्यासाठीं, माझें हृदय तुझ्या दिव्य प्रेमाशीं समरस होत आहे.

हे प्रभो, असें वरदान दे कीं, ही चेतना आणि ही शांति आमच्यामध्यें सतत वाढत जाईल आणि त्यामुळें तुझ्या दिव्य आणि एकमेव आज्ञापूर्तीचें आम्ही अधिकाधिक खरें एक-निष्ठ माध्यम बनूं.

*

१८ मार्च १९१४

तूं पूर्ण ज्ञान आहेस, केवल चेतना आहेस, जी व्यक्ति तुझ्याशीं तादात्म्य पावते, ती त्या एकरूपत्वाच्या स्थितींत सर्वज्ञ असते. परंतु ही अवस्था प्राप्त होण्यापूर्वींहि ज्या व्यक्तीनें खऱ्याखुऱ्या अंतःकरणपूर्वकतेनें, आपल्या जागृत इच्छाशक्तीसह, स्वतःचें तुला समर्पण केलेलें असतें, स्वतःमध्यें आणि आपल्या स्वतःच्या प्रभावाच्या परिसरांत तुझ्याच दिव्य प्रेममय नियमनाचा आविर्भाव आणि विजय होण्यास मदत व्हावी म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निश्चय केलेला असतो, त्या व्यक्तीला स्वतःच्या जीवनांत सर्व कांहीं बदललेलें दिसतें; सर्व घटनांमध्यें तुझ्याच आज्ञेची अभिव्यक्ति होत असून, त्यामुळें समर्पण अधिक सहजसुलभ होत असल्याचें त्या व्यक्तीला आढळून येतें; तिच्या बाबतींत जें कांहीं घडतें, तें नेहमीं सर्वोत्कृष्ट असतें; तिच्या आकलनामध्यें कांहीं अस्पष्टता असेल, एकादी अज्ञानमय इच्छा बाकी असेल, तर ही वस्तुस्थिति जाणण्यास ती व्यक्ति कधीं कधीं तात्पुरती असमर्थ बनते. परंतु कालांतरानें तिच्या हें लक्षांत येतें कीं, एक दयाळु शक्ति तिचें रक्षण करीत होती, तिच्या स्वतःपासूनहि तिचें संरक्षण करीत होती आणि तिच्या विकसनासाठीं, तिच्या आमूलाग्र रूपांतरासाठीं, तिचें संपूर्ण परिवर्तन होऊन, तिचा साधन म्हणून उपयोग व्हावा यासाठीं अनुकूल आणि सर्वोत्तम अशी परिस्थिति ती शक्ति निर्माण करून देत होती.

या बाबतींत जेव्हां आम्हांला जाणीव होते व आमची खात्री पटते, त्यावेळीं भावी परिस्थितीविषयीं किंवा घटनांविषयीं, घटनांच्या बदलत्या स्वरूपाविषयीं आम्हांला यत्किंचितहि चिंता रहात नाहीं; आम्हांला त्या त्या क्षणीं जें सर्वांत योग्य असें वाटतें, तें आम्ही संपूर्ण शांत चित्तानें करीत रहातो; आम्हांला त्यावेळीं ही खात्री असते कीं, आमच्या मर्यादित बुद्धीनें जो काय परिणाम अपेक्षित केलेला असेल तो घडून आला नाहीं, तरी जो काय परिणाम होईल तो योग्य व उत्तमच असेल.

हे प्रभो, म्हणूनच आमचें हृदय आम्हांला भाररहित वाटत आहे आणि आमच्या विचारामध्यें आम्हांला विश्रांत-स्थिति अनुभवास येत आहे. याचमुळें संपूर्ण विश्वासानें आम्ही तुझ्याकडे वळत आहोंत आणि शांत चित्तानें म्हणत आहोंत—

"तुझीच इच्छा पूर्ण होऊं दे, तिच्यामध्येंच खरी समस्वरता सामावलेली आहे."

★

१९ मार्च १९१४

हे प्रभा, हे सनातन गुरो, तुला आम्ही कोणतेंच नांव देऊं शकत नाहीं किंवा तुला आम्ही समजूंहि शकत नाहीं; पण क्षणोक्षणीं तुझी अधिकाधिक प्राप्ति करून घ्यावी अशी इच्छा आम्ही धरतो. हे प्रभो, आमची बुद्धि उज्ज्वलित कर, आमचीं हृदयें उद्भासित कर, आमची चेतना रूपांतरित कर. सर्व शांति आणि सकल सुख यांचें उगमस्थान असलेल्या तुझ्या दिव्य आणि विशुद्ध प्रेमाचा आश्रय घेतां यावा म्हणून प्रत्येक मनुष्य त्याच्या खऱ्या जीवनाविषयीं जागृत होऊं दे आणि अहंकार व त्याचे अनुयायी दुःख-कष्ट यांच्या तावडींतून तो सुटूं दे. तुझ्या अस्तित्वानें ओथंबलेलें माझें हृदय अनंततेपर्यंत विस्तृत झाल्यासारखें वाटत आहे आणि तुझ्या सान्निध्यानें तेजोमय झालेली माझी बुद्धि एकाद्या तेजस्वी

शुभ्र हिऱ्याप्रमाणें लकाकत आहे. तूं एक अद्‌भुत जादुगार आहेस. तूं सर्व कांहीं बदलून टाकतोस, कुरूपतेंतून सौंदर्य, अंधःकारांतून प्रकाश, कर्दमांतून निर्मल जल, अज्ञानांतून ज्ञान आणि अहंकारांतून सद्‌हृदयता तूं निर्माण करतोस.

तुझ्या ठायीं, तुझ्या द्वारां, तुझ्याचकरतां आम्ही जगतों आणि तुझी आज्ञा हीच आमच्या जीवनाची सर्वश्रेष्ठ स्वामिनी आहे.

तुझीच इच्छा सर्वत्र पूर्णतेस जाऊं दे, समस्त पृथ्वीवर तुझ्याच शांतीचें साम्राज्य पसरूं दे.

*

२० मार्च १९१४

तूं चित्-शक्ति आणि प्रकाश आहेस, सर्वांच्या हृदयगाभाऱ्यांत वसणारी शांति तूंच आहेस, रूपांतर करणारें दिव्य प्रेम आणि सर्व अंधःकारावर विजय मिळविणारें ज्ञान तूं आहेस. तुझी अनुभूति प्राप्त करण्यासाठीं आणि तुझी आंस धरण्यासाठींहि अवचेतनेच्या विशाल व गहन सागरांतून आम्ही प्रथम बाहेर आलेलें असलों पाहिजे; स्वतःचें ज्ञान करून घेऊन, स्वतःचें तुला समर्पण करण्यासाठीं आम्हांला एक विशिष्ट पैलूदार आकार, व्यक्तिवैशिष्टच, विशिष्ट घटितपणा आलेला असला पाहिजे; कारण अशा तऱ्हेनेंच केवळ, आमचें आत्मदान घेण्याचा ज्याचा खरा अधिकार आहे त्याला आमच्या स्वचें आम्हीं समर्पण केल्यासारखें होईल. वास्तविक व्यक्तिवैशिष्टच साध्य करण्यासाठीं व या मध्यंतरीच्या अस्ताव्यस्त अवस्थेंतून बाहेर पडण्यासाठीं कितीतरी प्रयत्नांची आणि संघर्षाची जरूरी आहे; आणि हें व्यक्तिवैशिष्टच साध्य झाल्यानंतरहि स्वतःचें आत्मदान करण्यासाठीं, स्वतःचें समर्पण करण्यासाठीं आणखी कितीतरी कष्ट आणि प्रयास घ्यावे लागतात, संघर्ष करावे लागतात !

हे प्रयत्न करण्यास फारच थोडद्या व्यक्ती स्वखुषीनें तयार असतात. म्हणूनच आपल्या अदृष्ट क्रूरतेनें मानवाचें जीवनच मानवांना त्यांच्या इच्छेविरुद्धहि हे प्रयत्न करावयास भाग पाडतें; अन्यथा त्यांना तें शक्यच नसतें; आणि नंतर सर्व अडथळे, बाधा व अडचणी असूनहि तुझ्या कार्याची परिपूर्ति होऊं लागते.

—श्रीमाताजी

---

श्रीअरविंद आपणांस हें सांगावयास आले कीं, "सत्य-शोधनासाठीं जग सोडण्याची गरज नाहीं, आत्म-शोधासाठीं जीवन सोडण्याची जरुरी नाहीं, भगवंताशीं संलग्न होण्यासाठीं जगाचा त्याग करण्याची किंवा केवळ मर्यादित श्रद्धाविषय असण्याची आवश्यकता नाहीं. भगवंत हा सर्वत्र आहे, सर्वांठायीं आहे; आणि तो लपल्यासारखा वाटत असेल, तर त्याला कारण हेंच आहे कीं, भगवंताला शोधून काढण्याचे कष्ट आपण घेत नाहीं."

—श्रीमाताजी.

# मातृवाणी

(मागील अंकावरून पुढें)

**"तर मग खरें स्वातंत्र्य असें नाहींच कां? प्रत्येकच गोष्ट, आपलें स्वातंत्र्यदेखील पूर्वीच ठरून गेलेलें असतें काय? आणि शेवटीं प्रारब्धवाद हेंच सर्वश्रेष्ठ गुह्य सत्य आहे काय?"**

स्वातंत्र्य आणि दैववाद, अनिर्बंधता आणि पूर्वनियोजितता या सत्यस्थिति असून, चेतनेच्या भिन्न भिन्न थरांवर त्यांचें कार्य चालू असतें. या दोन्ही गोष्टी एकाच थरावर आहेत असें अज्ञानामुळें मन मानतें आणि एक दुसरीच्या विरोधी आहे असा समज करून घेतें. चेतना ही सर्वत्र सारख्या स्वरूपाची अशी वस्तु नाहीं; ती संमिश्र, संकीर्ण आहे. एकाद्या सपाट मैदानासारखी ती नाहीं, तर तिला अनेक परिमाणें आहेत, ती विविध-परिमाणयुक्त (Multi-dimensional) आहे. परमोच्च पातळीवर परब्रह्म आहे, तर अगदीं खालच्या टोंकाला जड पृथ्वी-तत्त्व आहे; आणि या नीचतम व उच्चतम थरांच्यामध्यें चेतनेच्या अनंत श्रेणी आहेत.

जड पृथ्वी-तत्त्वाच्या पातळीवर आणि जाणिवेच्या सर्वसामान्य थरावर तुम्ही सर्व बाजूंनीं जखडलेले असतां. निसर्गाच्या यांत्रिक कार्यपद्धतीचे गुलाम बनवन, तुम्हांला कर्माच्या सांखळीनें बांधून टाकलेलें असतें; आणि असें तुम्ही जखडलेले असतांना जें जें घडतें, तें सारें त्यापूर्वी घडलेल्या घटनांचा परिणामच असतें. आपण कांहीं स्वतंत्रपणें करत आहोंत, असा तुम्हांला एक भ्रम असतो. वास्तविक जें इतर करीत असतात, त्याचीच तुम्ही पुनरावृत्ति करीत असतां; निसर्गाच्या ज्या जगत्-व्यापी क्रिया चाललेल्या असतात, त्याचीच री तुम्ही ओढत असतां. निसर्गाच्या विश्वव्यापी यंत्राच्या अप्रतिहत चक्रावर बसून, असहायपणें गिरक्या मारण्याचें तुमचें काम चालू असतें.

पण असेंच चालूं रहाण्याची गरज नाहीं. इच्छा असल्यास तुम्हांला तुमचें स्थान बदलतां येतें. खालच्या थरावर निसर्गाच्या यंत्रांत चिरडून जाण्याऐवजीं किंवा एकाद्या बाहुलीप्रमाणें निसर्गाच्या सूत्रानें हलविलें जाण्याऐवजीं, वरच्यावरच्या पातळींवर चढून जाऊन, तुम्हांला तेथून सर्व कांहीं पहातां येईल; एवढेंच नव्हे तर तुमच्या जाणिवेच्या पातळींत बदल करून, तुम्ही असें एकादें साधन मिळवूं शकाल, कीं ज्याच्या साह्यानें वरवर अटळ भासणारी परिस्थिति व न बदलणारी वस्तुस्थिति तुम्ही बदलून टाकूं शकाल. या भोंवऱ्यांतून तुम्ही स्वतः एकदां बाहेर पडलांत आणि उच्चस्थानीं आरूढ झालांत, कीं तुम्ही निसर्गाच्या बंधनांतून मुक्त असल्याचें तुम्हांस दिसून येईल. निसर्गाच्या साऱ्या सक्तीच्या बंधनांतून पार सुटून, अतःपर तुम्ही तिचें एक केवळ निष्क्रिय साधन तर रहाणार नाहींच, तर तिचें एक क्रियाशील कार्यकर्ते बनून जाल. मग तुमच्या कृतींच्या परिणामांचीं बंधनें तुम्हांला बंधनकारक ठरणार नाहींत, इतकेंच नव्हे तर तुम्ही त्या परिणामांची दिशाहि बदलून टाकूं शकाल. एकदां तुम्ही

विविध शक्तींच्या क्रिया-प्रतिक्रिया पाहूं लागलांत, सर्व शक्तींचें उगमस्थान असलेल्या चेतनेच्या थरावर एकदां तुम्ही स्वतः आरूढ झालांत आणि शक्तींना चालना देणाऱ्या या उगमस्थानाशीं स्वतःला समरूप करून घेतलेंत, कीं मग जिथें घटना घडतात त्या चेतनेच्या थराच्या अंकित तुम्ही रहात नाहीं, तर जेथून त्या घडविल्या जातात, त्या पातळीवरील चेतनेचे तुम्ही होऊन जातां.

हेंच नेमकें योगाचें ध्येय आहे—कर्मगतीच्या फेऱ्यांतून बाहेर पडून, भगवंताच्या कार्यांत प्रविष्ट होणें. ज्या निसर्गाच्या यांत्रिक फेऱ्यांत तुम्हांला एकाद्या अज्ञानी गुलामासारखें रहावें लागतें, निसर्गाचें एक असहाय्य व दैन्यवाणें साधन बनून जावें लागतें, त्या निसर्गाच्या तसल्या स्थितींतून तुम्हांला योगामुळें बाहेर पडतां येऊन, चेतनेच्या अशा एका दुसऱ्या पातळीवर तुम्ही आरूढ होतां, कीं ज्या पातळीवर एका उच्चतर नियतीच्या कार्यांत जागृत सहभागी आणि क्रियाशील कार्यकर्ते असें तुम्ही होतां. चेतनेचें हें कार्य दुहेरी असतें. प्रथमतः एका बाजूनें आरोहणाची क्रिया असते; जड भौतिक पातळीवरील भानांतून तुम्ही स्वतःचें उत्थापन करून, चेतनेच्या अधिक श्रेष्ठ दर्जाच्या क्षेत्रांत प्रविष्ट होतां. पण अशाप्रकारें चेतनेच्या खालच्या थरावरून वरच्या थरावर आरोहण होत असतांना, वरच्या थरावरील चेतनेचें खालच्या थरावर अवतरण होणें जरूर असतें. तुम्ही ज्यावेळीं भौतिक थरावरील चेतना सोडून वर आरोहण करतां, त्यावेळीं वरच्या थरावरीलहि कांहींतरी खालच्या थरावर आणून सोडतां—कांहीं प्रकाश, कांहीं शक्ति, कीं ज्यायोगें जडतत्त्वाचा पूर्वस्वभाव बदलतो अथवा बदलूं पहातो. आणि मग, तुमच्याच ठिकाणचा उच्चभाग आणि कनिष्ठ भाग, तुमच्या व्यक्तित्वाचे व जाणिवेचे आंतरिक व बाह्य स्तर, या परस्पर भिन्न भासणाऱ्या, परस्परांपासून अलग अलग झालेल्या आणि परस्परांशीं असंबद्ध असलेल्या गोष्टी एकत्र येतात, हळुहळु संयुक्त होतात आणि त्यांचें एका सत्यामध्यें, एका सुसंवादामध्यें क्रमशः रूपांतर होऊन जातें.

ज्याला चमत्कार म्हणतात, ते याच तऱ्हेनें घडून येतात. जग हें चेतनेच्या असंख्य थरांचें बनलेलें असून, प्रत्येकाचे स्पष्टपणें वेगळे असे कायदे असतात, एका थरावर चालणारे कायदे दुसऱ्या थरावर लागूं पडत नाहींत. चमत्कार म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून, दुसऱ्या थरावरील चेतनेचें या जड भौतिक थरावरील चेतनेंत होणारें अचानक अवतरण; दुसऱ्या चेतनेचा आणि तिच्या शक्तींचा (बहुधा त्या प्राणशक्ती असतात) एक प्रकारचा स्फोट. यंत्रवत् पद्धतीनें जेथें कार्य चालतें अशा भौतिक थरावर, दुसऱ्या उच्चतर थरावरील कार्यपद्धतींचा वेगयुक्त आघात होतो. चमत्कार म्हणजे जणुं आपल्या सामान्य जाणिवेचें मेघपटल विदारून, अन्य शक्तींचे, अन्य क्रियांचे आणि घटनांचे लोट आणून सोडणारा देदीप्यमान् विद्युल्लतेचा झोत. अशा घटनेचा जो परिणाम होतो, त्यास आपण 'चमत्कार' म्हणतो; कारण आपल्याला अचानक झालेली उलथापालथ दिसते; आपल्या सामान्य जाणिवेच्या कक्षेंत ज्या निसर्गनियमांचें कार्य चालतें, त्या कार्यांत अकल्पित असा अडथळा आलेला दिसतो; पण त्यामागील कारण व क्रम आपल्याला समजत नाहीं, दिसत नाहीं. याचें कारण, चमत्काराचा उगम दुसऱ्या एका पातळीवर असतो. अर्थात् आपल्या जगाच्या अतीत असलेल्या जगांतील शक्तींमुळें, आपल्या भौतिक जगांत होणाऱ्या असल्या घटना अगदींच क्वचित् घडणाऱ्या असतात असें नाहीं, त्या नित्य घडत असतात आणि जर आपल्याला दृष्टि असेल आणि निरीक्षण

कसें करावयाचें तें समजत असेल, तर आपल्याला असंख्य चमत्कार आढळून येतील. विशेषतः जे कोणी उच्चतर चेतनेच्या शक्ती येथील पृथ्वीगत चेतनेमध्यें आणण्याच्या प्रयत्नांत असतात, त्यांच्या बाबतींत तर असे चमत्कार क्षणोक्षणीं घडून येत असतात.

**"सृष्टीच्या पुढें कांहीं निश्चित ध्येय आहे काय ? असें एकादें निश्चित अंतिम स्थान आहे काय कीं ज्या दिशेनें सृष्टीचें मार्गक्रमण चालूं आहे ? "**

नाहीं. विश्व म्हणजे अनंत काल उलगडत रहाणारें एक चक्र आहे. त्याला एक निश्चित शेवट किंवा एकच ध्येय असें नाहीं. पण आपल्याला कार्य करण्याच्या दृष्टीनें, अविरत चालणाऱ्या विश्वाच्या गतीचे विभाग करावे लागतात आणि हें किंवा तें मुक्कामाचें ठिकाण आहे, अंतिम ध्येय आहे असें म्हणावें लागतें; कारण कृति करतांना असें कांहीं ध्येय हवें असतें. चित्र काढण्यास वस्तु-रचना व रंग या विषयींच्या एकाद्या योजनेची आवश्यकता असते; कांहीं मर्यादा घालावी लागते, एका निश्चित चौकटींत सर्व बसवावें लागतें; तथापि असें मर्यादीकरण भ्रामक असतें; चौकट घालून घेणें ही एक रूढी आहे. चित्र हें जणुं चित्रकाराच्या सर्व मर्यादांच्या पलीकडे सारखें पुढें पुढेंच जात राहतें आणि अशा तऱ्हेनें पुढें पुढें जाणाऱ्या प्रत्येक भागांतून त्याच स्थितींतील अगणित चित्रें काढतां येतात. आमचें ध्येय हें आहे किंवा तें आहे असें आपण म्हणतों, पण 'हें' किंवा 'तें' ध्येय ही दुसऱ्या एका ध्येयाची सुरुवात असते आणि तें 'दुसरें' आपल्यापरीनें आणखी एका तिसऱ्या ध्येयाप्रत नेतें. ही मालिका निरंतर लांबतच जाते; कधीं थांबतच नाहीं.

(अपूर्ण)

—श्रीमाताजी

---

"विसंवादी वातावरणाचें" अस्तित्व ओळखणें हें उपयुक्त आहे, पण त्यामुळें त्याचें सुसंवादी वातावरणामध्यें रूपांतर करण्याची इच्छा प्रत्येकाचे ठिकाणीं जितक्या प्रमाणांत जागृत होत असेल, तेवढयाच प्रमाणांत त्याचा उपयोग आहे; त्यासाठीं पहिली महत्त्वाची पायरी म्हणजे प्रत्येकानें आपला स्वतःचा संकुचित दृष्टिकोन सोडून देऊन, दुसऱ्यांचा दृष्टिकोन समजावून घेण्याचा प्रयत्न करावयाचा. दुसऱ्यांच्या चुका दाखविण्यावर भर देण्यापेक्षां, प्रत्येकानें आपल्या स्वतःमधील चूक शोधून काढणें हें अधिक महत्त्वाचें आहे. ...............

जे प्रामाणिक आहेत आणि ज्यांच्याठिकाणीं मनःपूर्वकता व सदिच्छा आहे, त्या सर्वांसाठीं नेहमीं माझे आशीर्वाद आहेत.

—श्रीमाताजी.

# गीतेचा संदेश

(मागील अंकावरून पुढें चालूं)

गीतेचा संदेश, अर्थात् गीतोपदेश करण्याऱ्या दिव्य गुरूचा, भगवन्ताचा संदेश सारांश-रूपानें आम्हांला असा सांगतां येईल: "कर्माचें रहस्य सर्व जीवनाच्या, सर्व अस्तित्वाच्या रहस्याहून मुळींच वेगळें नाहीं. अस्तित्व हें कांहीं केवळ निसर्गाची–प्रकृतीची–यांत्रिक साधन-सामग्री नव्हे, तें कांहीं केवळ नियमांचें चक्र नव्हे; जीवात्म्याला क्षणभर किंवा युगानुयुगें अडकवून निरर्थक भ्रमन्ती घडविण्यासाठीं घडलेलें नियमचक्र किंवा यंत्र हें कांहीं अस्तित्वाचें खरें स्वरूप नव्हे, अस्तित्व हें ब्रह्माचें, परमात्म्याचें नित्य चाललेलें आत्माविष्करण आहे, जीवन हें केवळ जीवनाकरितां नाहीं, तें परमात्म्याकरितां, परमेश्वराकरितां आहे; मानवाचा जीवमान् आत्मा हा परमेश्वराचा सनातन अंश आहे. कर्म हें आत्मशोधासाठीं, आत्मप्राप्ती साठीं, आत्मपूर्तीसाठीं, आत्मसाक्षात्कारासाठीं आहे. कर्माला त्याचे खास परिणाम म्हणून तत्काल किंवा भविष्यकालीं जीं बाह्य दृश्य फलें येत असतात, त्या फलांकरितांच केवळ कर्म करावयाचें नसतें. जशी परमात्म्याची व्यक्त प्रकृति आहे, तशी त्याची श्रेष्ठ प्रकृतीहि आहे आणि या श्रेष्ठ (परा) प्रकृतीवर आधारलेला असा आंतरिक नियम आणि आंतरिक अर्थ सर्व वस्तूंना आहे: कर्माचें खरें सत्य या आंतरिक अर्थांत आणि नियमांत आहे. मन आणि त्याचे व्यवहार हा कर्माचा बाह्य देखावा आहे—या देखाव्यांत कर्माचें खरें सत्य प्रतीत होऊं शकत नाहीं, या देखाव्यांत कर्माच्या खऱ्या सत्याला अज्ञानानें भलता वेष चढवलेला असतो, अर्थात् या देखाव्यांत तें काकतालीय न्यायानें व केवळ अंशतः प्रतिबिंबित झाललें असतें. तेव्हां कर्माचा सर्वश्रेष्ठ, निर्दोष, व्यापकांत व्यापक नियम असा आहे कीं, तुम्हीं तुमचें सर्वश्रेष्ठ, सर्वांत अधिक आंतरिक अस्तित्वाचें सत्य शोधून काढून, त्याच्या आश्रयानें जीवन जगावें, जीवनाचा बाह्य असा कोणताहि आदर्श वा धर्म मानूं नये. जोपर्यंत जीवनाची व व्यवहाराची व्यवस्था याप्रमाणें सर्वश्रेष्ठ आंतरिक सत्यानुसार होत नाहीं, तो-पर्यंत त्यांत सदोषता, दुष्करता, संघर्ष आणि संमूढता (किंकर्तव्यमूढता) राहणार हें निश्चित. तुम्ही आपला खरा आत्मा शोधून काढावा, त्याच्या खऱ्या सत्याला प्रमाण मानून, त्याचें वास्तव स्वरूप शिरोधार्य मानून जीवन जगावें, हाच, जीवनाचा व व्यवहाराचा प्रश्न कायमचा सोडविण्याचा एक मार्ग आहे. याप्रमाणें जीवन जगूं लागा म्हणजे त्यांतील संघर्ष आणि दुष्करता तुम्हांला अडवूं शकणार नाहीं आणि तुम्ही शोधून काढलेल्या तुमच्या आत्म्याच्या आणि परमात्म्याच्या अभयपूर्ण आश्रयानें तुमचीं कर्में निर्दोष होऊन, त्यांना खऱ्याखुऱ्या दिव्य कर्माचें स्वरूप येईल. तेव्हां तुम्ही तुमच्या आत्म्याचें ज्ञान करून घ्या, तुमचा खरा आत्मा परमेश्वरच आहे, दुसऱ्या सर्व भूतांच्या आत्म्याशीं एकरूप असा आहे, परमेश्वराचा अंश आहे हें ज्ञान करून घ्या; त्या ज्ञानाच्या अधिष्ठानावर तुम्ही आपलें जीवन चालवा; आत्म्याचे ठिकाणीं रहा, तुमच्या सर्वोत्तम आध्यात्मिक प्रकृतीच्या ठिकाणीं राहून जीवन चालवा, परमेश्वराशीं एक होऊन जा, परमेश्वरसदृश होऊन रहा. तुम्हांमधील सर्वश्रेष्ठ

एकच एक यज्ञभोक्ता, विश्वांतील सर्वश्रेष्ठ एकच एक जनभोक्ता जो परमेश्वर, त्याला तुमचीं सर्व कर्में प्रथम यज्ञांतील आहुति म्हणून अर्पण करा; शेवटीं या परात्पर विश्वात्म्याचे हातीं तुमचें सर्व अस्तित्व आणि तुमचें सर्व कर्म द्या--तुमच्या द्वारां त्याला त्याची इच्छा, त्याचें विविध कार्य विश्वांत करूं द्या. तुमच्यापुढें तुमच्या अस्तित्वाचा आणि कर्माचा जो प्रश्न आहे, त्या प्रश्नाचें हें उत्तर मी तुम्हांपुढें ठेवीत आहे; या प्रश्नाला याखेरीज दुसरें समाधानकारक उत्तर नाहीं ही गोष्ट, तुम्ही हा प्रश्न सोडविण्याच्या पाठीमागें लागलांत म्हणजें शेवटीं तुमच्या प्रत्ययास येईल."

भारतीय अध्यात्माशिक्षा मानवी अस्तित्वाच्या पोटांत असलेल्या मूलभूत विरोधावर आधाररेली आहे; गीतेची शिकवण देखील या विरोधावर आधारलेली आहे; या मूलभूत विरोधासंबंधींचें गीतेचें मत याठिकाणीं स्पष्ट करणें अवश्य आहे. मानवी अस्तित्वांतील (दर्शनी) विरोधी तत्त्वांकडे लक्ष देऊन खरा आत्मा, मानवांतील ईश्वर शोधून काढण्यास गीता सांगत आहे; हा खरा आत्मा शोधून काढणें, सर्वांमधील व आम्हांमधील ईश्वराचें ज्ञान प्राप्त करून घेणें सोपें नाहीं; आम्हीं मनाच्या बळावर हें ज्ञान प्राप्त करून घेतलें, तरी या ज्ञानद्रव्यानें आमच्या जाणिवेची घडण करणें, आमच्या कर्मासाठीं केवळ या ज्ञानाचेंच अधिष्ठान करून घेणें ही गोष्टहि सोपी नाहीं. आमच्या अस्तित्वाची कार्यक्षम अवस्था आमच्याकडून कोणतें कर्म घडणार तें ठरवितें आणि ही कार्यक्षम अवस्था ठरविणाऱ्या गोष्टी म्हणजे आमची विशिष्ट अवस्थेंतील क्रियाशील जाणीव, आमची नित्य आत्म्याकडे (स्वतां-कडे) दृष्टि लावून असलेली विशिष्ट अवस्थेंतील संकल्पशक्ति आणि यांना उपलब्ध असलेलें क्रियेचें, गतिमानतेचें अधिष्ठान किंवा पाया, आमच्या अस्तित्वाचें आणि जीवनाचें स्वरूप, आम्हीं जें काय असतो आणि होतों तें, ही सर्व आमच्या श्रद्धेची कामगिरी असते; आम्ही अमुक आहोंत, आमचे जगाशीं जे संबंध आहेत त्यांचा अर्थ अमुक आहे अशी जी दृष्टि, जो विश्वास आमच्या कृतिशील, प्रकृतीच्या कणाकणांत आमच्या प्रत्ययास येत असेल, ती आमची श्रद्धा होय--ही श्रद्धाच आमच्या अस्तित्वाला आणि जीवनाला आकार देत असते. पण, मानवी अस्तित्वाच्या सत्याचे दोन प्रकार आहेत. बाह्य दर्शनी अस्तित्व आणि आंतरिक खरें अस्तित्व; आणि या दोन प्रकारांना धरून मानवी जाणीव दोन प्रकारची असल्याचें दिसून येतें. बाह्य दर्शनी अस्तित्वांत वावरणारा मानव हा मानवी अज्ञानांत वावरणारा मनोमय पुरुष आणि आंतरिक खऱ्या अस्तित्वांत वावरणारा मानव हा दिव्य (ईश्वरी) ज्ञानावर अधिष्ठित असा आत्मा, अशा मानवाच्या दोन अवस्था गीता मानते.

अस्तित्वाच्या सत्याचें जें बाहेरचें दृश्यस्वरूप आहे, तें सर्व प्रकृति या नांवानें संबोधलें जातें : प्रकृति म्हणजे शक्ति, मूळ सद्वस्तूचा व्यवहारनियम आणि व्यवहारसाधन होणारी शक्ति; आमच्या मनाचा आणि इंद्रियांचा विषय होणारी सृष्टि ही शक्ति निर्माण करते. मन आणि इंद्रियें यांनाहि ही शक्तीच निर्माण करते, जीव आणि जीवाचें जीवनक्षेत्र–सृष्टि, पदार्थमय सृष्टि यांजमध्यें अन्योन्यसंबंध घडविण्याचें साधन हें इंद्रियांचें आणि मनाचें स्वरूप असतें; मानवाचें बाह्य स्वरूप पाहतां, तो प्रकृतिनिर्मित जीव दिसतो; त्याचा आत्मा, त्याचें मन, त्याचें प्राणतत्त्व, त्याचें शरीर हें सर्व प्रकृतिनिर्मित दिसतें : दुसरे जीव त्याजपासून शरीरानें, प्राणतत्त्वानें, मनानें, विशेषतः अहंभावानें वेगळे असे ओळखतां येतात--अहम् ही

एक सूक्ष्म रचना प्रकृतीनें मानवामध्यें एवढ्याकरितां करून ठेवली आहे कीं, वेगळें शरीर, मन, प्राणतत्त्व यांच्या स्पष्ट वेगळेपणाची त्याची जाणीव त्याला स्वतःमध्यें कोठेंतरी केंद्रित करतां यावी. मानवामधील सर्व कांहीं, त्याचा मनोमय आत्मा, या मनोमय आत्म्याचा व्यवहार, त्याचें प्राणतत्त्व, त्याचें शरीर यांचा व्यवहार त्याच्या प्रकृतिधर्मानें ठरतो हें उघड आहे; प्रकृतिधर्माच्या बाहेर हा व्यवहार जाऊं शकत नाहीं, प्रकृतिधर्म सोडून वेगळ्या रीतीनें घडून येऊं शकत नाहीं. आपल्या वैयक्तिक इच्छेला, आपल्या अहम्‌च्या इच्छेला कांहीं स्वातंत्र्य आहे, असें मानव मानतो; पण वास्तव दृष्टीनें या स्वातंत्र्याला कांहींच अर्थ नसतो; कारण त्याचा अहंभाव ही केवळ एक भावना आहे, प्रकृतिनिर्मित भावना आहे; प्रकृतीनें त्याला जें रूप दिलें आहे, जें बदलतें मन, प्राणतत्त्व व शरीर त्याला दिलें आहे, त्यांच्याशीं एकरूपतेची जाणीव त्याला अहम्‌मुळें दृढपणें, स्थिरपणें होते. आतांच सांगितल्याप्रमाणें प्रकृतीच्या कृतिकलापाचेंच एक फळ अहम् हें आहे, आणि या अहम्‌चा स्वभाव जसा असेल, तसा त्याच्या इच्छेचा गुणधर्म असणार आणि या गुणधर्मानुसारच तो वागणार, त्याला वागावें लागणार––अर्थात् वर सांगितल्याप्रमाणें अहम्‌च्या इच्छेला कांहीं स्वातंत्र्य आहे असें जें मानवाला वाटतें तो केवळ भ्रम आहे.

मानवाची सामान्य जाणीव, मानवाची स्वतःच्या अस्तित्वासंबंधाची सामान्य श्रद्धा अशीच असते कीं, आपण प्रकृतीचें अपत्य आहों; इतर जीवांपासून वेगळा असा मी एक जीव आहे, मी इतरांशीं आणि जगाशीं माझी कांहीं नातीं, माझे कांहीं संबंध निर्माण करतों, या जगांत माझी कांहीं वाढ मी करून घेतों, माझा कांहीं विकास करून घेतों, माझ्या कांहीं वासना, कांहीं इच्छा, माझ्या मनाच्या कांहीं कल्पना मी पूर्ण करतों, सिद्ध करतों––मात्र हें "कांहीं" प्रकृतिनियंत्रित असतें; प्रकृतीच्या क्षेत्रांत ज्या गोष्टींना मुभा आहे, माझ्या अस्तित्वांत प्रकृतीचा जो हेतू आहे, प्रकृतीचा जो कायदा माझ्या अस्तित्वाला लागूं आहे, त्या हेतूला आणि त्या कायद्याला धरून ज्या गोष्टी आहेत, त्या गोष्टींच्या बाहेर हें "कांहीं" असूं शकत नाहीं––अशी मानवाची सामान्य श्रद्धा असते.

तथापि, मानवाच्या जाणिवेंत असाहि कांहीं भाग असतो, जो या संकुचित सूत्राच्या कोंडींत कोंडला जात नाहीं : त्याच्या आत्म्याच्या वाढीबरोबर वाढत जाणारी त्याची अशीहि श्रद्धा असते कीं, आपल्या अस्तित्वाचें दुसरेंहि सत्य आहे आणि तें आंतरिक आहे. या आंतरिक सत्यानुसार अस्तित्व म्हणजे प्रकृति असें समीकरण नसून, अस्तित्व म्हणजे आत्मा, परमात्मा, पुरुष हें समीकरण सत्य असतें. प्रकृति ही पुरुषाची, आत्म्याची शक्ति एवढेंच तिचें खरें स्वरूप या आंतरिक सत्यानुसार असतें. या सत्यानुसार या विश्वाचा स्वामी आत्मा, परमात्मा, पुरुष हा असून हा एकच पुरुष सर्वांत वास करतो, विश्व हें या पुरुषाचें आंशिक व्यक्त स्वरूप आहे. प्रकृतीला आणि तिच्या क्रियेला या पुरुषाचा आधार असतो, प्रकृतीच्या व्यवहाराला या पुरुषाची अनुमति आवश्यक असते; तिचा कायदा जो सर्वसमर्थ होतो, तिची शक्ति, तिचे मार्ग जे कार्यक्षम होतात, ते केवळ या पुरुषाच्या अनुमतीमुळेंच कार्यक्षम होतात. प्रकृतीच्या ठिकाणीं हा जो पुरुष असतो, आत्मा असतो, तो ज्ञाता, ज्ञानमय असून तोच तिला प्रकाश देतो, आम्हांमध्यें प्रकृति जाणीवयुक्त होते, ती या ज्ञात्याकडून तिला मिळणाऱ्या प्रकाशामुळें होते; प्रकृतीकडून जे व्यवहार घडतात त्यांना प्रेरणा देणारी, त्यांना हेतु पुरविणारी

इच्छाशक्ति ही या ज्ञात्यापुरुषाची इच्छाशक्ति असते आणि ती सर्वत्र सर्वांच्या अंतर्यामीं असून, आपल्या सामान्य जाणिवेच्या कक्षेबाहेर--अतिचेतन--असते. आपला मानवी आत्मा या ईश्वरी आत्म्याचा अंशरूप असतो आणि या ईश्वराची प्रकृति ती आपल्या आत्म्याची प्रकृति असते; आपल्या आत्म्याची अभिव्यक्ति हेंच आमच्या प्रकृतीचें स्वरूप असतें, आमची प्रकृति या आमच्या आत्म्याच्या संमतीनेंच कार्य करीत असते : आमच्या प्रकृतीच्या हालचालींत, तिच्या रूपांत आणि रूपांतरांत आमच्या आत्म्याचें गुप्त आत्मज्ञान, गुप्त आत्मजाणीव, गुप्त जीवनेच्छा व्यक्त होत असते, सशरीर होत असते.

(अपूर्ण)

अनुवादक : सेनापति पां. म. बापट —श्रीअरविंद

आपल्या योगाचें उद्दिष्ट आत्म-परिपूर्ति हें आहे; आत्म-लय हें नाहीं. योग्यासमोर मार्गक्रमणासाठीं दोन पथ ठेवलेले असतात; विश्वापासून निवृत्ति किंवा विश्वामध्यें पूर्णत्व-प्राप्ति. पहिला मार्ग संन्यासद्वारां व दुसरा तपस्येनें साध्य होतो; जेव्हां आपण 'सत्' मध्यें ईश्वराचा विलय करतो, तेव्हां पहिला मार्ग आपणांस लाभतो; पण जेव्हां आपण ईश्वरा-मध्यें अस्तित्वाची, 'सत्' ची परिपूर्ति करतो, तेव्हां दुसरा मार्ग सिद्ध होतो. आपण आपल्यापुढें पूर्णत्वाचा मार्ग ठेवूं या, जगत्-त्यागाचा नको; संग्रामामध्यें विजय-प्राप्ति हें आपलें ध्येय ठेवूं या, सर्व संघर्षांपासून पलायन हें नको.

—श्रीअरविंद.

# श्रीअरविंदांचा योग, तत्त्वज्ञान व आश्रम

(एक पत्रोत्तर)

येथील आमच्या जीवनास आधारभूत असलेल्या कांहीं तत्त्वांचें, आपणांस आपल्या पहिल्या भेटींतच अचूक आकलन झालें हें विशेष आहे. क्वचित् कांहीं एकाददुसऱ्या बाबतींत गैरसमजूत झाली असली, तरी तें साहजिकच आहे; आणि ती दुरुस्त करण्याविषयीं जर मी लिहिलें, तर त्याचें स्वागतच होईल, अशी मला खात्री असल्यानें, प्रथम त्याचा निरास करून, मग आपण आपल्या पत्राच्या शेवटीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचें योजिलें आहे.

**प्रथम आध्यात्मिक मार्गांतील गुरूविषयीं** : अध्यात्म-मार्गावर गुरूची आवश्यकता अनिवार्य आहे, ही गोष्ट परंपरेनें मान्य केलेली व अनुभवानें पक्की झालेली आहे. गुरू हा आधीं त्या मार्गावरून गेलेला, त्या मार्गाचें अंतिम फल आपल्या ठिकाणीं आत्मसात् केलेला असला पाहिजे हें तर स्पष्टच आहे. अर्थात् मानव गुरूच निवडला पाहिजे असा कांहीं दंडक नाहीं. कारण शास्त्रांत वर्णिलेल्या अनेक मार्गांपैकीं एक मार्ग पसंत करून, शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें साधक त्या मार्गाचा श्रद्धेनें अवलंब करूं शकतो. ज्यांनीं त्या मार्गाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन, त्या मार्गांत सुधारणा करून सुकरता व पूर्णता आणण्याचे यत्न केले, अशा अनुभवी महाभागांनींच शास्त्रग्रंथ लिहिले असल्यामुळें, त्या ग्रंथांच्या आदेशांत व निर्देशांत एक स्वतंत्र गूढ सामर्थ्य प्रत्ययास येऊं शकतें, त्या मार्गाचें जें सारगर्भ सत्य, त्याचें सामर्थ्य त्यांच्या शब्दांमध्यें उतरलेलें असतें. विशिष्ट भूमिकेवर व विशिष्ट वृत्तींत असतांना, त्या शब्दद्वारां अचूक व प्रेरणापूर्ण असें मार्गदर्शन साधकास होतेंच होतें; कारण सत्य हें जसें शाश्वत असतें, तसेंच तदन्तर्गत सामर्थ्यहि शाश्वत स्वरूपाचेंच असतें. किंवा सर्वांतर्यामी वास करणाऱ्या, आंतरींच्या मार्गदर्शकावर, हृद्देशीं वसणाऱ्या जगद्गुरूवर भार टाकून, तो दाखवील त्या मार्गानें साधना करीत रहाणें हेंहि शक्य आहे. मनःपूर्वक जर भार टाकला असेल व अभीप्सा एकसारखी धगधगत राहिलेली असेल, तर हें आंतरिक मार्गदर्शन नेहमीं निश्चित मिळतें व तें विशेष प्रभावीहि असतें. हें मार्गदर्शन अनेक रीतींनीं मिळूं शकेल. अनपेक्षितपणें कोणा व्यक्तीच्या द्वारां, एकाद्या लिखित वा उच्चारित शब्दद्वारां, कांहीं घटनांद्वारां किंवा भोंवतालच्या परिस्थितींतून कांहीं अस्पष्ट संदेश मिळून किंवा अशाच अन्य रीतीनें मार्गदर्शन झालें, तरी त्यांत वैयक्तिक प्रयत्नावरच भर असतो. पूर्वकालीं व आजहि अशीं कांहीं थोर व्यक्तींचीं उदाहरणें सांपडतील, कीं ज्यांत मानवगुरूच्या मदतीशिवाय साधनेचें उद्दिष्ट त्यांनीं साध्य करून घेतलेलें आहे. अर्थात् त्यामध्यें सर्व ओझें त्यांचें त्यांना स्वतःच उचलावें लागतें व मार्गदर्शन आणि उत्साह घेण्यासाठीं आपणहून, जेथून जेथून तें मिळण्याचा संभव असेल तेथें जाऊन यत्न करावा लागतो. तरीपण अशीं उदाहरणें क्वचितच असतात. शिवाय तसें सर्वांनींच करावयाचें म्हटल्यास तें तितकेसें सोपें व सुरक्षितहि नाहीं. मानवप्रकृति ही नाना अपूर्णतांनीं भरलेली आहे; आणि प्रकृतीच्या कार्याला केव्हां कसलें वेडेंवांकडें वळण लागेल, तें सांगतां येण्याजोगें नसतें. अशा परिस्थितींत मनाकडून एकादाच प्रमाद घडेल, एकादेंच

पाऊल चुकीचें पडेल, पण तेवढ्यानेंहि कदाचित् अनेक वर्षांचे परिश्रम क्षणांत मातीमोल होऊन जातील !

**नंतर दुसरी गोष्ट** : 'आध्यात्मिक' (Spiritual) जाणीव अथवा पातळी आणि 'अतिमानसिक' (Supramental) पातळी अथवा जाणीव एक नव्हेत. वेद व उपनिषद्-कालीन द्रष्टया ऋषींच्या अनुभवानुसारें अखिल सृष्टि—जींत या आपल्या जगाचा अंतर्भाव अगत्य होतो—म्हणजे आत्म्याचा स्वरूपाविष्कार आहे असें आम्हीं मानतों. अस्तित्वाची कोणतीहि पातळी घेतली, तरी त्या सर्वच्या सर्व पातळीवर सर्वत्र त्या आत्म्याचाच तो आविष्कार असतो. परिणामतः प्रत्येक पातळीवर त्या आत्म्याचा स्व-भाव म्हणजे त्याची चेतना सर्वत्र सारख्या प्रमाणांत, कुठें प्रकट व क्रियाशील किंवा कुठें झांकलेल्या व सुप्त स्वरूपांत उपस्थित असतेंच असते.

त्यामुळेंच व्यक्तीला जाणिवेच्या भौतिक, प्राणिक अथवा मानसिक कोणत्याहि भूमिकेवर त्या **आध्यात्मिक चेतनेंत** उन्मुक्त होऊन तिचा अनुभव घेतां येणें शक्य असतें. उदाहरणार्थ एकादी व्यक्ति आजच्या सामान्य दर्जाच्या मानसिक विकासाच्या पायरीवर असून सुद्धां योग्य तपाचरणानें, साधनाभ्यासानें स्वतःचें ठिकाणीं आध्यात्मिक चेतनेची अनुभूति घेऊं शकते. आध्यात्मिक चेतनेचा स्पर्श व अनुभव घेण्यासाठीं मनोभूमिकेच्या अत्युच्च पातळीवर चढून जाण्याची अथवा मनापलीकडील अतिमानसिक पातळी गांठण्याची मुळींच आवश्यकता नाहीं.

दिव्य चेतनेच्या आविष्करणाच्या भिन्न भिन्न स्तरांपैकीं **अतिमानसिक** ही एक त्या चेतनेची विशेष घटित अवस्था आहे. त्या अवस्थेंत, आविष्करणोन्मुख भूमिकेंत, तिनें स्वतःच्या ठिकाणीं सत्-ज्ञान व सत्-शक्ति यांचें स्वयंभू क्रियासामर्थ्य केंद्रीभूत केलेलें असतें. जड भूत, प्राण आणि मन या कनिष्ठ पातळींवर चैतन्य अथवा आत्मा झांकलेला, लुप्त अशा अवस्थेंत असतो; तसें अतिमानसांत नसतें. तेथें चेतना संपूर्णतेनें सुस्पष्ट आणि अमर्याद क्रियाशील असते. आमच्या साधनेचें उद्दिष्ट आहे, ही चेतनावस्था प्राप्त करून घेणें आणि तिच्या कार्यास आपलें जीवन हें क्षेत्र म्हणून मोकळें करून देणें. अर्थात् या पूर्णयोगाच्या प्राथमिक तयारीकरितां व्यक्तीनें स्वतःचें आध्यात्मीकरण करणें ही एक अनिवार्य गोष्ट आहे. या तयारीनंतरच या योगाचें जें अंतिम उद्दिष्ट, अतिमानसिक चेतनेची उपलब्धि, तिच्या दिशेनें साधकाचा प्रवास सुरू होतो.

**तिसरा मुद्दा** : श्रीमाताजी म्हणजे 'केवळ एक प्रबुद्ध आत्मा' आहेत असें आम्ही मानीत नाहीं. मानव-व्यक्तीची अधिकांत अधिक उच्च कोटी कल्पिली , तरी तशी मानव-व्यक्ति म्हणून आम्ही श्रीमाताजींकडे पहात नाहीं. ज्या एका संस्थेचे आम्ही घटक आहोंत, त्या संस्थेच्या केवळ प्रमुख अथवा संचालिका त्या नाहींत; किंवा एका ध्येयास वाहून घेतलेल्या साधक-भक्तांना वाट दाखविणारी वयोवृद्ध अथवा ज्ञानवृद्ध मार्गदर्शिकाहि केवळ त्या नाहींत. ज्या एकमेव गुरुच्या चरणाशीं आपलें सर्वस्व अर्पण करण्याची गाढतम अभीप्सा शिष्याच्या हृदयांत वसत असते व ज्याच्या सान्निध्यांत राहावयास मिळणें हें परमभाग्याचें म्हणून मानलें जातें, अशा प्रकारचें या भारतीय परंपरेंत आजवर मान्यता पावलेलें सद्‌गुरूपद आम्ही श्रीमाताजींना देतों. निदान ज्या दिव्यत्वाचा शोध आम्ही चालविला आहे, त्याचें प्रातिनिधिक स्वरूप म्हणजे श्रीमाताजी आहेत असें आम्ही मानतों. पण आमच्यापैकीं ज्यांना श्रीमाताजींच्या

दिव्य विभूतिमत्वाचें ओझरतें तरी दर्शन मिळण्याचें भाग्य लाभलें आहे, त्यांना श्रीमाताजी म्हणजे याहूनहि कांहींतरी असीम, अनंत आहेत. श्रीअरविंदांनीं अगदीं निःसंदिग्ध शब्दांत अनेकदां निक्षून सांगितलें आहे, म्हणूनच केवळ श्रीमाताजींना आम्ही दिव्यतेची मूर्ति मानतों असें नाहीं, तर आम्हांला त्यांना जवळून पाहून आणि निःसंदिग्ध स्वानुभवावरून तसें कळून आलेलें आहे. श्रीमाताजींच्या केवळ एका नामोच्चाराच्या प्रभावानें सामर्थ्य व आनंद यांच्या लहरी नसानसांतून लहरल्याचे, अखिल अस्तित्वावर सघन शांतीचें अवतरण झाल्याचे, जाग्रत अथवा स्वप्न स्थितींत महाभयंकर अडचणी, अडथळें व संकटें क्षणार्धांत विरून गेल्याचे असंख्यांचे अगणित अनुभव आहेत. जेव्हां आम्ही श्रीमाताजींचें ध्यान करतों, त्यांच्यापासून प्रसरित होत असलेल्या सत्-शक्तीच्या लहरींना आम्ही उन्मुख होतों, त्यावेळीं जणुं सदेह आम्ही वर उचलले जाऊन, दिव्य व्यापकतेच्या अवकाशांत आम्हीं प्रचंड वेगानें भ्रमण करूं लागल्याचा आम्हांला अनुभव येतो. त्यांच्या अभय कृपाछत्राखालीं राहणाऱ्यांना चमत्कार म्हणजे नित्याच्याच साध्यासुध्या गोष्टी होऊन बसलेल्या आहेत. श्रीकृष्णाचें विश्वरूप पाहिल्यानंतर अर्जुनानें जसे उद्‌गार काढले, तसेंच आम्ही म्हणूं शकतो—"अदृष्ट-पूर्वं हृषितोऽस्मिदृष्ट्वा".

आतां आश्रमासंबंधींचा अभिप्राय नमूद करतांना आपण ज्या कांहीं शंका प्रदर्शित केल्या आहेत, तिकडे वळूं—

१ "साधकांचा बाहेरच्या समाजाशीं जवळजवळ मुळींच संबंध येत नाहीं. ते केवळ एकाकी असें साधकजीवन जगतात. याचाच अर्थ असा कीं, गांवांतील जनतेसमोर येणाऱ्या नित्याच्या समस्या व अडचणी यांचा साधकांच्या जीवनावर, त्यांचा बाहेरच्या जनतेशीं कांहींच संबंध व संपर्क नसल्यामुळें, म्हणण्यासारखा असा कांहींच परिणाम होत नाहीं. किंबहुना या संपर्कापासून दूर राहण्याचाच त्यांचा यत्न असतो म्हणा ना. जनतेच्या अडी-अडचणींत व दुःखांत ते सहभागी होत नाहींत किंवा त्यांच्या अडचणी वा दुःखें दूर करण्याचाहि यत्न ते करीत नाहींत. उच्चतर जीवनप्राप्तीसाठीं चाललेल्या त्यांच्या प्रयोगास अविरोधी व अनुकूल वातावरण राखण्याच्या उद्देशानें कदाचित् एकाद्या व्रतधारीप्रमाणें बाह्य जनसंपर्कापासून दूर राहणें त्यांनीं मुद्दाम पसंत केलेलें असेल."

सामाजिक कार्यकर्ते व लोकसेवाव्रतधारी मंडळी जेव्हां आश्रम पाहून जातात, तेव्हां त्यांच्यापैकीं पुष्कळांकडून पुष्कळ वेळां अशाच तऱ्हेचा टीकात्मक अभिप्राय व्यक्त केला जातो, त्यामुळें आपल्या या मुद्यांचा परामर्श जरा सविस्तरपणें घेण्यास ही योग्य संधि आहे म्हणून या आपल्या शंकेचें मी मोकळ्या मनानें स्वागत करतो.

प्रथम असें पहा, 'लोकांबरोबर राहणें व त्यांच्या नित्याच्या 'सुखदुःखांत सहभागी होणें' येवढाच कां त्यांना मदत करण्याचा एकमेव मार्ग आहे? एकादा डॉक्टर खेडेगांवांत जातो, तेथें दवाखाना उघडतो व त्याच्या कल्पनेप्रमाणें माफक फी घेऊन रोग्यांना औषधें देतो; त्याची लोकसेवा ही, एकाद्या प्रयोगशाळेंत भौतिकशास्त्रविषयक अथवा वैद्यशास्त्रविषयक संशोधन-कार्यांत आपलें शक्तिसर्वस्व व क्षणन्‌क्षण खर्च करून, मानव-दुःखपरिहारार्थ एकादा नवा उपाय शोधण्याच्या अथवा मानवाच्या सुखसमृद्धींत भर घालण्याची कांहीं नवीन यंत्रसामुग्री अथवा युक्ति शोधण्याच्या यत्नांत असणाऱ्या शास्त्रज्ञापेक्षां अधिक मोलाची समजतां येईल कां?

आश्रम म्हणजेहि असेंच कांहीसें संशोधनाचें व प्रयोगाचें केंद्र आहे असें म्हणतां येईल. आत्म्याआत्म्यांच्या परस्परसंबंधविषयक नियमांच्या पायावर आधारलेल्या समाजाचा विकास वा समाजाच्या अभिनव रचनेची प्रत्यक्ष निर्मिति व प्रतिष्ठापना करण्याच्या दृष्टीनें चाललेला एक प्रयोग या दृष्टीनें आश्रमाकडे पाहिलें पाहिजे. जसजसे प्रश्न अथवा समस्या उत्पन्न होतील, तसतशा त्या हातीं घेऊन त्या एकामागून एक सोडविण्यापेक्षां अशा समस्या मुळांतच कां उत्पन्न होतात तें शोधून, त्या मूळ कारणाचाच मूलगामी उपायानें परिहार करण्याचा आमचा यत्न आहे. आमचा असा विश्वास आहे आणि आम्ही प्रत्यक्ष **पहातहि आहोंत कीं,** हें असें करणें **खरोखरीच शक्य असून,** मानव-जीवनाच्या खऱ्या मूल्याचें वा महत्त्वाचें दर्शन, केवळ तें आध्यात्मिक चेतनेंत जगल्यानेंच होणार आहे. असें झाल्यानंतरच केवळ सर्व तऱ्हेचे संघर्ष, दुःखें, यातना यांची आजची तीव्रता नाहींशी होऊन, तेथें सुसंवाद, शांति व समाधान यांचें राज्य पसरूं लागेल. या उद्दिष्टाच्या दिशेनें मानवजातीस उच्चतर पायरीवर नेण्याचा, प्रकृतीचाहि विकासक्रमाच्या मार्गानें जो यत्न चालला आहे, तोच विकासक्रम सर्व शक्ती एकवटून, जलदीनें साध्य करण्याचा आमचा सर्वांचा यत्न आहे. त्याकरितां विशिष्ट दृष्टीनें संयमित झालेलें जीवन आम्ही जगत आहों, योगाचरण करीत आहों. या तपाचरणानें अशी एक भूमिका व चेतना आम्हांस साध्य होऊन, ती संक्रमित करण्याचेंहि सामर्थ्य आम्हांस येईल, कीं ज्यायोगें मानवाची युगानुयुगाची ज्ञान, सामर्थ्य व समाधान याविषयींची अभीप्सा सुफलित होईल. आत्म्याच्या या गूढतर संकल्पाच्या लहरींची निर्मिति व त्यांचा उत्तरोत्तर अधिकाधिक सामर्थ्यपूर्ण विकास होण्यास अनुकूल असें वातावरण श्री-माताजींच्या उपस्थितीमुळें येथें उत्पन्न झालेलें आहे. एकाच ध्येयसिद्धीसाठीं मनांत अभीप्सा बाळगणाऱ्यांची सामूहिक संकल्पशक्ति व उन्नत आणि शुद्ध करणाऱ्या उच्चतर शक्तीचा एकसारखा दाब या दोन कारणांमुळेंहि ही गोष्ट सुलभ झालेली आहे. हा जो अभिनव व अद्वितीय प्रयत्न चालला आहे, त्याला आध्यात्मिक शक्तीचा सतत पुरवठा करूं शकेल असें एक शक्तिभांडारच श्रीमाताजींनीं येथें निर्माण करून ठेवलें आहे. या यत्नांत सहभागी होण्याची ज्यांना आंतून हांक आली असून, जे तळमळीनें व मनापासून, सच्च्या दिलानें काम करण्यास उद्युक्त आहेत, त्या सर्वांना या अपूर्व यत्नांत सहभाग घेण्यास श्री-माताजींनीं अनुमति दिलेली आहे. अर्थातच बाहेरच्या वातावरणाचे वा संस्काराचे परिणाम होऊन, येथील आध्यात्मिक वातावरणाची तीव्रता कमी होऊं नये, म्हणून हरप्रकारें काळजी घेतली जाते हें साहजिकच आहे. तरीपण जे खरेखुरे जिज्ञासु व पिपासु आहेत, त्यांना आश्रम पाहण्यास व तेथील वातावरणांत राहण्यास परवानगी दिली जाते, एवढेंच नव्हे तर पुनः पुनः येऊन प्रत्यक्ष अनुभव घेण्यास प्रोत्साहनहि दिलें जातें. अशा तऱ्हेनें प्रत्यक्ष निरीक्षणानंतर एकाद्याला येथील कार्य आवडलें व त्यांत भाग घेण्याची इच्छा त्यानें दर्शविली तर त्याची परिस्थिति लक्षांत घेऊन, ज्याप्रकारें व ज्या प्रमाणांत शक्य असेल, त्याप्रमाणें त्याला या अभिनव प्रयोगांत भागहि घेण्यास परवानगी असते.

येथें राहणाऱ्या आम्हां साधकांच्या जीवनाचें मुख्य उद्दिष्ट व्यक्तिगत मुक्ति हें नाहीं; किंवा आमचें जीवन मुख्यत्वें मानवजातीच्या सेवेसहि वाहिलेलें नाहीं. आमचा यत्न आहे ईशसेवेचा. मानव-जीवनामध्यें भगवंताचा जो संकल्प व्यक्त व्हावा अशी त्याची इच्छा

आहे, तो यथातथ्य रीतीनें व्यक्त करतां यावा यासाठीं आवश्यक असलेली पात्रता मिळविण्याचा आमचा यत्न आहे. कारण जीवनाचा खरा अर्थ हाच कीं, दिव्य अभिव्यक्तीच्या कार्याचें साधन व्हावयाचें. भारतांत आजवर नाना योगप्रक्रिया व मार्ग दाखविले गेले आहेत, त्यांत आणखी एका नव्या मार्गाची भर घालणें हें आमचें उद्दिष्ट नाहीं. जे कोणी या मार्गाचा स्वीकार करतील, त्यांच्या जीवनांत अधिकांत अधिक मात्रेनें आनंद, सामर्थ्य, ज्ञान व शांति यांचा आविष्कार व्हावा, यासाठीं जीवनाला एक विशिष्ट दिशा व वळण लावून देण्याचा आमचा यत्न चालू आहे. ही जी दिशा व वळण, तें परिणामतः सर्वच जीवनव्यापी व विशाल स्वरूपाचें असणार हें उघड आहे. आमच्या सर्व यत्नांचे व विशेषतः आध्यात्मिक यत्नांचें जें फल मिळणार, जे परिणाम होणार ते कोणा निवडक मूठभर सिद्ध व्यक्तींपुरतें मर्यादित राहणार नाहींत, राहूं शकणार नाहींत. त्यांचें अस्तित्व म्हणजे एक प्रकारचें उच्चतर चैतन्य व शक्ती उत्पादन करण्याचें, विद्युत्-उत्पादक केंद्रासारखें एक केंद्र होऊन राहील; आणि एक दिवस असा उजाडेल, जेव्हां या केंद्रांतून शक्तीचा प्रवाह फोफावून फुगून बाहेर ओसंडेल आणि आपल्या दिव्य जलानें मानवजातीस सचैल स्नान घालील. वर्धयन्ति आपः।

हें कार्य घडविण्याचें एक प्रभावी साधन या दृष्टीनेंच श्रीअरविंद आंतरराष्ट्रीय विद्याकेंद्राची स्थापना झाली व त्याची एकसारखी वाढ होत राहिली आहे. आमच्या येथील अध्यात्मसाधनेद्वारां जें कांहीं अपूर्व फल साध्य होईल त्याचा, बाहेरच्या अधिक विशाल जगास लाभ व्हावा, हा त्यापाठीमागील उद्देश आहे. जगांतील सर्व देशांतून विद्यार्थी व शिक्षक येथें येतात व राहतात, येथील सामूहिक जीवनांत सहभागी होतात, येथील जीवनांतील महत्त्वाचीं जीवनमूल्यें आत्मसात् करतात व स्वतःच्या क्षमतेनुसार त्यांचा आपल्या स्वतःच्या जीवनामध्यें आविष्कार व्हावा एतदर्थ यत्नशील राहतात. अर्थात् येथील निवास संपवून आपल्या पूर्वस्थलीं ही मंडळी परत गेल्यावर, येथील वर्धमान प्रकाशाचा प्रसार करणारे प्रसारक अथवा नंदादीप ते बनतील यांत संशय नाहीं.

२. "येथील साधकांच्या साधनेविषयीं संदिग्धता फार दिसते. गूढवादाचाहि थोडासा भास होतो. जर अतिमानसाच्या पातळीवरील अनुभवांनीं व धारणांनीं साधकांचें मन, बुद्धि, प्राण व शरीर यांमध्यें नवीन चेतना भिनून जात असेल, तर त्याचा परिणाम अनुक्रमानें खालच्या खालच्या पातळींवरहि वाढत्या क्रमानें स्पष्टपणें दिसावयास हवा. निदान साधकाचें मन विशाल व उन्नत झालेलें आहे, संकुचित व खुरटलेलें तरी नाहीं, एवढें तरी स्पष्टपणें दुसऱ्यास दिसावयास हवें आणि शिवाय कमीअधिक प्रमाणांत कां होईना विपरीत कल्पना व भोळसटपणा यांपासून तो अलिप्त असल्याचें दिसलें पाहिजे. आश्रमांतील साधकांच्या बाबतींत असें कांहींतरी अनुभवास येतें काय?"

होय. साहजिकच आमचा तसा अनुभव आहे. जे साधना करतात, त्यांना स्वतःच्या प्रगतीची सुस्पष्ट जाणीव होते. वर उल्लेखिलेले मन, प्राण व शरीर यांमधील बदल घडून येण्यास, अतिमानस पातळीवरील अनुभव येण्याची, साधकास वाट पहावी लागत नाहीं. वास्तविक पुष्कळच आधीं त्याची प्रतीति येऊं लागते. अर्थात् साधकाच्या स्वभाववैशिष्ट्यास अनुसरून त्याचें स्वरूप भिन्न भिन्न असतें. सामान्यतः साधकाच्या अस्तित्वाचीं जीं जीं अंगें आधींच विकसित व पुढील विकासास पात्र झालीं असतील, त्यांमध्यें प्रगति अधिक जलद

होते व इतर अंगें सावकाश प्रगत होत असतात असें स्पष्ट दिसतें. कांहींना शुद्ध प्रेमभावनेची ऊब हृदयांत वाढलेली जाणवते; हीच पुढें सर्वांविषयीं वाटणाऱ्या एकात्मभावांत परिणत होते. दुसऱ्या कोणाच्या बाबतींत मनास अकल्पित विशालता आल्याचा किंवा अनायासानें अलिप्तपणा, अनासक्ति व शांति यांचा सर्वांगांवर प्रभाव कायम झाल्याचें अनुभवास येतें. आणखी कांहींना स्वतःच्या ठिकाणच्या कार्यशक्तीला विशिष्ट वळण आणि अनेकांगीं क्षमता व सामर्थ्य लाभल्याचें लक्षांत येतें. अगदीं प्रथमच ज्या योगशक्तीस साधकानें आपलें समर्पण केलेलें असतें, तिचें कार्य त्यांच्या ठिकाणीं चालू झाल्याचा कोणत्या ना कोणत्यातरी स्वरूपांत त्यांना पडताळा मिळाल्याशिवाय रहात नाहीं.

येथें गूढवादाचाहि बराच प्रादुर्भाव आहे, म्हणजे आपणांस निश्चित काय म्हणावयाचें आहे, हें तितकेंसें आपल्या लिहिण्यावरून स्पष्ट होत नाहीं. गूढवाद म्हणजे कांहीं गुप्तता अथवा गुह्यता असें आपणांस म्हणावयाचें आहे कां ? तसेंच असेल तर सत्याला स्मरून मी सांगूं शकतों कीं, येथें तसें कांहींहि नाहीं. श्रीअरविंद व श्रीमाताजी यांच्या लिखाणाच्या रूपानें सर्व कांहीं सर्वांसमोर उघड उघड ठेवलेलें आहे. साधकाच्या मार्गावरील संभाव्य अशा बहुतेक सर्व अडचणी व त्यांतून बाहेर पडण्यासाठीं लागणारें मार्गदर्शन, सर्व कांहीं श्रीअरविंदांच्या हजारों पत्रांतून व श्रीमाताजींच्या प्रवचनांतून उघडपणें त्यांनीं सांगून टाकलेलें आहे. सर्वकांहीं उघड, स्वच्छ आणि ज्यांना जरूर आहे त्यांना सहजासहजीं हातीं येण्याजोगें आहे. पण जर गूढवाद म्हणजे, साधकाच्या साधनेंतील प्रगति व फलनिष्पत्ति माणसाच्या तर्कनिष्ठ मनासमोर तपासण्यासाठीं मांडली जात नाहीं, असा अर्थ असेल, तर मी म्हणेन कीं, हो, तसें आहेच; कारण तसें असण्याशिवाय गत्यंतरच नाहीं. कारण जो जाणिवेचा प्रांत उघड उघड तर्कशक्तीच्या आवांक्याबाहेर आहे, त्यांतील अनुभूतींचा छडा लावून, त्यावर तर्कशक्ति अभिप्राय देऊं शकेल, अशी अपेक्षा कशी करतां येईल ? एवढेंच कशाला, आपल्या नित्याच्या सामान्य व्यावहारिक जीवनामध्यें सुद्धां, अशा कांहीं हृदयींच्या भावभावना असतात, कीं त्या तर्कबुद्धीपुढें न ठेवतां आपण खऱ्या मानतों. अस्तित्वाचें खरें क्षेत्र इतकें मोठें आहे कीं, तर्कशक्तीच्या इवल्याशा क्षुद्र वर्तुळांत तें कोंडून राहूं शकत नाहीं; वर, खालीं व सर्व बाजूंनीं, या बुद्धीच्या मर्यादित क्षेत्राहून तें फार फार अफाट आहे. तर्कशक्तीहून दुसऱ्या उच्चतर व सूक्ष्मतर अशा शक्ती विकसित झाल्यावरच, त्यांच्याद्वारां या विशाल क्षेत्राची थोडीबहुत कल्पना येऊं शकते, एरवीं नाहीं; आणि जेव्हां एखाद्यास या उच्चतर व गाढतर सत्याचा थोडासा कां होईना संस्पर्श घडतो व इतरांनाहि तसाच संस्पर्श झाल्यानंतर दोहोंचे परस्पर अनुभव जेव्हां जुळतात, तेव्हां त्याच्या सत्यत्वाविषयीं अधिक वेगळा पुरावा शोधण्याची गरजच उरत नाहीं. या दृष्टीनें पाहिलें तर जो जो योगमार्ग मुख्यतः जाणीवशक्तीवर किंवा चेतनाशक्तीवर आधारलेला असतो व ज्याचें कार्य चेतनेवर होत असतें, तो तो योग-मार्ग 'गूढवाद' या सदरांत पडणारच. एवढेंच कशाला, उच्च कोटीची कला व काव्य यां-मधीलहि बहुतांश भागाचें स्वरूप कांहींसें 'गूढवादा'सारखेंच असतें. त्यांमध्यें सत्याच्या कांहीं अंगांचें, स्वरूपाचें, ओझरतें दर्शन घडलेलें असतें; आणि तें दर्शन मानवी बुद्धीच्या चौकटींत स्वतःला अडकवून न घेतां, स्वतःच्या आविष्कारासाठीं विशिष्ट आकार धारण करतें. तसेंच याहि विषयाचें आहे.

३. "एकादा अगदीं अज्ञ अथवा अगदीं सामान्य मनुष्य हा योगमार्ग स्वीकारूं इच्छील, तर त्याला स्वाभाविक अशी साधनापद्धति अथवा साधनाक्रम तेथें असल्याचें दिसलें नाहीं. हा मार्ग स्वीकारावयाचा, तर त्याची पूर्वतयारी म्हणून कांहीं विशेष साधना आवश्यक असल्याचें दिसतें. सर्व कांहीं श्रीमाताजींच्या स्वाधीन करावें लागतें, त्यांना शरण जावें लागतें, स्वाभाविक कार्यक्षेत्र वा सेवाकर्म सोडून द्यावें लागतें; साधना करण्यासाठीं पाँडीचेरीस वरचेवर जावें लागतें अथवा तेथें रहावें लागतें; आपल्या कुटुंबाचा व कौटुंबिक जीवनाचा त्याग करावा लागतो."

एका दृष्टीनें पाहतां, उलट हा योगमार्ग सर्वांत सुलभ असा योगमार्ग आहे. ही योगसाधना कोणीहि करूं शकतो; मग तो कोठेंहि असो, वा कोणीहि असो. कांहीं विशेष पूर्वतयारीची, आपण म्हणतां त्याप्रमाणें, गरज लागत नाहीं. व्यक्तीचा कसाहि स्वभाव असो, कशीहि मनोवृत्ति असो, कोणतेहि संस्कार अथवा वळण असो, त्या व्यक्तीला या योगांत कांहीं मार्ग मिळतो. जर कशाची जरुरीच असेल, तर ती म्हणजे पायाभूत अशी श्रद्धा हवी कीं, आपणांमध्यें भगवदंश असून भगवच्छक्तीचा वास सर्वत्र, वर, खालीं, सभोंवतीं नित्य आहे; आणि हें दिव्यत्व जाणून त्याचा आपल्याठिकाणीं अधिकाधिक आविष्कार होऊं द्यावयाचा, हाच मानवजीवनाचा खरा अर्थ व उद्दिष्ट आहे. याचाच अर्थ, प्रथम दिव्यतेची जाणीव करून घ्यावयाची, नंतर ती वाढत वाढत दिव्यतेचें ज्ञान व्हावयाचें व शेवटीं त्या दिव्यतेशीं एकरूप व्हावयाचें; आणि तेंहि जीवनाच्या सर्व पातळीवर व जीवाच्या सर्व अंशांमध्यें. हा आहे श्रीअरविंदप्रणीत योगमार्ग. या मार्गाचें मुख्य वैशिष्ट्य हें आहे कीं, त्याचें क्षेत्र, त्याचीं साधनें आणि उद्दिष्ट या बाबतींत तो अत्यंत विशाल, सर्वसमन्वयात्मक आहे; अर्थात् इतरहि कांहीं वैशिष्ट्यें आहेतच. शिवाय व्यक्तीस स्वतःचा विकासक्रम अनुसरण्यास या योगांत पूर्ण स्वातंत्र्य असतें; हें या योगमार्गाचें अद्वितीय असें वैशिष्ट्य आहे. याच कारणासाठीं, साधकांकरतां कांहीं विशिष्ट आचारांची विधिनिषेधात्मक नियमावलि, कार्यक्रम, वेळापत्रक इत्यादि येथें कोणावरहि लादलेलें नाहीं. सर्वसामान्य रूपरेखात्मक साधनाक्रम घालून दिलेला असून, पूर्णयोगाची साधना करणाऱ्या कोणासहि तो सारखाच आहे. उदाहरणार्थ, श्रद्धा, अभीप्सा व त्या अभीप्सेस अनुपकारक आणि विघातक जें जें असेल त्या सर्वांचें वर्जनार्थ प्रतिसारण आणि भगवंतास आत्मसमर्पण––या गोष्टी सर्वांनाच सारख्या, पायाभूत या दृष्टीनें महत्त्वाच्या व आचरणीय आहेत. ध्यान, एकाग्रता व कर्म यांपैकीं कोणतेंहि एकादें अथवा सर्व एकत्रित, हीं या मार्गाचीं साधनें आहेत. मदतीसाठीं हांक मारावयाची, त्याला परमेश्वराच्या कृपाशक्तीकडून प्रतिसाद मिळावयाचा व साधनेस आधार लाभावयाचा; म्हणजेच स्वप्रयत्न आणि भगवत्कृपा ही पद्धति आहे. एकाद्याचा स्वभाव रजोगुणप्रधान असेल व कर्माकडे अधिक प्रवृत्ति असेल, तर त्या प्रवृत्तीस अनुसरून या मार्गावर चालण्याकरतां, 'कर्म' हें साधन तो निवडूं शकतो. करण कर्मद्वारांच त्याच्या प्राण, मन, शरीर यांच्या सर्व क्रिया तो परमेश्वरासन्मुख वळवूं शकतो अथवा कोणी मूलतः चिंतनशील स्व ावाचा असेल, तर तो एकाग्रता, ध्यान अथवा स्वाध्याय या साधनांनीं अधिक सुलभतेनें या मार्गावर प्रगत होऊं शकतो. मुख्य उद्देश हा कीं, स्वभावानुकूल व संस्कारानुकूल अशा कोणत्यातरी साधनद्वारां आजची बाह्यवर्ती वृत्ति, बाह्यवर्ती जाणीव अंतर्मुख करून,

प्रयत्नसातत्यानें तिला शुद्ध, सूक्ष्म आणि अतिव्यापक करीत जाऊन, शेवटीं ती गाढतर, उच्चतर बनवून तिला अधिक उच्चदर्जाची पातळी मिळवून द्यावयाची व असें करत करत शेवटीं तिचें रूपांतर दिव्य भगवच्चेतनेंत करावयाचें.

अर्थात् हें उघडच आहे कीं, या योगाची साधना करण्यासाठीं पाँडीचेरीस यायला पाहिजे किंवा आश्रमीय झालें पाहिजे अशी गरज नाहीं. जो कोणी जेथें असेल, तेथें राहूनहि, ही योगसाधना तो करूं शकेल. हा प्रश्न केवळ, आंतरिक जीवनाची वाढ व सुप्रतिष्ठित रचना करण्याचा, आहे; आणि म्हणून जोंवर कोणी साधक या उद्देशास अनुकूल असें वातावरण वा परिस्थिति आपल्याभोंवतीं निर्माण करूं शकत असेल अथवा स्वाभाविकतःच त्यास अनुकूलता लाभली असेल, तर सर्व कांहीं, कुटुंब वगैरे सोडण्याची मुळीं सुद्धां जरूरी नाहीं. निरंतरचें कामधाम व व्यवसाय करीत असतांनाहि योगसाधना होऊं शकेल; कारण आंतरिक त्यागाची, वैराग्याची आवश्यकता आहे, बाह्य नव्हे. योगमार्गाचा बराच प्रवास केल्यानंतरच फक्त विशिष्ट अवस्थेंतच केवळ, इतर अनेक कारणांकरितां—ज्यांचा अधिक उहापोह येथें करण्याची जरूरी नाहीं—साधकानें आश्रमांत येऊन राहणें आवश्यक होत असतें. ज्या दिव्य शक्तीनें साधकाच्या ठिकाणीं ध्येयाचें बीजारोपण केलें आहे, तिच्या दिव्य सान्निध्याची या अवस्थेंत अतिशय आवश्यकता असते. आश्रमीय म्हणून जेव्हां श्रीमाताजी एखाद्याचा स्वीकार करतात, तेव्हां त्या साधकाची भौतिक व आध्यात्मिक दोन्हीं बाबतींत जबाबदारी त्या स्वतःवर घेतात हें गृहीत असतें. भौतिक जीवनांतील रास्त अशा गरजेच्या सर्व गोष्टी पुरविल्या जातात व त्यामुळें निर्वेधपणें साधनेकडे सर्व लक्ष केंद्रित करण्यास साधक पूर्ण मोकळा राहतो. अर्थात् अशा परिस्थितींत साधक आपल्याजवळ जें कांहीं भौतिक सर्वस्व असेल, तें श्रीमाताजींच्या स्वाधीन करतो ही गोष्ट अगदीं स्वाभाविकच ठरते. जें कांहीं स्वतःपाशीं आहे तें श्रीमाताजींना देणें हें जें समर्पणाचें बाह्य स्वरूप, तें केवळ, तो आपलें सर्व अस्तित्व श्रीमाताजींच्या उच्चतर भगवच्छक्तीच्या हातीं देण्यास, म्हणजेच अधिक कठीण असें आंतरिक समर्पण करण्यास तयार असल्याचें एक चिह्न म्हणूनच असतें हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

मा. पुं. पंडित.

---

एकादें काम सुरू करून तें अर्धवट सोडून, दुसरें एकादें काम दुसरीकडे सुरू करावयाचें, ही संवय तितकीशी हितकर नाहीं.

५-७-१९५९.

—श्रीमाताजी.

# ज्योतिषां ज्योतिः ।

"God shall grow up while the wise men talk and sleep;
For man shall not know the coming till its hour
And belief shall be not till the work is done."

SRI AUROBINDO.—*Savitri*

श्रीअरविंद व श्रीमाताजी हे दोघेहि 'एक' आहेत व जें 'एक' आहे, तें या 'दोघां'मध्यें विभक्त झालें आहे. श्रीअरविंद म्हणतात, "Ours is One Divine Consciousness divided into two for the sake of play." एकच दिव्य चेतना आम्हां दोघांच्या रूपानें भागवत लीलेसाठीं विभक्त झाली आहे.

यांची आहे, एकच अविभाज्य अस्मिता; यांचें आहे, एकच दिव्य चैतन्य ! श्रीअरविंद व श्रीमाताजी हे आध्यात्मिक सहकारी (Spiritual Collaborators) आहेत. श्रीमाताजींनीं एकदां म्हटलें होतें, "Without him, I have no existence and without me, he has no manifestation.—श्रीअरविंदांशिवाय मला कांहींच अस्तित्व नाहीं व माझ्याशिवाय त्यांनाहि मुळींच अभिव्यक्ति नाहीं". तद्वतच, एक स्थितीय आहे, तर दुसरें गतीय आहे. श्रीअरविंदांनीं सतत तीन तपांचा प्रदीर्घ काळ एकांतांत घालविला. कठोर तपस्या करून व चेतनेच्या सूक्ष्म स्तरांवर एकामागून एक विजय संपादन करून, अतिमानस (Supramental) चेतनेची सर्वक्षमता, सर्वशक्यता, सर्व इष्टता त्यांनीं अर्जन केली. बाह्यतः निष्क्रिय (Static) राहूनहि मानवजातीकरितां त्यांनीं प्रचंड स्वरूपाचें कार्य केलेलें आहे. बाह्यतः कांहींहि न करतां वास्तविक सर्व कांहीं करणारा संन्यासी आणि बाह्यतः सर्व कांहीं करूनहि वास्तविक कांहींहि न करणारा योगी—गीतेमधील या दोन प्रकारच्या कार्यप्रणालींशीं आपला परिचय आहेच. त्याचप्रमाणें श्रीअरविंदांनीं अर्जन केलेल्या सर्व क्षमतांना (potentialities) प्रत्यक्षांत परिणत करण्याची प्रचंड उलाढाल श्रीमाताजींनीं केली. आश्रमाचें संगठन व संचालन ह्या गोष्टी तर त्यांना अव्याहतपणें कराव्या लागतातच; परंतु त्यांच्या अमोघ दिव्य शक्तीवर विसंबून राहणाऱ्या व सर्व जगभर विखुरलेल्या जिज्ञासू व साधक-भक्तांना आंतरिक व बाह्य प्रकारचें मार्गदर्शन करून, त्यांच्या अंतर्बाह्य जीवनाचा गाडा सुरळीत चालू ठेवण्याचें कार्यदेखील त्या अहोरात्र, अविरत व अक्लान्तपणें करीत आहेत.

श्रीअरविंद व श्रीमाताजींचें हें दिव्य युगल शिव-शक्तीच्या प्रतीकानें अधिक सुबोध होऊं शकेल. शिवाच्या वक्षःस्थलावर काली नृत्य करीत आहे आणि कालीच्या पायाखालीं निश्चेष्ट पडून शिव तिला आधार देत आहे. शिवाचा आधार नाहींसा झाला कीं काली खोल गर्तेंत जाऊन पडेल आणि काली नसली तर हें विश्वमय तांडवनृत्य होणें कदापि शक्य होणार नाहीं.

श्रीअरविंदांनीं याचें वर्णन आपल्या 'सावित्री' महाकाव्यांत मोठ्या मार्मिकपणें केलें आहे :—

There are Two who are One and play in many worlds;

.................................................................................

He moves there as Soul as Nature She.

.......................................................................

The Two who are one are the secret of all power,
The Two who are one are the might and right in things.
Happy, inert he lies beneath her feet :
His breast he offers for her cosmic dance
Of which our lives are the quivering theatre,
And none could bear but for his strength within,
Yet none would leave because of his delight.

* * *

श्रीमाताजींचा जन्म फ्रान्स देशांत पॅरिस येथें झाला. लहानपणापासूनच त्यांना होणाऱ्या आध्यात्मिक अनुभूती त्यांच्या Prayers and Meditations या पुस्तकांत आपल्यास पहावयास मिळतात. भारताविषयीं त्यांना वाटणारी आंतरिक ओढ फारच तीव्र व उत्कट होती. त्यांना होणाऱ्या अनुभूतीमध्यें एक धीरगंभीर शांत मूर्ति त्यांचें पथप्रदर्शन करीत असे. २९ मार्च १९१४ ला जेव्हां श्रीमाताजींनीं श्रीअरविंदांना प्रथम पाहिलें, तेव्हांच त्यांनीं आपल्या त्या पथप्रदर्शक मूर्तीला ओळखलें आणि त्यांच्या मुखांतून स्वयंस्फूर्त अशी प्रार्थना निसृत झाली. ही प्रार्थना आज Radha's Prayer म्हणून प्रसिद्ध आहे. तींत श्रीमाताजी म्हणतात,

"माझ्या अस्तित्वाचा स्वामी, माझा देवाधिदेव तूंच आहेस, याचें प्रथमदर्शनींच मला ज्ञान झालें. तूं माझ्या आत्मदानाचा स्वीकार कर. तुझेच आहेत माझे सर्व विचार, माझ्या सर्व भावना, माझ्या हृदयांतील सर्व भाव, माझ्या सर्व संवेदना, माझ्या जीवनांतील सर्व क्रिया, माझ्या शरीरांतील पेशीन् पेशी, माझ्या रुधिराचा थेंब न् थेंब. मी सर्वस्वी, सर्वांगांनीं केवळ तुझीच आहे, निःशेषतया तुझीच. मीं जें व्हावें अशी तूं इच्छा करशील तें मी होईन. जीवन अथवा मृत्यु, सुख वा दुःख, हर्ष वा क्लेशभोग, यांतील तूं जें कांहीं माझ्यासाठीं पसंत करशील तें, तुझ्याकडून आल्यामुळें मला स्वागतार्हच वाटेल. तूं दिलेली कोणतीहि देणगी, परम अत्यानंद घेऊन येणारी दिव्य देणगीच मला वाटेल."

श्रीअरविंदाच्या पूर्णयोगाचें (Integral Yoga) पायाभूत तत्त्व जें 'समर्पण' (Surrender) त्याची गुरुकिल्ली या प्रार्थनेंतल्या प्रत्यक्षानुभूतींत आहे. श्रीअरविंद व श्रीमाताजींचा दृष्टिकोन एक, त्यांचे अनुभव एक व क्रमविकासाच्या आविष्करणांत स्पष्ट होणारें जगाच्या भवितव्यतेचें चित्र एक ! एकमेकांना प्रत्यक्ष भेटण्यापूर्वी त्यांनीं केलेल्या लिखाणांत या म्हणण्याचें मूर्तिमंत प्रत्यंतर आपणांस दिसतें.

* * *

श्रीअरविंद बालपणापासून इंग्लंडमध्यें वाढले. पाश्चात्य संस्कृति त्यांनीं आत्मसात् केली. मायदेशांत परत आल्यावर वेदोपनिषदांवर आधारलेल्या महान् संस्कृतीचेंहि त्यांना दर्शन झालें. म्हणूनच श्रीअरविंदांचा सर्व प्रयास म्हणजे, असा एक आत्यंतिक समन्वय कीं ज्यांत पूर्व व पश्चिम, पुरातन व नूतन, प्राचीन व अर्वाचीन, संत व सायंटिस्ट, आध्यात्मिक व अधिभौतिक, स्वर्ग व पृथ्वी यांचें मीलन होऊनच यांतून अतिमानवाची नवी सृष्टि निर्माण व्हावी. डॉ. शिशिर कुमार मैत्रांच्या Meeting of the East and West in Sri Aurobindo's Philosophy या पुस्तकांत आलेलें तत्संबंधीचें तात्विक विवेचन याच दृष्टीनें वाचनीय आहे.

श्रीअरविंद म्हणाले : सच्चिदानंद ब्रह्म (Existence-Consciousness-Bliss) आत्मानंदासाठी (Self-delight) स्वतःला स्वतःमध्यें अभिव्यक्त करतें झालें. अभिव्यक्तीच्या या क्रमविकासामध्यें, जडामध्यें प्राणचेतनेचें अवतरण होऊन जीवसृष्टि झाली आणि जीवसृष्टीमध्यें मनोमय चेतनेचें अवतरण होऊन मानव-सृष्टि झाली. मानवप्राणी हा या क्रमविकासाच्या वरच्या पायरीवर सध्या उभा आहे. मनुष्य आहे पृथ्वीवरील राजा, सर्वेसर्वा ! आणि मन आहे, त्याचें संचालन करणारी चेतना. मनाच्या पलीकडे अशी एक चेतना आहे, जिला श्रीअरविंद अतिमानस चेतना म्हणतात. तर या अतिमानस चेतनेचें मानवामध्यें अवतरण करावयाचें आणि तिला या पृथ्वीवरच स्थायी रूपानें प्रस्थापित करावयाचें. तिच्या रूपांतरकारी प्रभावानें मानवाची त्रिविध अस्मिता—मन, प्राण व शरीर—यांचें रूपांतर होऊन अतिमानवाची (Superman) नवी जाति-देवजाति-निर्माण होईल.

वरील ध्येय कार्यप्रवण करण्यासाठी श्रीअरविंद व श्रीमाताजींनीं एक आध्यात्मिक प्रयोगशाळा काढली. होय, आश्रम दुसरें तिसरें कांहीं नसून केवळ एक प्रयोगशाळा आहे. येथें सर्व मानवतेचे प्रतिनिधी अंशरूपानें आणलेले आहेत. निरनिराळ्या धर्मांचे, निरनिराळ्या वंशाचे, जातीचे, राष्ट्राचे लोक म्हणजे पर्यायानें निरनिराळ्या भाषा बोलणारा समस्त मानव-समाज येथें एकत्रित झालेला आहे आणि हे परम वैज्ञानिक, सूक्ष्म प्रकारच्या अगणित संमिश्रण-द्वारां (Permutations and Combinations) मानवाच्या आंतरिक, गूढ व सूक्ष्म अशा अस्मितेच्या क्षेत्रांत नाना प्रकारचे प्रयोग करीत आहेत.

सतत चाळीस वर्षांच्या अविश्रांत प्रयोगानंतर श्रीअरविंदांनीं त्या ज्योतीला पृथ्वीवर आणलेलें आहे; तिचा प्रथम प्रकाश श्रीअरविंदांच्या मृत्यूसमयीं सर्व जगानें बघितला. मृत्यू-नंतरहि १११ तास श्रीअरविंदांचें शरीर या ज्योतीच्या प्रभावामुळें जिवंत राहूं शकलें. श्रीअरविंदांनीं अगोदरच सांगून ठेवलें होतें :—

A seed shall be sown in Death's tremendous hour.
A branch of heaven transplant to human soil;

अजूनहि अजिंक्य असणाऱ्या मृत्यूला जिंकण्याकरितां, त्याच्याशीं प्रत्यक्ष युद्ध करून त्यावर चिरकालाकरितां विजय प्राप्त करण्यासाठीं श्रीअरविंदांनीं मृत्यूच्या दाढेंत स्वेच्छेनें उडी घेतली आहे. बालकृष्णानें कालियाच्या डोहांत जशी स्वेच्छेनें उडी घेतली होती. तशीच ही घटना आहे. जगाचा उद्धार करण्यासाठीं या अवनीवर अवतरलेल्या दिव्य पुरुषानें जगाच्या सर्व

वेदना स्वतःच सर्वप्रथम सहन केल्या पाहिजेत, प्रत्यक्ष मृत्यूदेखील स्वतःवर ओढवून घेतला पाहिजे ही अवतारवादाची मूलभूत कल्पना आहे.

He who would save the world must be one with the world,
All suffering things contain in his heart's space
And bear the grief and joy of all that lives.
He must enter the eternity of Night
And know God's darkness as he knows his Sun.
For this he must go down into the pit,
For this he must invade the dolorous Vasts.

रुद्राचें मानवजातीवर असलेलें कर्ज श्रीअरविंदांनीं स्वतःचें बलिदान देऊन फेडलें आहे; अन् त्यामुळेंच अतिमानस चेतनेची अभिव्यक्ति अवघ्या सहा वर्षांच्या—१९५० ते १९५६—अवधींतच शक्य होऊं शकली.

२९ फेब्रुवारी १९५६. या दिवसापासून अतिमानस ज्योतीचा प्रकाश क्रमशः विकास पावत आहे. ही तारीख जणुं कांहीं अज्ञाताच्या दिनदर्शिकेंत पूर्वीच लिहून ठेवली होती. A date is fixed in the calender of the Unknown. आज 'इदं श्रेष्ठं ज्योतिषां ज्योतिः आगात्' अशी घोषणा केली गेली आहे आणि दशदिशांना हा संदेश दिलेला आहे, "The manifestation of the Supramental upon earth is no more a promise but a living fact, a reality.

It is at work here, and one day will come when the most blind,the most unconscious, even the most unwilling shall be obliged to recognise it.

* * *

आज २९ फेब्रुवारी १९६० ! चार वर्षानंतर आज अतिमानस प्रकाशाच्या अभिव्यक्तीचा प्रथम वार्षिकोत्सव ! आज आश्रम हजारों दर्शनार्थी भक्तमंडळींनीं गजबजून गेला आहे. ध्यानगृहामध्यें ( meditation hall ) एक अद्‌भुत सुवर्णमंदिर तयार केलेलें आहे. तेथील सिंहासनावर सुवर्णवस्त्रें परिधान करून जगज्जननी बसणार आहे व आपल्या संतानांना रूपांतराचा आशीर्वाद देणार आहे. आश्रमाचें केंद्रीय भवन, आश्रमाचा प्रत्येक कोंपरा न् कोंपरा, आश्रम प्रांगणांतील वृक्षलता सर्व कांहीं प्रकाशित करण्यांत आलीं आहेत. दीपमाळांची आरास आणि नीरांजनांची आभा समस्त अवकाशाला आलोकित करीत आहे. प्रकाश, प्रकाश, प्रकाश !!! गहन शांतीची सुमधुर सनई मांगल्यगीतें गात आहे आणि तशांत श्रीमाताजींची वाणी वातावरणांत सतत गुंजत आहे :—

Lord, Thou hast willed, and I execute :
A new light breaks upon the earth,
A new world is born.
The things that were promised are fulfilled.

आजचा अपूर्व सोहळा केवळ वर्णनातीत आहे. भगवंताचे विराट् स्वरूप पाहून 'अदृष्ट-पूर्वं हृषितोऽस्मि' असें म्हणतांना अर्जुनाची व 'तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः, असें म्हणतांना संजयाची जी अवस्था झाली, तीच अवस्था आज येथल्या प्रत्येकाची झाली आहे. स्वर्गीय आनंदाच्या विशाल स्रोतांमध्यें प्रत्येक-जण आज अक्षरशः डुंबत आहे.

ही पुण्यपावन व युगप्रवर्तक घटना घडत असतां आजच्या या शुभमंगल दिवशीं, हे विश्व-जननी श्रीमां, हे देवाधिदेव श्रीअरविंद, माझ्या समस्त सत्तेचे अर्घ्य आणि माझ्या समस्त वसुंधरेचा अणुरेणु हर्षोत्फुल्ल हृदयानें प्रणामांजलि अर्पण करीत आहे आणि म्हणत आहे :—

ॐ नमो नमः श्री मीराम्बिकायै ।
ॐ नमो भगवते श्रीअरविंदाय ।
श्री अरविंदः शरणं मम ।

—जयदेव

# आर्य

('आर्य' या मासिकाच्या नांवाचें स्पष्टीकरण करण्याकरतां श्रीअरविंदांनीं १९१५ सालीं हा लेख लिहिलेला असला, तरी तो आजहि उद्बोधक ठरेल.)

आर्य या नांवाचें काय महत्त्व आहे, हा प्रश्न अनेक दृष्टीनें विचारला जातो. आमच्या बऱ्याच युरोपियन वाचकांस मासिक-पृष्ठावरील हें नांव आपल्या स्वभावानुसार आकर्षक वा अनाकर्षक गूढाक्षराप्रमाणें भासण्याचा संभव आहे. हिंदी लोकांना हा शब्द चांगलाच परिचित आहे. पण या शब्दाचें जें महत्त्व त्यांच्या पूर्वजांना कळलें होतें, त्याला आज हिंदी लोक पारखे झाले आहेत. पाश्चात्य भाषाशास्त्रींनीं या शब्दाचें जातिवाचक संकेतांत रूपांतर केलें आहे; हा संकेत अज्ञात अशा मानव-वंशशास्त्रानुरोधानें ठरविलेला असून निरनिराळ्या विचारवंतांनीं त्याचीं निरनिराळीं मूल्यें ठरविलेलीं आहेत. अलीकडे मात्र भाषाशास्त्रज्ञांमध्यें कांहींजण असें कबूल करूं लागले आहेत कीं, मूलतः हा शब्द जातिवाचक अथवा वंशभेदवाचक मानला जात नसून, केवळ संस्कृति-वाचक होता; कारण ज्यांनीं स्वयं-संस्कृतीच्या एका विशिष्ट प्रकारचें, अंतर्बाह्याभ्यासाचें, आदर्शतेचें व ऊर्ध्वाकांक्षेचें अंगीकरण केलें, त्यांनाच वेदामध्यें आर्य ही संज्ञा दिली जाई. आर्यांचे देव म्हणजे, ईश्वरी अंशाप्रत जाणाऱ्या मानवाला त्याच्या लढयांत मदत करणाऱ्या आधिभौतिक शक्ती होत्या. प्राचीन मानववंशाच्या सर्व उच्च, ऊर्ध्व आकांक्षा, महत्तम धार्मिक वृत्ती, ध्येयवादी विचारांचे सूक्ष्म भाव या एका शब्दांत संकलित झाले आहेत.

त्यानंतरच्या काळांत आर्य शब्दानें एक नैतिक आणि आध्यात्मिक ध्येय सूचित होऊं लागलें. उत्कृष्ट रीतीनें शासित केलेलें आयुष्य, ऋजुता, सौजन्य, औदार्य, व्यवहारांतील सरळपणा, धैर्य, मृदुता, शुद्धि, मानवता, दया, निर्बलांचें रक्षण, मनाचा सरळपणा, सामाजिक कर्तव्यक्षमता, ज्ञानजिज्ञासा, विद्वान व थोर जनांविषयींचा आदर, समाज-कृतकृत्यता वगैरे गुणांचा समावेश या ध्येयांत होत असे. ब्राह्मण व क्षत्रिय वर्णांच्या ठिकाणीं वसत असलेल्या सद्‌गुणांचा तो उत्कृष्ट समुच्चय होता. या ध्येयापासून जें जें कांहीं दूर असे, जें जें कांहीं अकुलीन, हीन, मलिन, उद्धट, निर्दय अथवा असत्य वगैरे दुर्गुणाप्रत जाऊं पाही, त्या सर्वांचा अनार्य म्हणून संबोध होई. मानवी शब्दकोशांत, याहून अधिक उज्ज्वल इतिहास सांगणारा शब्द अस्तित्वांत नाहीं.

भाषाशास्त्राच्या तुलनात्मक अभ्यासाच्या प्रारंभ-कालांत त्यांतील तज्ज्ञ लोक जेव्हां शब्दांच्या इतिहासांत मानववंशाचा प्राचीन इतिहास शोधूं पहात असत, तेव्हां 'आर्य' हा शब्द 'अर्' –'नांगरणें' ह्या धातूपासून रूढ झाला आहे असें समजलें जात असें. वैदिक आर्य लोकांपैकीं वायव्येकडील कांहीं जणांना कृषिकर्माची आवड नव्हती व म्हणून ते गोपाल व मृगयाजीवि राहिले आणि त्यांच्यापासून जे विभक्त झाले, त्यांना 'आर्य' असें संबोधण्याचा प्रघात सुरू झाला असें या तज्ज्ञांचें मत पडलें. ह्या युक्तिवादामागें फारच थोडा—किंवा खरें म्हणावयाचें तर बिलकूलच पुरावा नाहीं. तरी देखील ही अर्थनिष्पत्ति आपण कबूल करण्यास

हरकत नाहीं. जो जो मानव परमेश्वरानें निर्माण केलेल्या 'क्षेत्राचें' अभिवर्धन करतो, त्याचें ओसाड रानांत रूपांतर होऊं देत नाहीं. किंवा त्यांतील बीजें तशींच राहूं देत नाहीं, तर उलट त्यापासून जितकी मिळवितां येईल तितकी संपदा मिळवितो, तो या आपल्या कर्मानें 'आर्य' म्हणवून घेण्यास पात्र होतो.

जर आर्य ही संज्ञा जातिवाचक असेल, तर तिचा उगम अर् = शक्ति अथवा शौर्य, अर् = लढणें या धातूपासून जास्त संभवतो. याच शब्दापासून शौर्य व युद्धप्रिय असणारी ग्रीक 'युद्ध-देवता'—Ares (Areios) 'आरेस्' हिच्या नांवाचा उगम शोधतां येतो. कदाचित् लॅटिन शब्द आरेत (arete) प्रमाणें प्रथम शारीरिक बल व शौर्य आणि तदनंतर नैतिक बल व उत्कर्ष दर्शविणाऱ्या व्हिर्चुस् virtus सद्‌गुण या शब्दांत 'आर्य' चा उगम शोधणें जास्त संभवनीय होईल. आर्य शब्दाचा आणखीहि एक अर्थ आपणांस ग्राह्य असण्यास कांहीं हरकत नाहीं. तो म्हणजे उदात्त प्रज्ञेसाठीं झगडणारे वीर. कारण प्रज्ञा शब्दामध्यें नुसती निवडच येते असें नाहीं, तर त्याबरोबरच उत्कृष्ट, अत्यंत उदात्त, प्रदीप्त व दैवी गोष्टींच्या ज्ञानाचाहि समावेश त्यामध्यें होतो. सर्व वस्तूंचें ज्ञान व वस्तुमात्राबद्दल वाटणारी भूतदया, वात्सल्य व आदर असाहि त्याचा निःसंशय अर्थ होतो. बाहेरून अगदीं क्षुद्र, कुरूप, अथवा अप्रकाशित दिसणाऱ्या गोष्टीमध्यें देखील विश्वदेवता स्वेच्छया सर्व भूतांमध्यें सारखीच वास करते असा भाव असल्यामुळें त्याला सर्वांबद्दल दया अथवा आदर वाटत असतो. प्रवृत्तिधर्म हा वैयक्तिक निवडीचा प्रश्न आहे, परमेश्वरी अंशाला दडवून ठेवणाऱ्या गोष्टींना लाथाडून, उलट तो अंश अभिव्यक्त करणाऱ्या गोष्टींची ती निवड आहे. ही निवड करणें म्हणजे एक लहानसा लढा लढण्यासारखें आहे. ही निवड सहजासहजीं करतां येत नाहीं किंवा अनायासें दुसऱ्यावर लादतांहि येत नाहीं.

म्हणून ज्यानें तो मार्ग पत्करला, दैवी किल्ला टप्प्याटप्प्यानें वर चढण्याची ज्यानें आकांक्षा धरली, कशाचीहि तमा बाळगली नाहीं, अपयश किंवा अडथळा यांमुळें जो स्तंभित झाला नाहीं अथवा तें उद्दिष्ट आपल्या बुद्धीच्या अतिशय आवांक्याबाहेर आहे म्हणून किंवा आपल्या प्रभावापेक्षां अतिशय उच्च आहे, आपली शक्ति व धैर्य यांहून महत्तम आहे म्हणून ज्याचें पाऊल मागें येत नाहीं तोच आर्य, तोच ईश्वरी प्रभावासाठीं लढणारा वीर, यशस्विन्, श्रेष्ठ मनुष्य, आरिस्तोस (Aristos) उत्तम. गीतेंत सांगितलेला 'श्रेष्ठ' तोच होय.

वस्तुतः अगदीं मूलार्थाबद्दल बोलावयाचें झाल्यास, आर्य म्हणजे प्रयत्न अथवा उत्थान अथवा उल्लंघन. आंत किंवा बाहेर मानवी उत्क्रांतीच्या जें जें आड येऊं पाहतें, त्या सर्वांचें जो परिशीलन करतो, त्यासाठीं सतत परिश्रम करतो तोच आर्य. स्वतःला जिंकणें हा त्याचा पहिला स्वभावधर्म असतो. पार्थिव वस्तू व शरीर यांच्यावर जय मिळवून, त्यांचा स्वभावसुलभ असा मंदपणा, जडता, निर्जीव यांत्रिकता व तामसिक बंधनें यांचें तो कांहींएक चालूं देत नाहीं. प्राण व त्याच्या शक्ती यांच्या क्षुधा-तृष्णेचा आपल्यावर पगडा बसूं देत नाहीं अथवा त्याच्या राजसिक वासनांच्या अंकित होत नाहीं. मन व त्याच्या संवयी यांच्यावर तो विजय मिळवितो; अज्ञान, अनुवंशिक दुराग्रह, परंपरागत विचार, मानवी सुखदायी मतें यांच्या कोशांत तो अडकून पडून रहात नाहीं, तर उलट कशाचें अन्वेषण करावें, निवड कशी करावी हें त्याला चांगलें ठाऊक असतें; आणि ज्याप्रमाणें त्याची इच्छाशक्ति बलयुक्त व

अचल असते, तशी त्याची मतिसुद्धां विशाल व नमनशील असते. कारण प्रत्येक ठिकाणीं सत्य, प्रत्येक बाबतींत योग्यायोग्य, प्रत्येक वस्तूंत उन्नय व विमुक्ति तो शोधीत असतो.

स्वयंपूर्णता हा त्याच्या आत्मजयाचा हेतु असतो. म्हणून जें जें कांहीं तो जिंकतो त्याचा तो नाश करीत नाहीं, तर उलट त्याचा उत्कर्ष करतो, तें पूर्ण करतो. त्याची ही पक्की भावना असते कीं, शरीर, प्राण व मन या गोष्टी, त्यांच्याहून उच्चतर गोष्टी मिळविण्यासाठीं त्याला दिलेल्या आहेत व म्हणून त्यांचीं बंधनें न जुमानतां, त्यांच्या अल्पसुखांचा अव्हेर करून त्या सर्वांच्या पलीकडे आपण गेलें पाहिजे, त्या सर्वांच्यावर विजय मिळविला पाहिजे. शिवाय हेंहि तो जाणतो कीं, जग शून्यवत् करून टाकणें हें कांहीं परमतत्त्व नाहीं; तर उलट तें परमतत्त्व जगांत अधिकाधिक प्रकट करावयाचें आहे. ईश्वरी इच्छा, चेतना, प्रेम, सौंदर्य इत्यादिकांचा प्रवाह, त्याचा स्वीकार करण्यास समर्थ असलेल्या साधकाच्या जीवनाच्या अधोवृत्तींतून, त्याच्या जीवनाच्या परिसरांतून वहात राहतो. त्या परम चैतन्याचाच तो दास, अभिलाषी व अन्वेषी असतो; आणि तें प्राप्त झाल्यावर आपल्या कर्माच्या, प्रेमाच्या, आनंदाच्या व ज्ञानाच्या द्वारें अखिल मानवजातीवर त्याचा वर्षाव तो करीत असतो. कारण आर्य हा सदैव कार्यकर्ता व योद्धा असतो. परमतत्त्वाच्या शोधांत किंवा सेवेंत शरीरानें वा मनानें झिजण्यांत तो बिलकूल कसूर करीत नाहीं, कुठल्याहि अडचणी टाळीत नाहीं किंवा परिश्रम थांबविण्यास कबूल होत नाहीं. स्वतःच्या हृदयांत किंवा बाह्य जगांत ईश्वरी साम्राज्याच्या आगमनासाठीं तो अहर्निश झटत असतो.

जो आर्य पूर्णतेस पोहोंचतो त्याला अर्हत् म्हणतात. जें परम चैतन्य विश्वाला पुरून उरतें, येवढेंच नव्हे, तर सर्व निरनिराळीं जगतें हीं ज्याच्या मूळ निर्मितीचे आनुषंगिक परिणाम अथवा मूळ क्रीडेच्या आनुषंगिक क्रीडा आहेत; अशा चैतन्याप्रत जाण्याची तो आंकाक्षा बाळगतो व अखेरीस तो तें मिळवितो. तें परम चैतन्य सर्व गोष्टींना पुरून उरणारें असूनहि तें विश्वमय आहे, एवढेंच नव्हे, तर विश्वांतील अणूरेणूंत भरून राहिलें आहे. अशा या चैतन्यांत तो आपल्या मर्यादित अहंकाराचा विस्तार करतो. आत्मज्ञान, प्रेम, आनंद इत्यादिकांच्या सर्वव्यापी शक्तींच्या योगानें तो सर्व सजीव व निर्जीव वस्तूंशीं एकतानता पावतो. तें चैतन्य परमोच्च व विश्वव्यापी असूनहि सृष्ट वस्तूंतील भगवंताच्या लीलेसाठीं, ज्ञानाच्या निरनिराळ्या भूमिका समजण्यासाठीं, ईश्वरी कार्यासाठीं, वरवर भासणाऱ्या वैयक्तिक मर्यादा तें मानीत असतें. अहंकारानें स्वतःचें रूपांतर अखेरीस ईश्वरी कार्याच्या व लीलेच्या एका विमुक्त केन्द्रांत करून घ्यावें येवढ्याचसाठीं त्याचें अस्तित्व असतें; त्या रूपांतराला लागणारी पुरेशी शक्तीहि त्याच्याठायीं असते. व्यक्तिमत्त्वाच्या पलीकडे गेल्यावर पुनः त्याला कवटाळणें हा शेवटचा पण दैवी स्वार्थत्याग आहे. सारांश, खरा परिणत अर्हत् तोच, कीं जो स्वतःच्या अस्तित्वाच्या सर्व भागांबरोबर एकतानता पावलेल्या त्रिगुण व त्रिविध ब्रह्माला विश्वाच्या रूपकामध्यें संपूर्णतया प्रतिबिंबित करण्यासाठीं जगताच्या दर्शनीं स्थितित्रयीमध्यें एकाच वेळीं राहूं शकतो, वरच्या शक्तीचें खालच्या पायरीवर ग्रहण करूं शकतो आणि खालच्या पातळीचें उच्च पातळीमध्यें उन्नयन करूं शकतो.

अनुवादक—वसंत केशव दोंदे, मुंबई —श्रीअरविंद

# श्रीमाताजींचीं प्रवचनें

–१–

## योगसाधनेचा संकल्प

(आश्रमांतील विद्यार्थ्यांसमोर दिलेलें एक प्रवचन)

श्रीअरविंदप्रणीत योगसाधना करावयाची म्हणजे स्वतःमध्यें आमूलाग्र बदल घडवून आणावयाचा. येवढेंच एकच ध्येय डोळ्यासमोर ठेवावयाचें. असा आमूलाग्र बदल आपणांस हवा आहे कीं नाहीं हें अंतर्यामीं तुमचें तुम्हांसच समजेल. जर असा बदल हवाच अशी आंतरिक निकड भासत नसेल, तर सद्भावना, सेवा, समजूतदारपणा इत्यादींनीं युक्त असें चांगलें जीवन जगण्याचा मार्ग तुम्हांस मोकळा आहे. अन्य मार्गांनीं तुमचें जीवन सत्कारणीं लागूं शकेल. परंतु अशारीतीनें व्यतीत केलेलें जीवन आणि योगमार्गाचा अवलंब करून व्यतीत केलेलें जीवन यांमध्यें अतिशय अंतर आहे.

योगसाधना करावी असें अंतःस्फूर्तीनें तुम्हांस वाटलें पाहिजे. योगसाधना करण्यासाठीं प्रथमतः योग म्हणजे काय, हें तुम्हीं समजावून घेतलें पाहिजे आणि मगच मनाचा निश्चय करावयास पाहिजे. एकदां निर्णय घेतल्यानंतर मात्र तुमच्यांत कांहींहि चलबिचल होतां कामां नये. या मार्गाचा अवलंब केल्यानंतर प्रत्येक गोष्ट तुम्हीं जाणीवपूर्वक केली पाहिजे. योगसाधना करावयाची, असें तुम्ही जेव्हां म्हणतां, तेव्हां तुमच्या मनानें निश्चितपणें कोणता निर्णय घेतला आहे याची तुम्हांस चांगली जाणीव पाहिजे. म्हणूनच तुमच्याशीं बोलतांना या गोष्टीवर मी जास्त भर दिला नव्हता. या बाबतींत मी बोललें आहे. पुष्कळ सांगितलें आहे. मी बोललें आणि तुम्हीं तें ऐकलें. परंतु माझ्या म्हणण्याचा मथितार्थ हा कीं, मीं जरी एकादें सर्वसाधारण विधान केलें असलें, तरी जेव्हां एखादी व्यक्ति, "मी योगसाधना करूं कां ?" असें विचारण्यासाठीं माझ्याकडे येते तेव्हां, 'होय' (किंवा आवश्यक असेल तर 'नाहीं') असें मी म्हणतें. कारण अशा व्यक्तींच्या बाबतींत त्यांचा जीवनक्रम, विशेषतः त्यांचें अंतर्याम आणि त्यांची आंतरिक स्थिति, हीं सर्वस्वीं भिन्न असतात.

येथें एक चेतनाशक्ति कार्यकारी आहे. ही चेतनाशक्ति तुमची स्थिति सुधारण्याचा सतत प्रयत्न करीत असते; तुमच्या प्रगतीच्या मार्गांतील अडथळ्यांस तोंड देण्यास तुम्हांस ती सिद्ध करते आणि तुमचे प्रमाद, तुमच्या चुका आणि तुमची अंधता यांवर तुम्हांस धडक मारण्यास लावते. परंतु ज्यांनीं योगमार्गाचा अवलंब करण्याचें ठरविलें आहे, त्यांच्याच बाबतींत हें सर्व घडून येतें. इतरांच्या बाबतींत प्रकाश, ज्ञान, प्रगति करविणारी शक्ति असें कार्य ही चिच्छक्ति करतें. तुम्हांला तुमच्या कर्तृत्वाच्या पराकोटीला पोहोंचतां यावें, हितावह वातावरणांत स्वतःची शक्य तेवढी प्रगति करून घेतां यावी अशारीतीनें ती कार्य करते; मात्र कोठलाहि निर्णय घेण्यास तुम्हांस पूर्ण मोकळीक असते.

तुमचा निर्णय अंतर्यामींतून आला पाहिजे. योग म्हणजे काय हें समजावून घेऊन, ज्यांनीं जाणीवपूर्वक योगमार्गाचा अवलंब केला आहे त्यांना, इतरेजन ज्या प्रकारचें जीवन जगतात त्यापेक्षां अगदीं निराळ्या भूमिकेवरील जीवन जगण्याचें मान्य करावें लागेल. कदाचित् बाह्यतः या दोन्हीं प्रकारच्या जीवनामध्यें फारसा फरक असणारहि नाहीं. परंतु आंतरिक दृष्टीनें मात्र त्यांत दोन ध्रुवांइतकें अंतर असेल. त्यांच्या जाणिवेमध्यें एक प्रकारची अशी नितांत श्रद्धा असते कीं, त्यामुळें अवलंबिलेल्या मार्गापासून ती साधकास विचलित होऊं देत नाहीं; केलेल्या चुका अशा परिणामकारकरीत्या दृग्गोचर होतात, कीं साधक फार काळ-पर्यंत आपली स्वतःची वंचना करूं शकत नाहीं. सर्वच गोष्टी एक प्रकारचें गंभीर स्वरूप धारण करतात.

म्हणून माझ्या मुलांनो, मला तुम्हांला सांगावेंसें वाटतें, जें मीं पुष्कळवेळां सांगितलें आहे आणि आतां पुनः सांगतें कीं, तुम्ही असाधारण प्रकारच्या अनिर्बंध स्वतंत्र वातावरणांत जीवन जगत आहांत. बाह्यतः तुमच्यावर कांहीं थोडींशीं मामुलीं बंधनें आहेत, कारण आपण संख्येनें पुष्कळ आहोंत आणि सर्व जग कांहीं आपल्या स्वाधीन नाहीं; म्हणून गोंधळ होऊं नये यासाठीं थोड्याफार शिस्तीचें बंधन आपण आपणांवर घालून घेतलेंच पाहिजे. पण आंतरिक रीत्या मात्र तुम्हांस विलक्षण स्वतंत्र जीवन जगण्यास येथें मोकळीक आहे; तुमच्या-वर सामाजिक बंधनें नाहींत, आचारविषयक बंधनें नाहींत, वैचारिक बंधनें नाहींत, विशिष्ट सांचेबंद दृढ अशीं तत्त्वें नाहींत, अशाप्रकारचें कांहीं एक येथें नाहीं. फक्त येथें आहे प्रकाश. जर या सर्वांचा तुम्हांला फायदा घ्यावयाचा असेल, तर तो तुम्हांस मिळेल. जर तुम्हांला तो नको असेल, तर तो न घेण्याचेंहि तुम्हांला पूर्ण स्वातंत्र्य आहे.

अतिशय कळकळीनें आणि खरोखरीची निर्णय घेण्याची ऊर्मि अंतर्यामीं उठेल, त्यावेळीं तो निर्णय तुम्ही घ्यालच. तेव्हां, मला असें म्हणावेंसें वाटतें कीं, सर्वच गोष्टी कांहीं निराळ्याच होतील. त्यावेळीं तुम्हांस प्रकाश दिसेल आणि प्रकाशाकडे जाणारा अगदीं सरळ-स्पष्ट असा मार्गहि दिसेल. मात्र तुम्हीं त्यापासून दूर जाऊं नये. अशी स्थिति कोणाचीहि वंचना करीत नाहीं. कोणीहि तिच्याबद्दल संदेह बाळगूं शकणार नाहीं. तुम्हीं येवढें मात्र ध्यानांत ठेवा कीं, योग म्हणजे कांहीं पोरखेळ नाहीं. जेव्हां तुम्ही योगमार्गाचा अवलंब करण्याचें ठरवाल तेव्हां, तुम्ही वस्तुतः काय करीत आहां याची जाणीव ठेवा. एकदां निवड केल्यावर मात्र त्यास चिकटून रहा; अढळ रहा. मग मात्र कां कूं करणें तुम्हांस शोभणार नाहीं. पुढें जाणें येवढेंच फक्त तुमचें कर्तव्य; बाकी कांहीं नाहीं.

चांगल्या रीतीनें कार्य करण्याची आंतरिक तीव्र इच्छा, प्रगतीसाठीं प्रयत्न, सर्वसाधारण मानवतेपेक्षां आयुष्यांत थोड्याशा वरच्या पातळीवर जाण्याची इच्छा येवढ्याच, मी तुम-च्याकडून जास्तींत जास्त अपेक्षा करीत आहे. असाधारण तेजस्वी, जागरुक, सुसंवादी आणि सद्भावनेनें परिप्लुत अशा वातावरणांत तुम्हीं वाढलां आहांत आणि वाढत आहांत. त्याचाच परिणाम म्हणून जें तेज, जो सुसंवाद आणि जी सद्भावना तुम्ही अनुभवीत आहांत, त्याचें तुम्हीं प्रतीक बनावें, हीच गोष्ट इष्ट आहे. असें झालें तरच कांहींसें चांगलें होईल.

या पृथ्वीवरचें आपलें अस्तित्व दुसरें तिसरें कांहीं करण्यासाठीं नसून केवळ योगसाधने-साठीं आहे आणि तेंच आपल्या जीविताचें एकमेव ध्येय आहे, असें जेव्हां एखाद्यास वाटेल,

तेव्हांच तो योग करूं शकेल; स्वभावपरिवर्तनयोग, म्हणजेच पूर्णयोग तो आचरूं शकेल. मग त्याला अविश्रांत श्रम पडले, यातना सोसाव्या लागल्या, धडपड करावी लागली, तरी त्याच्यावर त्याचा कांहीं विपरीत परिणाम होणार नाहीं. 'एकमेव साधना, दुसरें कांहीं नाहीं', अशी स्थिति असल्यावर सर्वच परिस्थिति निराळें रूप धारण करील. तशी तुमची स्थिति नसेल तर, सदैव समाधानी रहा; चांगले व्हा—चांगले म्हणजे अधिक समजूतदार—व्हा. असाधारण चांगल्या वातावरणांत तुम्ही वाढत आहां हें ध्यानांत ठेवा. उच्च, उदात्त आणि सत्यान्वेषी जीवन जगण्याचा यत्न करा. आणि तुम्हीं मिळविलेल्या ह्या उच्च चैतन्याचा, या उच्च प्रकाशाचा, या उदारतेचा अल्पांश, एकदा किरण तरी जगामध्यें व्यक्त करण्याचा प्रयत्न करा.

★

तुम्ही तुमचा वैयक्तिक आणि अहंतायुक्त हेतु साधण्यासाठीं कांहीं, पूर्णतेची आराधना करीत नाहीं, तर भगवंताचा आविष्कार करण्यासाठीं, आपलें सर्वस्व त्याच्या सेवेसाठीं वाहण्याकरितां, ती करीत आहां. केवळ स्वतःच पूर्णावस्था मिळवावयाची या उद्देशानें कांहीं तुम्ही योगसाधना करीत नसून, भगवंताची इच्छा पुरी करण्यासाठीं, त्याच्या कार्यासाठीं तुम्ही योग करीत आहां.

जोंपर्यंत वैयक्तिक आकांक्षा, वैयक्तिक वासना, अहंतायुक्त हांव तुमच्यापाशीं आहे, तोंपर्यंत तुमची स्थिति म्हणजे या सर्वांचें मिश्रण आहे. तिचें स्वरूप कांहीं एकदम, 'भगवत्-इच्छेचें' नाहीं. भगवंत, त्याची इच्छा, त्याचा आविष्कार, त्याची अभिव्यक्ति हीच सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. त्यासाठींच तुम्ही आहांत. तेंच तुम्ही आहांत दुसरें कांहीं नाहीं. जर मीपण, अहंता, व्यक्तित्व यांची तुम्हांला जाणीव असेल, तर त्याचा अर्थ, तुम्हीं जसें व्हावयास पाहिजे आहांत तसें तुम्ही नाहींत. योग्य ती स्थिति एकदमच प्राप्त होईल असें नाहीं; परंतु मी जें कांहीं सांगत आहे, अपेक्षीत आहे तें मात्र असें आहे.

पुष्कळ लोक, वस्तुतः बहुतेक लोक, अध्यात्माच्या या पातळीवर अनेक प्रकारचे वैयक्तिक हेतू मनांत धरून योगसाधना करतात; जीवनाविषयीं कांहीं एक जुगुप्सा निर्माण झाली म्हणून कांहीं दुःख कोसळलें म्हणून, कांहीं विशेष ज्ञान मिळावें म्हणून, कांहीं आध्यात्मिक दृष्टचा मोठें व्हावें म्हणून, तर कांहीं दुसऱ्यास कांहींतरी सांगतां यावें म्हणून शिकण्यासाठीं अशा अनेक वैयक्तिक कारणांनीं लोक योगसाधना करीत असतात; परंतु भगवंतानें आपला स्वीकार करावा व त्याचें जें काय इष्ट असेल, तें त्यानें आपल्या द्वारां करावें अशा भावनेनें, शुद्ध आणि सुसंगतरीतीनें भगवंताला सर्वभावानें आत्मदान करणारे लोक कांहीं फार असत नाहींत. या मार्गानें गेल्यास तुम्ही सरळ, अचूक आपल्या ध्येयाकडे जाऊं शकाल. बाकीचे सर्व हेतू संकरयुक्त आहेत. त्यांना अहंतेचा स्पर्श आहे. ते तुमच्या ध्येयापासून तुम्हांला इतस्ततः नेणारे आहेत.

भगवंताला संपूर्ण, निःशेष, सर्वंकष शरणागति हेंच माझ्या जीवनाचें एकमेव उद्दिष्ट, एकमेव हेतू आहे, अशी तुमची भावना असेल, तर आणि ती सुद्धां इतक्या मर्यादेपर्यंत कीं, तुम्ही आणि भगवंत असा फरकच तुम्ही करूं शकत नाहीं, तर अशावेळीं तुम्हीच स्वतः पूर्णतः

सर्वतः कोणत्याहि तऱ्हेची वैयक्तिक प्रतिक्रिया आड न येतां भगवंत होऊन जातां. हीच आदर्श वृत्ति आहे. केवळ याच वृत्तीमुळें सर्वांपासून सुरक्षित, तुमच्या स्वतःपासूनहि पूर्ण सुरक्षित, असें जीवन तुम्ही जगूं शकाल व आपली प्रगति निर्वेधपणें साधूं शकाल.

अनुवादक—एल्. एम्. सुदुंब्रेकर, मुंबई.

–२–

# दिव्य कुटुंब

परस्परांपासून अगदीं विभक्त झालेले, जगाच्या पाठीवरील वेगवेगळ्या देशांत राहणारे किंवा अगदीं भिन्न स्वरूपाचे व्यवसाय करणारे लोक जेव्हां एकाच उद्दिष्टासाठीं एकत्र येतात तेव्हां त्याचा अर्थ हाच कीं, ते परस्परांचे ऋणानुबंधी जीवात्मे असून, त्यापूर्वी अन्य जन्मांमध्यें ते परस्परांना भेटलेले होते आणि एकत्र येऊन त्यांनीं कांहीं कार्य केलें होतें. त्यावेळीं त्यांना असें वाटलें कीं, ते एकाच कुटुंबामधील आहेत आणि म्हणून समान उद्दिष्टाच्या समान साहसांत एकत्र कार्य करण्याचा आणि परस्परांना सहकार्य देण्याचा त्यांनीं निश्चय केला. तसेंच म्हटलें तर अनेक जीवात्मे एकत्र येऊन जणुं कांहीं खूप मोठें कुटुंब तयार होतें आणि त्यांच्यावर सोंपविलेलें कार्य तडीस नेईपर्यंत अविरत कार्य करतां यावें म्हणून ते वारंवार जन्म घेतात आणि एकत्र येतात.

योग्य वेळीं नियुक्त घटकेला त्यांना बोलाविण्यांत येतें, नूतन जन्मासाठीं उत्कट प्रेरणेची अथवा आदेशाची प्रतीक्षा करीत, आंतरात्मिक जगतांत (psychic world) शांतीमध्यें विश्रांतीमध्यें, हे जीवात्मे लहान बालकाप्रमाणें निद्रिस्त असतात. आदेश मिळतांक्षणींच ते जागृत होऊन भूलोकाकडे वेगानें धावत येतात. अशाप्रकारें भूलोकींच्या वातावरणांत जेव्हां ते येतात, तेव्हां ते एकत्रित नसतात, पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र विखुरले जातात. आपण कोठें जन्म घेत आहोंत याचें सुद्धां त्यांना ज्ञान नसतें. तसेंच भौतिक वातावरणामध्यें आणि परिस्थितीमध्यें एकदां ते आले म्हणजे अगदीं वेगळ्याच रीतीनें घटना घडूं लागतात. कारण मूळची जी आंतरिक प्रेरणा असते, मूळ जें उद्दिष्ट असतें त्यावर अवगुंठन येतें, जीवात्म्याला आपलें विस्मरण होतें आणि त्याच्या स्वभावाशीं विसंगत असलेल्या, कदाचित् परक्या आणि विरोधी शक्ती, वस्तू आणि व्यक्ती यांच्या परिसरांत तो वेढला जातो, त्यांच्या कुंपणांत अडकून पडतो. आपण स्वतः कोण आहोंत हें शोधून काढण्याचा, हरवलेला धागादोरा परत मिळविण्याचा आत्म्याचा प्रयत्न अशावेळीं सुरू होतो. अर्थात् सर्व अडथळे उल्लंघिण्यासाठीं, बऱ्यावाईट परिस्थितींतून बाहेर पडण्यासाठीं, प्रवासांतील नागमोडी वळणांच्या मार्गानें वाटचाल करण्यासाठीं आणि अखेरच्या मुक्कामापर्यंत मजल गांठण्यासाठीं व्यक्तीची अंतःप्रेरणा पुरेशी समर्थ असली पाहिजे आणि मूळ इच्छाशक्ति तितकीच खंबीर असली पाहिजे. कधीं कधीं कांहीं जण विवक्षित जन्मामध्यें अंतिम मुक्कामापर्यंत पोहोंचतहि नाहींत अथवा एकाद्या टप्प्यापर्यंत येऊन थांबतात; दुसरे कांहींजण सरळ मार्गानें येऊन पोहोंचत नाहींत, तर मीं

म्हटल्याप्रमाणें क्लेशदायक अशा आडमार्गानें भटकत भटकत येऊन पोहोंचतात. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर, ते जीवात्मे आपल्या आत्म्याला हितकर असणाऱ्या गोष्टीहून अगदीं वेगळ्याच विषयांमध्यें आसक्त असतात. त्यांचें मन आणि भावना-आवेग यांमध्यें त्यांना दुसऱ्याच विषयांची तहान असते. उदाहरणार्थ, एका स्त्रीची अशी कल्पना होती कीं, आपलें गमावलेलें सौंदर्य योगाभ्यासानें आपल्याला परत मिळेल; म्हणून ती एका योग्याकडे योगाभ्यासासंबंधीं विचारावयास गेली. असो. एक गोष्ट मात्र खरी कीं, माणसाला आपल्याकडे ओढून घेण्यासाठीं, आपल्या खऱ्या कुटुंबाकडे, नियत स्थळाकडे जाण्यासाठीं, सावकाशपणें मार्गदर्शन करता यावें म्हणून जीवात्मा अशा क्षुद्र आणि हास्यास्पद साधनांचा देखील उपयोग करून घेतो.

तुमच्या जीवात्म्याची जी आंस असते, तुमचें जें नियत स्थळ असतें त्याकडे जाणाऱ्या वाटेवरून दूर ओढून नेणाऱ्या असंख्य गोष्टी या जगांत भरलेल्या आहेत. बहुधा जड अज्ञानमय प्रकृतीच्या शक्तींनीं तुम्ही वर खालीं फेंकलें जातां आणि अत्यंत मूर्खपणाच्याहि गोष्टी करण्यास प्रवृत्त होतां. पण आपला चैत्यपुरुष शोधून काढणें हाच त्यावर एकमेव उपाय आहे; आणि एकदां त्याची प्राप्ती झाली, म्हणजे मग त्याला अगदीं प्राणपणानें चिकटून रहा, कोणत्याहि मोहानें अथवा आवेगानें त्यापासून परावृत्त होऊं नका म्हणजे झालें.

—श्रीमाताजी

अनुवादक—नृसिंहाग्रज, सोलापूर.

---

परस्परांमधील तक्रारी आणि कुरकुर यांवर लक्ष केंद्रित करण्यापेक्षां कामामध्यें दृढ सहकार्य आहे कीं नाहीं याकडे विशेष लक्ष देण्याची वृत्ति, निःसंशय अधिक उपयुक्त होईल.

सर्वांत महत्त्वाचा मुद्दा हा आहे कीं, काम शीघ्रगतीनें केलें पाहिजे आणि तें चांगल्या रीतीनेंहि झालें पाहिजे.

२१-१२-१९५७.

—श्रीमाताजी

# लिहिण्याच्या पद्धतींमध्यें फरक कां ?

**"लिहिण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. उजवीकडून डावीकडे, डावीकडून उजवीकडे किंवा चिनी पद्धतीप्रमाणें वरून खालीं. हा फरक पडण्याचें मूळ कारण काय असावें ?"**

खरोखरच प्रश्न मोठा मनोवेधक आहे पण सबळ पुराव्याच्या अभावीं निर्णायक स्वरूपाचें उत्तर देणेंहि कठीण आहे. मात्र त्यांतल्या त्यांत समाधानकारक व संभाव्य असें स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करतां येईल.

एक गोष्ट उघड आहे कीं, हा फरक केवळ योगायोगानें अथवा कोणत्या तरी क्षुल्लक तद्देशीय कारणामुळें पडला असें मात्र म्हणतां येणार नाहीं. कारण प्राचीन काळीं मानव-वंशाचे सांस्कृतिक दृष्टचा जे भाग पडले, त्यांच्याशीं यांचा संबंध निगडित आहे. आर्य वंशाचे लोक डावीकडून उजवीकडे लिहितात; खाल्डियन संस्कृतींतून निर्माण झालेल्या मेसो-पोटेमियांतील मानववंशामध्यें उजवीकडून डावीकडे लिहीत जाण्याची पद्धति आहे; तर मंगोलियन वंशाचे लोक वरून खालीं उभ्या रेषेंत लिहितात.

लेखनकलेचा काळ मानववंशाच्या इतिहासांत अगदीं अलीकडचा असून, सर्व प्राचीन राष्ट्रांनीं ती कला एकाच गोष्टीवरून म्हणजे इजिप्शिअन् चित्रलिपीवरून उचलली आणि फोनेशिअन लोकांच्या व्यापारामुळें ती सर्व जगभर पसरली हें मत मान्य केलें, तर कोणतेंहि स्पष्टीकरण देणें कठीण होईल. आपण त्यासाठीं असें धरून चाललें पाहिजे कीं, लिपींतील हे फरक अशा एका कालखंडांत निर्माण झाले, कीं जेव्हां भिन्नभिन्न संस्कृती विकासमार्गावर वाटचाल करीत होत्या पण जेव्हां निरनिराळे मानववंश मात्र विखुरलेले नव्हते, त्यांच्यांत अद्याप फारकत झालेली नव्हती.

अर्थात् सध्यांच्या सांस्कृतिक विकासाच्या कालखंडाच्या इतिहासांत लेखनकला सार्वत्रिक होण्याचा काळ अगदीं अलीकडचा असला पाहिजे हें उघड आहे. लेखनकलेचा जन्म होऊनहि ती सार्वत्रिक होण्यास इतका अवधी कां लागला याला दोन कारणें संभवतात. पहिलें म्हणजे लेखनाची साधी व सोपी पद्धति प्रचारांत आलेली नसावी व दुसरें म्हणजे लेखनाकरतां साधें, सर्वांना सुलभ, वापरण्यास सुटसुटीत आणि टिकाऊ अशा साधनाचा अभाव, हें असावें. अशी परिस्थिति असल्यामुळें नित्याच्या व साध्यासुध्या कारणाकरतांहि लेखनकला उपयोगांत आणणें शक्य नव्हतें; तर महत्त्वाच्या धार्मिक समारंभ-उत्सव प्रसंगांच्या बाबतींत या कलेचा उपयोग केला जाई. किंवा ज्या संस्कृतींची अधिभौतिक दृष्टीनें अधिक वाढ झालेली होती, त्या संस्कृतींमध्यें महत्त्वाचीं कागदपत्रें किंवा अमोलिक, पवित्र व परंपरागत ज्ञानाचें जतन करण्या-साठीं लेखनकलेचा आश्रय केला जाई.

म्हणून, या प्रश्नाचें उत्तर शोधण्यासाठीं सर्व, धार्मिक कल्पना व रूढी यांच्याशीं निगडित असलेल्या परिस्थितीकडे आपण वळलें पाहिजे; अर्थात् ती परिस्थिति सर्व संस्कृतींना सारखी असली पाहिजे आणि तरीहि तीमध्यें असें कांहीं असलें पाहिजे कीं ज्यामुळें, अशा परस्पर-भिन्न लेखनपद्धती उगम पावणेंहि शक्य झालें.

सर्व प्राचीन राष्ट्रांच्या भिन्नभिन्न आचारविचारांमध्यें एक महत्त्वाची, केंद्रीय वस्तुस्थिति समान होती; ती म्हणजे सर्वच संस्कृतींमधील लोक सूर्याला पूज्य मानीत आणि आपल्या सर्व धार्मिक समारंभांत, विधींमध्यें सूर्याला सर्वश्रेष्ठ स्थान देत. असें तर नसेल, कीं ज्या ठिकाणाहून व ज्या दिशेनें निरनिराळे लोक सूर्याची नित्याची पूर्वेकडून पश्चिमेकडे जाण्याची गति पहात असतील, त्यामधील फरकामुळें त्यांच्या लिहिण्याच्याहि पद्धतींत फरक पडला असेल ?

अर्थात् त्यासाठीं हें गृहीत धरावयास पाहिजे कीं, कांहीं तरी कारणाकरतां आर्यांच्या पूर्वजांचीं तोंडें दक्षिणेकडे वळलेलीं होतीं, मेसोपोटेमियन लोकांचीं उत्तरेकडे तर मंगोलियनांची पूर्वेकडे. तसें असेल तर साहजिकच आर्यांना सूर्य त्यांच्या डावीकडून उजवीकडे जातांना दिसेल, मेसोपोटेमियनांना तो उजवीकडून डावीकडे, तर मंगोलियनांना तो सरळ आपल्याकडे येतांना दिसत असेल; आणि दगडासारख्या एकाद्या कठीण पृष्ठभागावर अथवा दुसऱ्या कांहीं पदार्थावर पवित्र चिह्नें लिहीत असतांना, वरील गति त्यांच्या लिहिण्याच्या पद्धतींतहि दृग्गोचर झाली असणें शक्य आहे.

आतां, कोणत्या परिस्थितीमुळें त्यांच्या या स्थानामधला तरी फरक पडला असेल ? त्याला एक उत्तर संभवतें. त्या लोकांना आपलीं वस्तीचीं ठिकाणें सतत बदलणें भाग पडत असे. असें स्थलांतर चालू असलेल्या काळांत ह्या लिहिण्याच्या पद्धती पडल्या असतील, आपण ह्या बाबतींत लोकमान्य टिळकांचा सिद्धांत गृहीत धरला, तर आर्य लोक हे फार प्राचीन काळीं ध्रुव प्रदेश सोडून दक्षिणेकडे उतरले असें म्हणतां येईल. कांहीं भारतांत आले तर कांहीं पर्शिया व भूमध्य समुद्राच्या भोंवतालच्या देशांत गेले. तसेंच मेसोपोटेमियन संस्कृतीचे जनक दक्षिणेकडून उत्तरेकडे गेले व मंगोलियन लोक प्रथमतः मध्य आशियांतून पूर्वेकडे गेले असें मानलें, तर आपल्याला या प्रश्नाचें सयुक्तिक उत्तर मिळूं शकतें. याचवरून चार दिशांच्या संस्कृत नांवांचा देखील चांगला उलगडा होऊं शकतो. आर्य लोक पश्चिमेकडून हिंदुस्थानांत शिरले आणि वसाहत करूं लागले; अर्थात् जी दिशा त्यांच्या अग्रभागीं आली ती "पूर्व"; पार्श्वभागीं जी दिशा आली, ती "पश्चिम" झाली. त्यांच्या उजव्या बाजूला "दक्षिण" दिशा झाली. आतां राहिली चवथी दिशा. तिचें नांव देतांना त्यांना आपल्या खूप उच्च, "उत्तर" असलेल्या आद्य वसतिस्थानाचें स्मरण झालें असेल.

अर्थात् ही कारणमीमांसा अनुमानावरूनच केलेली आहे. कदाचित् भक्कम पुराव्याचे अभावीं तिचें एकमेव मार्गदर्शन स्वीकारणें योग्यहि होणार नाहीं. असें जरी असलें तरी गृहीत-सिद्धांत अथवा अनुमान या दृष्टीनें ती विचारार्ह आहे यांत बिलकूल शंका नाहीं.

—श्रीअरविंद

"*Arya*" मधून

अनुवादक, वसंत केशव दोंदे.

# स्वतंत्रविचारक्षमता

(श्रीअरविंदांच्या जुन्या लिखाणांतील हा लेख वाचकांना आजहि उपयुक्त वाटेल.)

कोणत्याहि मौलिक वा स्वतंत्र विचारसरणीकडे पाहण्याची माणसाची नैसर्गिकवृत्ति स्वाभाविकपणेंच आशंकित आणि विसंगत अशी दिसते. या मौलिक विचाराची दुर्लभता, तेज आणि सामर्थ्य यांमुळें त्याचें कितीहि कौतुक करण्यांत आलें, तरी नेमक्या या गुणांमुळेंच प्रत्यक्ष व्यवहारांत लोकांना त्याची भीति वाटते; त्याचा बराच धाक असतो व म्हणून त्याचा उपहास करण्यांत येतो. जुन्या, मान्यता पावलेल्या, जनमनांत रुजलेल्या गोष्टींना चाळविणें, त्यांना हादरा देणें हीच अशा विचारांची प्रवृत्ति असते यांत शंकाच नाहीं. त्यामुळें, मौलिक विचारांना वाव मिळूं नये, प्रोत्साहन मिळूं नये, यावर तामसिक अवस्थेंतील समाज व तमोगुणी माणसें यांचा बराच कटाक्ष असतो. अशा तामसिक वृत्तीच्या समाजाचा 'शास्त्रप्रमाण' हा मंत्र असतो. अलीकडच्या काळांतील भारतीय समाजाइतके तामसिक, जडतायुक्त आणि आपल्या वाढत्या कूपमंडूकवृत्तींत समाधान पावणारे समाज या जगांत आपल्याला फार थोडे सांपडतील. अशा जडतेंत कुजत पडण्यांत आनंद मानणारे दुसरे समाज फारच थोडे आढळतील. त्यामुळेंच हिंदुसमाजाइतके शास्त्रप्रमाणाला चिकटून बसलेले समाज इतरत्र क्वचितच दिसून येतात. आमच्या आयुष्यांतील प्रत्येक बाब आमच्या शास्त्रांनीं आणि प्रघातांनीं आमच्यासाठीं नक्की करून ठेवली आहे. आमचे विचारप्रवाह आमच्या धर्मग्रन्थांनीं व त्यांच्या भाष्यकारांनीं नियुक्त करून ठेवलेल्या मार्गानेंच वाहतात—पण त्यामध्येंहि ग्रंथापेक्षां भाष्यकारांचेंच प्रस्थ जास्त. फक्त एका बाबतींत मात्र आम्ही अगदीं स्वतंत्र आहोंत; ती बाब म्हणजे वैयक्तिक आध्यात्मिक अनुभव. हे वैयक्तिक आध्यात्मिक अनुभवच आमच्या भूतकालीन गौरवाचे मूलस्त्रोत आहेत. अखंड वाहणाऱ्या या मूलस्त्रोतांतच वेळोवेळीं उद्‌भवलेल्या आमच्या नव्या प्रेरणेचें आणि पुनरुज्जीवित सामर्थ्याचें रहस्य आहे. नाहींतर सीझरचा रोम आणि ग्रीस या राष्ट्रांसारखे आमचें राष्ट्रहि केव्हांच निष्प्राण झालें असतें. यावरून वारंवार असें म्हणण्यांत येतें कीं, आमच्या राष्ट्रीय प्राणशक्तीचें कारण आहे हिंदुधर्माची शास्त्रीय बैठक. परंतु आमच्या मतें ही शास्त्रीय बैठक नव्हे, तर हिंदुधर्माचा आत्माप्राण, चैतन्य—हाच आमच्या राष्ट्रीय प्राणशक्तीचें खरें कारण आहे. आजहि एक राष्ट्र म्हणून आम्ही जे उभे आहोंत, या ऐहिक चमत्कारास आमच्या मतें श्रीशंकराचार्य, रामानुज गुरु नानक, कबीर, गुरु गोविंदसिंग, श्रीचैतन्य, श्रीसमर्थ रामदास आणि तुकाराम यांसारखे महापुरूषच जबाबदार आहेत; श्री रघुनंदन अथवा नादिया आणि भातपारा येथील पंडित नव्हेत.

परंतु या सद्‌हेतुपूर्वक लादलेल्या बंधनांचा परिणाम मात्र असा झाला कीं, एकेकाळीं आपल्या मौलिकतेबद्दल व विशालतेबद्दल जगप्रसिद्ध असलेली ही भारतीय बुद्धि सत्त्वहीन झाली. त्यामुळें अलीकडच्या काळांतील अगदीं उत्कृष्ट अशा कार्यांतहि आम्हांला एकप्रकारची दुर्बलता, पंगुत्व आणि बुद्धिमांद्य दिसून येतें. याचें सर्वांत ठळक उदाहरण म्हणजे पाश्चात्यांच्या

संपर्कामुळें येथें जी एक नवी स्थिति निर्माण झाली, ज्या नवविचारधारा वाहूं लागल्या, त्यांच्यापुढें आम्ही अगदीं अगतिक ठरलों. आम्ही या नव विचारधारा जिरविण्याचा, आत्मसात् करण्याचा प्रयत्न केला, त्यांचा अस्वीकार करण्याचा प्रयत्न केला, त्यांच्यांतील चांगल्या गोष्टी निवडण्याचाहि प्रयत्न केला. परंतु यांपैकीं कोणतीहि गोष्ट आम्हांला यशस्वीरीतीनें करतां आली नाहीं. कोणतेहि नवे विचार–ज्ञानधन यशस्वीरीत्या आत्मसात् करण्यास त्यावर संपूर्ण प्रभुत्व असलें पाहिजे; या पाश्चात्य विचारांवर आम्हीं प्रभुत्व तर मिळविलेलें नाहींच, उलट आम्हीच या विचारांनीं ग्रस्त झालों, त्यांना वश झालों व त्यांचे गुलाम बनलों; यशस्वी अस्वीकार तरच शक्य आहे, जर ज्या गोष्टी चांगल्या आहेत, योग्य आहेत, त्यांचा कुशलतेनें सांभाळ करतां येत असेल. कुठल्याहि गोष्टीचा अस्वीकारहि नीट समजून उमजून करतां आला पाहिजे. ती गोष्ट नीट समजतच नाहीं, ती अनाकलनीय आहे म्हणून तिचा अस्वीकार करणें बरोबर नाहीं. परंतु दुर्दैवानें, आमचा हिंदुधर्म, आमची आर्यसंस्कृति, यांचे रक्षण करण्याच्या बाबतींतच आमचें बौद्धिक दारिद्र्य विशेष दिसून येतें. (या मूल्यवान् वस्तु आम्ही अगदीं अंधतेनें, तर्कहीनतेनें उराशीं बाळगून आहोंत.) आमच्या उभ्या आयुष्यांत आम्ही ज्या गोष्टी करतो, त्या आम्ही कां करतो याचा आम्हांला पत्ता नसतो, कांहीं गोष्टींवर आमची श्रद्धा असते, पण ती कां आहे हें आम्हांला ठाऊक नसतें. कित्येक वस्तूंचे आम्ही प्रतिपादन करतो परंतु तसें करण्याचा आम्हांला काय अधिकार आहे, याबद्दल आम्ही कधींच आमच्या डोक्याला त्रास देत नाहीं. आमचे धर्मग्रंथ तसें म्हणत आहेत ना? मग ठीक आहे; या गोष्टीला आमच्या ब्रह्मवृंदाचा पाठिंबा आहे ना? श्रीशंकराचार्यांनीं याचें समर्थन केलें आहे कां? अथवा इतर कोणी संत महंतांनीं त्याचा प्रचार केला आहे कीं नाहीं? मग झाले तर! या बाबतींत आणखी विचार करण्याची आम्हांला गरज नाहीं. आमचें स्वतःचें असें कांहींच नाहीं. आम्हांला आमचें वैयक्तिक मत असें नाहींच. इंग्रजांनीं येथें आणलेल्या या नवीन ज्ञानाबद्दलहि आमची हीच स्थिति आहे. त्यांनीं त्यांच्याबद्दल आम्हांला जें सांगितलें आहे, तेंच आम्हांला ठाऊक आहे. त्यांच्या संस्कृतीची त्यांनीं दाखविलेली बाजूच फक्त आम्ही पाहिली आहे. इंग्रजी संस्कृतीच्या—तिला जर संस्कृति म्हटले तर—संपर्कामुळें आमच्या परावलंबी वृत्तीचें निरसन तर झाले नाहींच, उलट ही वृत्ति मात्र दसपट बळावली आहे.

वर उल्लेखिलेल्या तीन गोष्टींपैकीं जी शेवटची त्या बाबतींत, म्हणजे यशस्वी निवड करण्याचें बाबतींत तर स्वतंत्र विचारक्षमतेची फार गरज आहे. पाश्चात्यांचे नवे विचार व नव्या संस्था जर आम्ही अगदीं जशाच्या तशा, म्हणजे त्यांची आम्हांला जशी ओळख करून देण्यांत आली आहे तशा उचलल्या, तर ते फक्त त्यांचे अनुकरण होईल–एक मूढपणाचें आणि अयोग्य असें अंधानुकरण! अथवा आमच्या जुन्या ज्ञानाच्या चौकटींतून—जे कित्येक बाबतींत जवळ जवळ शून्यवत्च आहे म्हणाना—आम्ही या प्रश्नाकडे पाहिले, तर तितक्याच मूर्खतेनें व अंधतेनें आम्ही या विचारांचा अस्वीकार करूं. यशस्वी निवड करतांना या नव्या गोष्टींकडे आम्ही पाश्चात्यांच्या दृष्टीनें पाहतां कामा नये; अथवा पुराणमतवादी पंडितांच्या दृष्टिकोनांतूनहि पाहून चालणार नाहीं; तर त्या स्वतः कशा आहेत, त्यांच्यांत काय तथ्य आहे तें पाहिलें पाहिजे. पण आम्ही खुशाल भलतीच निवड केली आहे,

भलत्याचा अस्वीकार केला आहे. काय आत्मसात् करावे, कशाची निवड करावी याचें आम्हांला अजिबात ज्ञान नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं, पाश्चात्यांचा आघात (impact) मात्र आम्हांला सहन करावा लागलेला आहे. या आघातानें आम्ही अगदीं क्षीण होऊन गेलों आहों; त्याचा प्रतिकार करण्याचीहि ताकद आमच्यांत राहिलेली नाहीं. अशा रीतीनें सर्वस्वीं परिस्थितीचे गुलाम—धड ना मरण्याची शक्ति, ना जगण्याची ! अशी आज आमची अवस्था झाली आहे. बुद्धीची कुशाग्रता व सूक्ष्मता अजूनहि आम्ही रक्षण केलेली आहे. एकाद्या गोष्टीचे बेमालूम अनुकरण करण्यांत आम्ही तरबेज आहोंत. एखाद्या विषयाचे सूक्ष्म धागेदोरे प्रभावीपणें शोधून काढण्यांत आम्ही पटाईत आहोंत. परंतु आम्हांला नीट योग्य व उपयुक्त विचार करतां येत नाहीं. जीवन आणि परिस्थिति यांच्या गाभ्याला हात घालण्याची कुवत आमच्यांत राहिलेली नाहीं. पण एक राष्ट्र म्हणून जगण्यासाठीं आम्हांला नेमक्या त्याच गोष्टीची गरज आहे.

आमचें गत बुद्धिवैभव व त्याची लवचिकता आम्हांला कशी काय प्राप्त करतां येईल ? याचा एक उपाय म्हणजे ज्या मार्गानें याचा नाश झाला, त्याच मार्गानें उलट जाऊन तें पुन्हां मिळविणें; म्हणजेच प्रत्येक बाबतींत सत्ताप्रामाण्य मानण्याच्या आमच्या या वृत्तींतून आम्ही आमची सुटका करून घेतली पाहिजे. अर्थात् आम्ही या मार्गाचें अवलंबन करावें असें या सुधारकांना व पाश्चात्यांचें अनुकरण करणारांना वाटत नाहीं. आमचें मन स्वतंत्र आणि उन्नत होण्यासाठीं आम्ही हें सत्ताप्रामाण्य झुगारून द्यावें, प्रघात व अंधश्रद्धा यांविरुद्ध बंड करावें, असें या सुधारकांना वाटतें हें कबूल; परंतु त्यांच्या या समर्पक शिफारशींचा अर्थ मात्र इतकाच कीं, ज्या बाबतींत आम्ही सायणाचार्यांना अधिकारी मानतो, त्या बाबतींत आतां मि. मॅक्स मुल्लर यांना अधिकारी मानावे ! अद्वैतवादी श्रीशंकराचार्यांची जागा मि. हेगेल यांना द्यावी. लिखित शास्त्र-वचनांऐवजीं पाश्चात्यांच्या अलिखित मतांना प्रामाण्य द्यावें; पुराणमतवादी पंडितांच्या मताग्रहापेक्षां पाश्चात्य शास्त्रज्ञ, विचारवंत आणि पंडित यांचा मताग्रह शिरोधार्य मानावा. परंतु पराधीनतेच्या असल्या अविचारी अदलाबदलीला कोणीहि स्वाभिमानी मनुष्य मान्यता देणार नाहीं. आपण आपल्या या दुःसह्य शृंखला अवश्य तोडून टाकूं या. परंतु बंधमुक्त होण्यासाठीं; सत्याच्या नांवाखालीं यूरोपसाठीं नव्हे. आमचा जुना ज्ञानप्रकाश—मग तो सध्यां कितीहि अंधुक झालेला असो—टाकून, त्याऐवजीं इंग्रजांच्या उसन्या विचारधारांचा स्वीकार करणें अथवा प्रचलित धर्मांतील अंधश्रद्धांची जागा पाश्चात्यांच्या जड-विज्ञानाच्या अंधश्रद्धेला देणें, ही अदलाबदल म्हणजे खरोखरच नुकसानीचा सवदा ठरेल.

भारताला जर जिवंत राहावयाचे असेल, या पृथ्वीवर त्याच्यासाठीं नियोजित असलेलें विशिष्ट कार्य पार पाडावयाचें असेल, तर सर्वप्रथम गरज ही आहे कीं, भारतीय तरुणांनीं विचार करण्यास शिकले पाहिजे–सर्व गोष्टींचा, प्रत्येक विषयाचा सारासार विचार, प्रत्येक विषयाचा स्वतंत्र, मूलभूत, दूरगामी आणि फलप्रद विचार करण्यास शिकले पाहिजे. या बाबतींत नुसता वरवर विचार करून चालणार नाहीं, मन पूर्वग्रहदूषित असूनहि चालणार नाहीं. त्यांची विचारशक्ति एखाद्या तीक्ष्ण तरवारीसारखी पाहिजे कीं, ज्यानें सत्याभासाची, पाखंडपणाची व दुराग्रहांची सर्व बंधनें तटातट तुटलीं पाहिजेत. गूढतेचे, दुर्बोधतेचे ढग

विरवून टाकण्यासाठीं भीमाच्या गदेची शक्ति त्या विचारांत असली पाहिजे. आमची बुद्धि पाश्चात्य बालकाप्रमाणें नुसती सुंदर वस्त्रवेष्टित असूं नये. भारतीय तरुणांनीं देवदेवतांसारखी स्वतंत्र व अनिर्बंध गति मिळविली पाहिजे. कोणताहि विषय केवळ सूक्ष्म दृष्टीनें पहाण्याचीच नव्हे, तर तो विशाल दृष्टिकोनांतून पाहून त्या विषयावर संपूर्ण प्रभुत्व मिळविण्याची भारतीय बुद्धीची नैसर्गिक ठेवण त्यांनीं आत्मसात् केली पाहिजे. ही गोष्ट तशी कांहीं कठीण नाहीं. एकदां का आम्हांला आमच्या बुद्धिसामर्थ्याची चुणूक कळली, तिच्या योग्यतेवर आमचा विश्वास बसला कीं काम झालें. या बुद्धीच्या मदतीनें आम्ही जरी पूर्वींचें जुनें जूं पूर्णपणें झुगारूं शकलों नाहीं, तरी निदान बाल श्रीकृष्णाप्रमाणें—त्यानें जसें उखळीला बांधलेल्या अवस्थेंतच रांगत पुढें जाऊन वाटेंत आड येणाऱ्या दोन महाकाय वृक्षांचा ध्वंस केला त्याप्रमाणें—आमच्या आत्मोन्नतीच्या आड येणारे पूर्वींचे अंध दुराग्रह आणि आधुनिक उद्दाम मताग्रह ह्या दोन राक्षसांचा, आम्ही नाश करूं शकलों तरी पुष्कळ आहे. आज सर्व जुन्या परंपरा उध्वस्त झाल्या आहेत. आम्ही आज एका मोठ्या उत्थानाच्या आणि बदलत्या काळाच्या महापुरांत सांपडलों आहोंत. अशा परिस्थितींत जर आम्ही जुन्या परंपरांच्या हिमराशींना बिलगून बसलों, तर लवकरच त्या हिमराशी वितळून जातील आणि आम्हांला मात्र त्या महापुरांत गटांगळ्या खाव्या लागतील. नकली पाश्चात्य वृत्तीच्या दलदलीचा आधार घेणेंहि अशा वेळीं इष्ट नाहीं. दुःखद अशा परिस्थितींत मृत्युमुखीं पडणें हेंच फारतर त्यानें साधेल. तरी या महापुरांतून पोहत जाऊन मनूची ती सनातन सत्यरूपी नौका आम्ही गांठली पाहिजे; आणि सनातन शाश्वत स्थानाच्या किनाऱ्याला जाऊन पोहोंचलें पाहिजे.

त्याचप्रमाणें आम्ही पाश्चात्य विचारांची कशीवशी निवड करतां कामा नये. या बाबतींत एक सावळागोंधळ माजवून वर त्याला 'पूर्व पश्चिमेचा संगम' असें गोंडस नांव देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पहिली गोष्ट ही कीं, कुठल्याहि वस्तूचा डोळे मिटून स्वीकार करण्याची आमची संवय अजिबात थांबली पाहिजे. प्रत्येक गोष्टीची शहानिशा करून, त्याच्यावर आपलें स्वतंत्र मत बनविलें पाहिजे. अशा रीतीनें वागल्यास आमचे भारतीयत्व नष्ट होईल अथवा आम्ही हिंदुधर्माला सोडचिट्ठी दिल्यासारखें होईल, अशी भीति बाळगण्याची बिलकूल गरज नाहीं. आम्ही स्वतः जर खरोखर विचार करूं लागलों, आमची स्वतंत्र विचारक्षमता जरी जागृत झाली, तरीहि भारत हा भारतच राहील व हिंदुधर्मावरहि कांहीं आकाश कोसळणार नाहीं. परंतु आम्ही जर आमच्यासाठीं विचार करण्याची कामगिरी यूरोपला दिली, तर मात्र भारत ही यूरोपची, पाश्चात्यांची नीट न साधलेली व अविचारी नक्कल होण्याची बरीच शक्यता आहे. या बाबतींत आम्ही बिलकूल पक्षपात करूं नये. स्वतंत्र विचारक म्हणून आमचें पहिलें कर्तव्य हें, कीं कुठलीहि गोष्ट ती तशी का याचा विचार केल्याशिवाय एकदम स्वीकारावयाची नाहीं. तिच्या बऱ्यावाईटाचा पूर्ण विचार करावयाचा याचा अर्थ असा कीं, एखादी वस्तु, विचारासमोर असतांना, तिच्या विषयींच्या जुन्या अगर नव्या न परीक्षिलेल्या कल्पनांना, मतांना मुळींच थारा द्यावयाचा नाहीं. त्याबद्दल मनामध्यें असणाऱ्या जुनाट संस्कारांच्या आहारीं जाऊन, त्या वस्तूबद्दल पूर्वकल्पित मत बनवावयाचें नाहीं. 'अनित्यः संस्कारः' असें बुद्धांनीं म्हटलें. पण आम्हांला हें सर्वस्वीं कबूल नाहीं. आमच्या दृष्टीनें

तर कित्येक संस्कार अगदीं सनातन आहेत. आत्मा ही चीज काय आहे? चराचर वस्तुमात्रांकडे पाहण्याचा सनातन व मूलभूत असा एक दृष्टिकोन म्हणजे आत्मा आहे. अज्ञान, 'नेति नेति' असें सर्व वस्तुमात्राचें सारतत्त्व म्हणून, बौद्धांच्या नंतर आत्मा अशी कांहीं वस्तूच नाहीं असा घोष केला व ते शेवटीं शून्यापर्यंत आले. परंतु हाहि एक रुक्ष व वांझ सिद्धांत आहे. कारण कीं, शेवटीं तो पण एक संस्कारच आहे. तथापि एवढें मात्र खरें कीं, आमच्या बहुतांश कल्पना या नुसत्या अनित्यच नव्हे, तर अपूर्ण आणि बुद्धिभेद व दिशाभूल करणाऱ्या असतात. या कमतरतेंतून, अपूर्णतेंतून आम्ही आमची सुटका करून घेऊन, सत्याच्या भरभक्कम पायावर उभे राहण्यास शिकले पाहिजे. परंतु शाश्वत सत्य काय आहे, याचा शोध करतांना, प्रत्येक वस्तूची अगदीं कसून व निस्पृहपणें छाननी केली पाहिजे. भारतासाठींच नव्हे तर अखिल मानवजातीच्या हितासाठीं सुद्धां अशा प्रयत्नांची अत्यंत गरज आहे, हें खुद्द पाश्चात्य विद्वान् पण कबूल करीत आहेत. मि. कार्लाइल जेव्हां असें म्हणत असत कीं, 'सर्व सिद्धांत गिळंकृत करा' तेव्हां त्यांच्या म्हणण्याचा हाच आशय होता. याच मार्गानें जर्मन शास्त्रज्ञ गटे यांनीं पाश्चात्य विचारसरणीला बळकटी आणली. दुर्दैवानें पश्चिमेंत रहाणारा हा नवविचारांचा जिवंत झरा समुद्राला मिळण्यापूर्वींच आटत चालला आहे. युरोपमधील सृजनशक्ति सध्यां कांहीं काळ तरी निद्रिस्त झाली आहे.

अनुवादक : अरविंद सुळे —श्रीअरविंद

---

# अडचणींमध्यें असतांना

योगसाधनेचा नियम हा आहे कीं, उदासीनता आली असतांहि निरुत्साही व्हावयाचें नाहीं. त्यापासून स्वतः अलिप्त रहावयाचें. उदासीनतेचें कारण शोधून त्याचें निरीक्षण करावयाचें व त्याचें निर्मूलन करावयाचें. कारण अशा उदासीनतेचें कारण नेहमीं स्वतःचे ठिकाणींच असतें. कदाचित् स्वतःच्या प्राणविषयक भागांत कोठेंतरी कांहीं दोष असतो. एकाद्या चुकीच्या प्रवृत्तीमध्यें आपण रमलेले असतो, किंवा एकादी क्षुद्र वासना, कधीं तिची तृप्ति केल्यामुळें तर कधीं ती तशीच अतृप्त राहिल्यानें पुनः पुनः उद्भवत असते. योगामध्यें, एकाद्या वासनेची तृप्ति केल्यानें, एकाद्या चुकीच्या उर्मीस प्राधान्य दिलें गेल्यानें कधीं कधीं जितकी वाईट प्रतिक्रिया येते, तितकी वासना अतृप्त ठेवल्यानेंहि येत नाहीं.

या प्रतिक्रियांचा ज्यावर परिणाम होतो अशा बाह्य प्राण-भागांत किंवा मनःप्रांतांत स्वतःस वावरूं देण्यापेक्षां अधिकाधिक आंतरिक जीवन जगणें तुम्हांस आवश्यक आहे; अंतर्गत चैत्यपुरुषावर अशा प्रतिक्रियांचा कांहींच परिणाम होऊं शकत नाहीं. भगवंताशीं चैत्यपुरुषाचे जे सहज सामीप्य असतें, त्यांतच तो प्रतिष्ठित असतो; आणि या वरवरच्या लहान लहान उर्मी सत्य स्वरूपाच्या दृष्टीनें अगदीं परक्या आहेत, अगदींच पृष्ठभागावरच्या आहेत, असें तो पाहतो.

तुम्हांला ज्या अडचणी येतात आणि ज्या अशुद्ध प्रवृत्ती तुमच्यावर आक्रमण करतात, त्या हाताळत असतांना, त्यांच्याशीं स्वतःला फारच एकरूप समजण्याची आणि आपल्या स्वतःच्या स्वभावाचाच तो एक भाग आहे असें मानण्याची चूक बहुधा तुम्ही करीत आहांत. वास्तविक तुम्ही त्यांपासून अलिप्त राहिलें पाहिजे, त्यांच्यापासून वेगळें होऊन त्यांचा व स्वतःचा संबंध तोडला पाहिजे. अपूर्ण नि अशुद्ध अशा विश्वगत निम्नतर प्रकृतीच्या त्या हालचाली आहेत असें तुम्ही मानावें; आपल्या ठिकाणीं प्रवेश करून, त्यांच्या आत्मप्रगटीकरणासाठीं आपल्याला साधन करणाचा प्रयत्न करणाऱ्या त्या अनिष्ट शक्ती आहेत असें मानावें. अशाप्रकारें स्वतःस अलग केल्यानें, अनिष्ट शक्तींपासून संबंध तोडल्यानें तुम्हांस स्वतःचे ठिकाणीं अंतर्गत अस्तित्वांत एक स्थान सांपडून तेथें अधिकाधिक राहतां यईल. हें स्थान म्हणजे तुमचा 'अंतःपुरुष', आंतरात्मा; अनिष्ट शक्तींचा हल्ला त्यावर होऊं शकत नाहीं किंवा त्यांचा त्रासहि पोंहचूं शकत नाहीं. या विरोधी हालचाली आंतरात्म्याला अगदीं परक्या वाटतात; व त्यामुळें आपोआपच या हालचालींना संमति देण्याचें तो नाकारतो. आपण नित्यनिरंतर भगवदभिमुख आहोंत, दिव्यशक्तींच्या आणि चेतनेच्या उच्चतर पातळीच्या सन्निकर्षांत आहोंत असा अनुभव त्यास नेहमीं येत असतो. तुमच्या ठिकाणचा हा भाग शोधून काढा आणि त्या भागांत नित्य राहण्याचा प्रयत्न करा. हें करतां येणें म्हणजे योगाचा पाया तयार होणें आहे.

अशा तऱ्हेनें विरोधी शक्तीपासून अलिप्त राहतां येऊं लागलें म्हणजे तुम्हांस, पृष्ठभागावरील आंदोलनामागील अचंचल अशी मनःस्थिति अनुभवतां येईल आणि तुम्हांस मुक्त करण्याकरितां भगवंताची कृपा तेथून अधिक परिणामकारक रीतीनें भाकतां येईल. भगवंताची उपस्थिति, स्थिरता, शान्ति, पावित्र्य, शक्ति, प्रकाश, आनंद, विशालता या सर्व गोष्टी तुमच्याठिकाणीं अवतरण करण्याच्या संधीची वाट पहात आहेत. अशी उर्ध्वस्थ अचंचल स्थिति शोधून काढा म्हणजे तुमचें मनहि अधिक स्थिर होईल आणि अशा स्थिर, अचंचल मनाच्या द्वारां प्रथम प्रकाश आणि शांति यांचें आणि नंतर भागवत शक्तीचें आवाहन तुम्हांस स्वतःचें ठिकाणीं करतां येईल. जर अशी शांति नि पावित्र्य तुमच्या ठिकाणीं अवतरत असल्याचा तुम्हांस अनुभव घेतां आला, तर त्या गोष्टी तुमच्या ठिकाणीं प्रस्थापित होईपर्यंत त्यांना पुनः पुनः आवाहन करीत रहा; तसेंच तुम्हांस असाहि अनुभव येईल कीं, तुमचें ठिकाणीं दिव्य शक्ति कार्य करीत आहे, तुमच्या प्रवृत्ती बदलवीत आहे आणि तुमच्या जाणीवेमध्यें परिवर्तन घडवून आणीत आहे. या कार्यांतून तुम्हांस श्री मातेच्या उपस्थितीची व शक्तीची जाणीव प्राप्त होईल. हें एकदां घडून आलें कीं फक्त काळाचा आणि तुमच्या खऱ्या नि दिव्य स्वभावाच्या प्रगतीशील उत्क्रांतीचा प्रश्न राहिला.

—श्रीअरविन्द

('योगाचा पाया' मधून)

# विद्यार्थी विभाग

## प्रेरक पत्रें

( २ )

प्रिय—

तुला कांहींतरी करावेंसें वाटतें, गुपचुप बसणें तुला अशक्य झालें आहे. पण काय करावयाचें तें निश्चित करतां येत नाहीं. जें कांहीं सुरू करतोस, तें तुला वाटतें अगदीं क्षुल्लक आहे. तुझ्या आंतरात्म्याशीं त्याचें जमत नाहीं. तुझ्या मनासारखें काम, शोधूनहि तुला मिळत नाहीं, असें तुझें म्हणणें. पण, मला वाटतें कीं, मुळांतच एक चुकीची समजूत गृहीत धरून तूं कामास सुरुवात करतोस. लक्षांत ठेव, 'करणें' हें जीवनाचें मूळ तत्त्व नाहीं. जीवनाचें मूळ तत्त्व आहे 'होणें' ! प्रथम कांहींतरी 'हो', म्हणजे 'करणें' आपोआपच घडेल. 'करणें' हें 'होण्याचें' फल असतें, त्याचा सहजविकास किंवा परिणति ती असते. तुला काय व्हावयाचें आहे, काय झाला आहेस व किती झाला आहेस यांवरच, तूं 'काय करणार' व 'किती करणार' हें अवलंबून आहे. 'होणें' म्हणजे आंतल्या आंत 'बनून', परिपूर्ण होणें; मूर्ति निर्माण करणें व ती पूर्ण करणें. तुझा आंतरात्मा कोणाशीं मिळून गेला आहे ? कोणत्या सारभूत वस्तूनें त्याला आवरण घातलें आहे, किती दीर्घ, खोल, विस्तृत असें त्याला वाटत आहे, त्यालाच म्हणावयाचें तुझें 'होणें'. जगाची ही एक सार्वत्रिक स्वरूपाची चूक होत असते—माणसाचें कर्म पाहून तें त्याच्याबद्दल विचार करतें. तूं काय करतोस, तुला काय करतां आलें, काय करतां न आलें हें जग पाहतें; जणु कांहीं मानवाचें मूल्य करण्याचें तें तेवढेंच एक माप आहे ! वास्तविक असें घडणें साहजिकच आहे; कारण त्याजजवळ खरा मानदंड नाहीं त्याला काय करणार ! त्याला फक्त बाह्य गोष्टीच दिसतात. मानवाच्या अंतरांत प्रवेश करण्याचें जगाला सामर्थ्य नाहीं आणि वेळ पण नाहीं. तरीपण तूं एक साधक आहेस; तूं त्या रीतीनें, जगाच्या रीतीनें, चालून भागणार नाहीं. तूं काय करतोस किंवा करत नाहींस, बाह्य दृष्ट्या तूं आळशी अथवा निष्कर्मी किंवा विपरीत कार्य करणारा दिसलास, तरी त्याचें कांहींच महत्त्व नाहीं. तूं काय काम करतोस, किती करतोस यावरून तुझी उन्नति, तुझी क्षमता, तुझ्या स्वतःचें मूल्य यांचा विचार तूं करूं नकोस. ह्या सर्व गोष्टी फार सूक्ष्म आहेत; ह्यांचें बीज अंतरंगांत असतें. लोकांच्या दृष्टीआड, तुझ्या स्वतःच्याहि दृष्टीआड तें असतें व हळु हळु वाढत असतें.

"तुम्हीच कर्मयोग शिकविला आहे, कर्मांतून मनुष्य 'बनतो', शक्तीच्या उपयोगानेंच तिचा विकास होतो, 'करत करतच' मनुष्य 'होत' असतो"—असें तूं म्हणशील; आणि तें ठीकच

आहे. पण तुला, 'तूं कांहींच करूं नकोस' असें मी कुठें म्हणत आहे ? तूं श्वासोच्छ्वास करतोस, खातोस पितोस, लिहितोस, वाचतोस, खेळतोस, बागडतोस, दुसऱ्यांशीं मिळून मिसळून राहतोस, सांसारिक कर्मे करतोस हें सर्व कांहीं 'करणें' च आहे. तूं म्हणशील,–'तसें नाहीं, हें कांहीं 'करणें' नाहीं. हें तर सर्वच करतात. साधारण जीवन व साधक-जीवन यांत मग फरक काय राहिला? पण ध्यानांत ठेव, कर्मयोग म्हणजे विराट्, विपुल व असामान्य कर्म करणें नव्हे. अर्जुनासारखें कोणत्या तरी युद्धांत कर्म केल्याशिवाय 'कर्मयोगी' होत नाहीं, असें मुळींच नाहीं. दुसरे सर्व जे कांहीं करतात, तेंच जरी तूं केलेंस तरी तुझा कर्मयोग कमी प्रतीचा ठरणार नाहीं. सर्व कांहीं तुझ्या स्वतःच्या भावनेवर, तूं कोणत्या दृष्टीनें जगाकडे पाहतोस व कोणत्या प्रेरणेच्या आधीन होऊन काम करतोस यावर अवलंबून आहे. तूं ज्या परिस्थितींत व अवस्थेंत आहेस, ज्या परिस्थितीच्या कर्मशृंखलेंत तुझ्या वर्तमान आयुष्याचा खेळ चालूं आहे त्यांतच राहून, तें सर्व-सुसंपन्न व समृद्ध करून, तूं स्वतःच्या स्वधर्माचा साक्षात्कार करून घेतला पाहिजेस. स्वतःचें कर्मराज्य अधिकाधिक विस्तृत केलें पाहिजेस. हाच खरा कर्मयोग. यासाठीं घरदार सोडण्याची जरूरी नाहीं; मनासारखें कर्म शोधण्यासाठीं धांवपळ करण्याची जरूरी नाहीं. आंतरिक भावनांचें जोपर्यंत शुद्धीकरण झाले नाहीं, त्या भावना परिवर्तित झाल्या नाहींत, मनाला कांहींदिवस तरी 'होण्याला' दिले नाहींत तोपर्यंत, तुझ्या मनाजोगें कर्म जरी तुझ्यासमोर आलें, तरी त्याची ओळख तुला पटणार नाहीं. मी म्हणत नाहीं कीं, आज तूं ज्या कर्मांत बांधला गेला आहेस, त्यांतच बद्ध होऊन रहा म्हणून. मी येवढेंच म्हणतो कीं, कर्म बदलणें, आपली परिस्थिति बदलणें, घर सोडून दुसरीकडे जाणें म्हणजेच सर्वकांहीं नव्हे; ती कांहीं मुख्य गोष्ट नव्हे. कधीं कधीं त्या गोष्टी कराव्या लागतीलहि, जरूरीहि त्यांची असेल; पण जोंवर तुला आंतरीं कांहीं 'होतां' येत नाहीं, तोंवर, ही जी बाह्य कर्मस्पृहा ती म्हणजे फक्त चंचलता व अस्थिरताच म्हणावी लागेल. ती स्पृहा म्हणजे फक्त धूर, फक्त लाटांवरील फेंस असून ती आंतरात्म्यामध्यें गभीर व स्थिर अशी प्रतिष्ठित झालेली नाहीं, असा त्याचा अर्थ आहे.

कर्मयोग म्हणजे सर्व दिशा विसरून फक्त कर्म करीत राहणें नव्हे. आपल्या साधनेंत कर्मयोग हें, एक क्षेत्र आहे. ज्ञानयोगाच्या साह्यानें या कर्मक्षेत्रावर तुझ्या आयुष्याची अधिक उत्तुंग अशी इमारत तूं उठविली पाहिजेस. साधनेचें लक्ष्य म्हणजे स्वपरिवर्तन; भागवत प्रतिभेला आंतरीं प्रतिष्ठित करणें. त्यासाठीं आधीं परिवर्तन झालें पाहिजे––विचार, भावना आणि बुद्धि यांचें. भावनेचें परिवर्तन होणार मुख्यतः भावनेनें, ध्यानानें. इच्छाशक्ति व तपःशक्तीनें होणार कर्माचें. जीवनसंघर्ष हाहि ह्या भावनेच्या परिवर्तनाला साह्य करूं शकेल–– अर्थात् केवळ साह्यच; त्याचा मुख्य भाग तो असणार नाहीं. तुझ्या कर्माचें, जीवनाचें तटस्थपणें निरीक्षण, परीक्षण करण्यास शीक. बाह्य गोष्टीहि याच एका दृष्टीनें, विचारानें, भावनेनें पहा. तुझ्या कर्माला प्रेरणा देणारी कोणती भावना, कोणत्या पातळीवरून वर उठत आहे, तें पाहण्याचा अभ्यास ठेव. वासना, आवेग व स्नायूंच्या हालचालींचें फळ म्हणजेच फक्त तुझें कर्म आहे काय ? म्हणून म्हणतो कीं, तुझ्या कर्माच्या मागें कोणती भगवत्प्रेरणा आहे ती जाणण्याचा, ती अनुभवण्याचा प्रयत्न कर. आंतून, आंतरात्म्याची कोणती प्रेरणा प्रकट होऊं पाहत आहे, तें जाणून घेण्याचा अभ्यास ठेव––त्या दिव्य प्रेरणेस जाणून

घेऊन, तिला विकसित व व्यक्त होण्यासाठीं सर्व दिशांचीं बंधनें, अमंगल गोष्टी व मर्यादा दूर करून टाक व तिच्याच पूर्ण तेजाच्या मार्गदर्शनानें सर्व कांहीं कर. हाच खरा कर्मयोग. कर्मांत राहून, मग तें कर्म कोणतेंहि असो—ज्ञानाच्या तपःशक्तीनें प्रतिष्ठित होणें हाच खरा कर्मयोग. जेव्हां हें, थोड्या तरी प्रमाणांत तूं आत्मसात् करशील, तेव्हांच तुझ्या खऱ्या कर्माचा आरंभ होईल; तेव्हांच भगवंताला तुझ्याद्वारां कोणती निर्मिति करावयाची आहे, सृष्टि उभारावयाची आहे, हें तुला स्पष्टपणें कळून येईल.

—तुझा

लेखक—नलिनीकांत गुप्त.
अनुवादक—ज. ना. वेलिंगकर.

---

# चंद्रगुप्त व अशोक

**चंद्रगुप्त**—कोणत्या कुमुहूर्तावर तूं कलिंग देशांत पाय ठेवलास, अशोक! तो कोणता कुमुहूर्त होता, ज्यावेळीं करुणेच्या मोहानें तुझ्या वीरहृदयावर मात केली! तसें झालें नसतें तर, कोणास ठाऊक भारताचें भाग्य आज अगदीं वेगळें झालेलें दिसलें असतें! सामान्य व क्षुल्लक वाटणाऱ्या घटनेमध्यें केवढें भवितव्य दडलेलें असतें!

**अशोक**—खरें आहे. तसें नसतें झालें तर भारताला त्याचें आंतर-धन शोधून तरी कसें सांपडलें असतें? भारताची प्रतिभा भारताखेरीज इतर देशांत फैलावली असती कशी? अर्ध्या जगानें भारतीय शिक्षण व भारतीय मार्गदर्शन स्वीकारून भारताचें शिष्यत्व कसें पत्करलें असतें? तो क्षण धन्य, जेव्हां भगवान् तथागता बालिका-मूर्ति धारण करून माझ्यासमोर उभे राहिले, माझा आसुरी अज्ञानांधःकार दूर करून, त्याजागीं दिव्यज्ञानाची स्निग्ध ज्योत्स्ना प्रकाशविली! धन्य तो माझा कलिंग-दिग्विजय!

**चंद्रगुप्त**—तुझ्या व्यक्तिगत जीवनाच्या दृष्टीनें कदाचित् तो दिग्विजय मंगलकर झाला असेलहि, मला तें माहीत नाहीं; आणि तो प्रश्नहि मी काढीत नाहीं. परंतु कांहीं असलें तरी देशाच्या दृष्टीनें, त्याच्यासारखें घोर अमंगलकर, मला वाटतें दुसरें कांहींच झालें नसेल. चंडाशोक नाम धारण करणारा अशोक, ज्या दिवशीं प्रियदर्शी धर्माशोक झाला, ज्या दिवशीं राजानें भिक्षुधर्म ग्रहण केला, योद्ध्यांनीं आपल्या तलवारी टाकून भिक्षापात्रें, आणि चिलखतें टाकून भिक्षूंचीं वस्त्रें धारण करण्यास सुरुवात केली, त्यादिवशींच मला कळून चुकलें कीं, या चंद्रगुप्ताचे सर्व प्रयास विफल होणार. छिन्नभिन्न भारताला एकत्र जोडून मीं त्याचें शक्तिमान् महा-राष्ट्रांत रूपांतर केलें होतें; पण तें कार्य तूं कित्येक युगें मागें हटविलें आहेस.

**अशोक**—तुझ्या आदर्शानुसार व तुझ्या मार्गानें मीहि कांहीं दिवस चाललों; पण

भगवंतानें ती माझी चूक होती असें माझ्या ध्यानीं आणून दिलें. तुझ्या पावलावर पाऊल टाकून चाललों असतों, तर भारताचें दुर्भाग्य ओढवलें असतें; भाग्य उदयास आलें नसतें. भारत एका आसुरीशक्तीच्या रूपानें उभा राहिला असतां, आणि जगाच्या दृष्टीनें तो एक भयस्थान बनला असता; शिवाय असें पहा, अशा ऐहिक आसुरी शक्तीनें कोण, किती दिवस मोठा होऊं शकेल ? आसुरी शक्तीनें मोठें झाल्यावर होणारें पतन तेवढेंच मोठें असणार हें निश्चित. परंतु मीं भारताला जी शक्ति मिळवून दिली, मीं जें साम्राज्य स्थापन केलें, तें, देह गेला तरी, राष्ट्र गेलें तरीहि अखंड आहे व अखंड राहील. भारताचें धर्म-साम्राज्य अजूनहि अढळ आहे. अजूनहि तें देशदेशांतरीं, शिक्षण व मार्गदर्शन याबाबतींतील आदर्श म्हणून मानवजातीच्या हृदयांत अमोलिक धन म्हणून सुप्रतिष्ठित आहे. हा काय माझा फक्त व्यक्तिगत लाभ झाला ?

**चंद्रगुप्त**—सबळ देह आणि सजीव प्राण असल्याशिवाय आंतरात्म्याची संपदा पूर्णपणें उपयोगी होऊं शकत नाहीं. संघटित राष्ट्राशिवाय कोणाहि जातीच्या प्रतिभेचा सर्वांगपूर्ण विकास अशक्य असतो. तूं केवळ तुझ्या कल्पनेच्या सूक्ष्मदृष्टीनें जगावर भारताच्या प्रतिभेचा पडलेला प्रभाव पाहिलास—पण वस्तुस्थिति काय आहे तें तरी पहा. इतर अनेक देशांना तुझ्या भावनेमुळें भावजगतांत स्फूर्ति आलेली तुला दिसली, तरी वस्तुस्थितीचें जगत् ते देश विसरले नाहींत. पण तुझ्या मार्गानें जाऊन भारतदेश मात्र एकचक्षु झाला आहे. त्यामुळेंच तो आज दीन, दरिद्री, दुर्बल, पददलित व शतशः विदीर्ण झालेला दिसत आहे. केवळ शरीरालासुद्धां जिवंत ठेवण्याचें ज्याला सामर्थ्य नाहीं, त्याला आंतरिक धन शोधण्याला वेळ आणि सामर्थ्य कोठून असणार ? म्हणूनच पहा, बाह्यजीवनांत पंगु झाल्यामुळें तो आंतरिक-जीवनामध्येंहि पंगु झाला आहे. धर्माचा जिवंत विकास भारतांत कोठें दिसत आहे ? भारतीयांचा धर्म ? तो म्हणजे नुसतें आचारपालन, कायाक्लेश करून घेऊन कांहीं नियमांचें पालन येवढेंच ना ? बाह्यदृष्टीनें असमर्थ राहिल्यामुळें आंतरीं भय निर्माण झालें आहे, म्हणूनच तो धर्माचरण करतो तेंहि पापाच्या भीतीनेंच;—गभीर जीवनसत्याच्या अनुभवाच्या बलानें नव्हे. प्राणशक्ति जेथें क्षीण, शरीर जिथें जीर्णशीर्ण असेल, तेथें आंतरात्माहि विकसित होऊं शकणार नाहीं.

**अशोक**—पण दैहिक बल आणि राष्ट्रनैतिक बळ यांमध्यें खऱ्या शक्तीचें मूळ आहे हें मला कबूल नाहीं. मुळांत पाहिजे आंतरात्म्याचें बळ. हें बळ ज्याला आहे त्याचा प्राण व देह यांमध्यें नवशक्ति दिसून येतें. धर्मबळानें देह व प्राण यांमध्यें किती सामर्थ्य येतें याचें प्रत्यंतर तुला आलेलें नाहीं कां ? तुझ्यासमोर सबंध बौद्धयुग उभें आहे. याच युगांत भारतानें ज्ञान, कर्म, शिल्प, वाणिज्य याबाबतींत किती जिवंतपणा दाखविला होता, त्याचें चिह्न आजहि शाबूत असलेलें दिसतें; याच युगांतील शिक्षण व मार्गदर्शन, आधुनिक मानवाला किती मोठ्या प्रमाणांत स्फूर्ति देत आहे हें पाहण्यास फार दूर जावयास नको. म्हणूनच आजची भारताची पराधीनता, अनैक्य, दैन्यदारिद्र्य, त्यांचीं कारणें दुसरीकडे शोधावयास पाहिजेत. माझें तर म्हणणें असें आहे कीं, धर्म सत्याचा मार्ग चुकला म्हणूनच असें झालें आहे. मीं दिलेल्या आदर्शापासून भारत ज्या दिवसापासून च्युत झाला, त्या

दिवसापासूनच त्याच्या पतनास प्रारंभ झाला. बाह्यपतन हें आंतरिक पतनाचेंच फळ असतें.

**चंद्रगुप्त**––पण तुझ्या नवीन धर्मामुळेंच व तुझ्या आंतरात्म्याच्या नवीन प्रेरणेमुळेंच भारताच्या आंतरिक पतनास प्रारंभ झाला. बौद्ध युगांतील ज्या गोष्टी तूं यश म्हणून दाखवितोस, त्याचें श्रेय बौद्ध धर्माला किती देतां येईल हा मोठा विचाराचाच प्रश्न आहे. तुझ्या धर्माचा आदर्श म्हणजे संन्यास, वैराग्य, निर्वाण––निर्वाणाच्या चर्चेतून नव सृष्टीची निर्मिति झाली, हें कोठलें तर्कशास्त्र? देशानें केलेले नाना प्रयत्न, शिल्प, कला या सर्व सृष्टी तर तुझ्या धर्मास विरुद्ध. तेव्हां तूं म्हणतोस तें खरें नाहीं; भारत त्यावेळींहि जिवंत होता. मी जो देशांत नवप्राण उत्पन्न केला होता, त्याचेंच सामर्थ्य तेव्हांहि शिल्लक होतेंच. जितकें दिवस तें होतें तितकें दिवस भारतानें नवनिर्मिति केली. पण तुझ्या धर्मानें एक नवीन भावतरंग भारतांत आणला, थोडेसे नवीन विषय देशासमोर उभे केले, भारतानें त्यांचा स्वीकार करून ते आत्मसात् करून स्वतःचें आत्माविष्करण केलें एवढेंच. त्याला आणखी प्रमाण हें आहे कीं, हा प्राण जोपर्यंत भारतांत होता, तोपर्यंत भारतानें नवनिर्मिति केली; पण त्यानंतर तुझ्या धर्मानें जेव्हां त्या प्राणास अतिरिक्तपणें प्रभावित केलें तेव्हां भारती-यांना खरेंच वाटूं लागलें कीं, हें जग खोटें आहे, त्याचें अस्तित्वच नाहीं. जीवनाचें सार म्हणजे वैराग्य व निर्वाण––कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः–त्यावेळीं खरोखरीच भारताला कौपीन धारण करून, दीनदरिद्री, अल्पप्राण व दुर्बल व्हावें लागलें. ज्याची जशी श्रद्धा, तसाच तो बनणार. लक्ष्मीला भारतानें जेव्हांपासून तुच्छ लेखून हिडीसफिडीस केलें, त्या-दिवसापासून लक्ष्मीनेंहि भारताला ठोकरलें. कांहीं पूर्वसुकृत होतें म्हणूनच तुझ्या बौद्ध-युगाच्या ऐश्वर्याचा क्षय झाला.

**अशोक**––हें एक नुसतें मत आहे––तें सुद्धां वास्तवाला स्वाभाविक रूपांत न पाहतां विकृतरूपांत पाहून बनविलेलें––गुणाचें श्रेय स्वतःकडे घेऊन दोषाचें माप दुसऱ्याच्या पदरीं टाकण्यासारखें हें आहे. तथागत बुद्धानें जी अंतःप्रेरणा भारतांत जागृत केली होती, त्याची श्रेष्ठ अभिव्यक्ति सर्वस्वत्यागी श्रमणाच्या जीवनांत पहावयास मिळे. परंतु त्याच प्रेरणेनें दुसऱ्या दिशेनें उद्योगाला प्रोत्साहन दिलें, कर्मनिष्ठांच्या कर्मांनां नवीन सांच्यांत घालून नवीन आकार दिला. निर्वाण हेंच अंतिम ध्येय. परंतु ज्या साधनेनें तीं अंतिम सिद्धि प्राप्त होते, तीच साधना आंतरींच्या सर्व प्रकारच्या शुद्ध व श्रेष्ठ प्रेरणांचा विकास करते, तीच अंतिम ध्येयाकडे नेते, जीवनाच्या सर्व बाजूंचा विकासहि त्याच अंतिम ध्येयाच्या प्राप्तीमुळें होतो. निर्वाणाचा अर्थ असा नव्हे कीं, राजानें राज्यपालनाचें कर्तव्य सोडून द्यावें, वैश्यवर्गानें आपले उद्योगधंदे बंद करावे, गृहस्थांनीं गृह-कृत्यें टाकून द्यावीं. असें मुळींच नाहीं. सर्वांनीं आपा-पलीं कर्में करावींतच; पण तीं करतांना, लय लागला असला पाहिजे दूरच्या अंतिम निर्वाण ध्येयाच्या स्वराशीं; आणि शेवटीं कर्म संपल्यावर, सर्व कर्मप्रेरणांचा हळुहळु क्षय झाल्यावर, चरम शांतीमध्यें स्वतःस मिळवून टाकावयास पाहिजे.

**चंद्रगुप्त**––हें तरी निर्वाणासंबंधीं तुझें आपलें एक मतच कीं नाहीं? पण यावरून येवढें मात्र सिद्ध होतें कीं माझेंच रक्त तुझ्या शरीरांत खेळत आहे, भारताच्या ब्राह्मण्यधर्माच्या प्रभावापासून तूं पूर्णपणें मुक्त होऊं शकला नाहींस हेंच खरें. पण तें असूं दे. पण तूं

म्हणतोस तें जर खरें असेल, तर अर्थनीति आणि राज्यनीति या क्षेत्रांत तुझ्या निर्वाणधर्माचा प्रभाव कां दिसला नाहीं? तेथें निर्वाणानें कांहींच नवीन निर्मिलें नाहीं, उलट सर्वकांहीं जें पूर्वी निर्माण झालें होतें, त्याचेंच निर्वाण झालें. तुझ्या प्रभावामुळें भारतीयांनीं जेव्हां अंगावर फक्त मळकें भरडें वस्त्र परिधान केलें, गंधद्रव्यांतून चंदन व कापूर यांनाच फक्त निवडलें तेव्हां भारतांतील उद्योगजीवी समाजांत काय हाहाःकार उडाला त्याची तुला वार्ता आहे कां? किती माणिकमोतीं, किती बहुमोल रेशमी तलम वस्त्रें, किती गंधानुलेपनप्रकार, किती द्रव्यसंभारानें भारत समृद्ध होता, देशविदेशांशीं केवढा वाणिज्यसंबंध होता, त्या सर्वांचाच एका मागून एक लोप होत गेला. सौंदर्यसाधनेच्या अभावामुळें सर्व देश सौंदर्यहीन व शोभाहीन बनला; सर्व वैभव नष्ट झालें. शिवाय राज्यनीतीच्या क्षेत्रांतील शांति आणि सुसंघटितपणा कमी होत चालला, दुष्काळ पडूं लागले, देशांतील खालच्या पातळीवरील–भामटे, चोर, लुटारू यांना ही सुसंधि मिळाली. नजीकच्या राज्यांचे राजे—पश्चिमेस यवन, दक्षिणेस चोल व पांड्य, पूर्वेस वंग यांनीं पुनः युद्धघोषणा करण्यास प्रारंभ केला; पण अंगीं बल नाहीं, आणि फक्त अहिंसा, कारुण्य, मैत्री! आणि म्हणूनच त्यांना लांच देऊन शांत करण्याचे प्रयत्न करावे लागले. भारताच्या आत्यंतिक दुर्भाग्याचा प्रारंभ अशा रीतीनें झाला.

**अशोक**—भोगजीवन हें तर पशुजीवन. मी समाजांत त्याग आणि तपश्चर्या यांचा एक आदर्श प्रस्थापित केला होता. त्यामुळें अनर्थकारी अर्थलाभाचे उद्योग बंद पडले असले, तरी त्याबद्दल मला मुळींच खेद होत नाहीं. ऐश्वर्याविषयींचें आकर्षण हें पारलौकिक अभ्युदयाच्या आड येणारें आहे. भारतभूमि ही भोगभूमि नसून तिला त्यागी, तपस्वी व आत्मसंबुद्ध असा आंतरात्मा आहे हें सत्य सबंध देशांतील लोकांच्या मनांवर बिंबविण्याची आवश्यकता उत्पन्न झाली होती, म्हणूनच शरीरप्रसाधनांचा पसारा सर्व नष्ट झाला, ही गोष्ट तर मंगलकारकच झाली; अमंगलकारक मुळींच नाहीं; आणि जें तूं अराजकासंबंधीं म्हटलेंस ती गोष्ट मी असेपर्यंत तरी मुळींच झाली नाहीं. माझ्यानंतर माझें कार्य पुढें चालविणारा कोणी निघाला नाहीं; नाहींतर ह्या नव-धर्माचा जर आणखी पूर्णपणें प्रसार झाला असता, तर विदेशीयांचेंहि जीवन याच सांच्यांतून काढलें असतें व तुला दिसलें असतें कीं किती शांति व समाधान, किती अध्यात्मनिष्ठ जीवन मनुष्य-समाजांत विकास पावलें असतें!

**चंद्रगुप्त**—हो. मानव समाज तर भिक्षुसमाजच झाला असता—दुर्बल, निर्धन व कुरूप. परंतु तसें पुरतेपणीं झालें नाहीं याला कारण तुझ्या प्रयत्नांत कांहीं कमी पडलें म्हणून नव्हे. तूं असतास तर कदाचित् आणखी कांहीं तरी केलें असतेंस—परंतु खरें पाहिलें तर तशी ती गोष्ट वस्तुतः घडत नाहीं, मनुष्याच्या प्राणभूत सत्याला किती दिवस तूं दाबून टाकूं शकला असतास? स्वातंत्र्यशक्तीला खेळण्याला पूर्ण वाव व ऐश्वर्याची अभिव्यक्ति या गोष्टी मनुष्याच्या जीवनाला पाहिजे असतात. सामाजिक जीवनांत, म्हणूनच, लक्ष्मी व कार्तिकेय यांची प्रतिष्ठापना, वर्धिष्णु आर्थिक सुस्थिति आणि बलसंपन्न साम्राज्य ह्या गोष्टी हव्या असतात.

**अशोक**—म्हणजे समाजव्यवस्थेंत धर्म आणि मोक्ष यांना स्थान नसून केवळ काम व अर्थ म्हणजेच सर्वकांहीं, असेंच ना? सामान्य माणसाला तर काम व अर्थ हेच पाहिजे असतात, त्याला हवा असतो प्राणनिष्ठ वासनांचा खेळ; म्हणूनच सामान्य समाजाची घटना त्याच

प्रकारची झालेली दिसते. तरीपण माणूस हा माणूस आहे. तो ह्या प्राकृत समाजाला मोडून नवीन सांचांत घालून त्याला नवीन आकार देऊं पहात असतो. काम व अर्थ येवढ्यानें तृप्त न होऊन मनुष्य त्याच्या आंतरात्म्याची—धर्म व मोक्ष यांची—जीवनांत अभिव्यक्ति करूं पहात असतो.

**चंद्रगुप्त**—आंतरात्मा, धर्म हे नुसते शब्द आहेत. त्यांचा अर्थ काय? या सर्वांमध्यें प्राणशक्तीच्या खेळाला, वासनेच्या खेळाला, काम व अर्थ यांच्या खेळांला मुळींच वाव नाहीं होय? अंतिम उद्दिष्ट निर्वाण अथवा मोक्ष असलें, तरीसुद्धां धर्म म्हणजे केवळ संन्यास, वैराग्य किंवा तुझी अष्टांगसाधना येवढेंच नव्हे. धर्म ही कांहीं इतकी साधी सोपी वस्तु नाहीं. धर्माचा प्रवाह नाना दिशांनीं वाहणारा व अनेक शाखोपशाखांच्या गुंतागुंतींनीं युक्त असा आहे. आंतरात्म्याचा प्रकाश नाना लहरींचा बनलेला आहे. समाजाचें एकेक अंग एकेका प्रवाह-धारेचा आश्रय घेत असतें आणि सर्व अंगें मिळून सर्वांगीण, पूर्ण व आदर्श धर्माचा आविष्कार करीत असतात. तूंच कबूल केलें आहेस कीं, नाना व्यक्तींची धर्मसाधना नाना प्रकारची असणार. जसा ब्राह्मणांचा एक धर्म, तसा क्षत्रियांचा आणखी एक धर्म, तसाच वैश्यांचा आणि शूद्रांचा एकेक वेगळा धर्म आहे. त्याग व संयम या विषयींची आवड हें एका विशेष वर्गाचें कर्तव्य; ज्यांना समाजाच्या आंतर-संपत्तीला जगवायचें व वाढवायचें, अखंड राखावयाचें आहे त्यांचा हा धर्म झाला; पण समाजाचा देह सुद्धां जगायला, वाढायला व राखावयाला पाहिजे—धन, ऐश्वर्य आणि शक्ती यांच्या बळानें हें साधलें पाहिजे. म्हणूनच आणखी दुसऱ्या वर्गांचीहि आवश्यकता आहे. हे दोन विभाग भिन्नभिन्न दोन प्रकारच्या वृत्तीच्या वर्गांवर सोपविलेले असतात; किंवा हीं दोन्हीं कामें एकच साधक भिन्नभिन्न अवस्थेंत करूं शकतो. कर्तव्यदृष्टीनें, स्वभावदृष्टीनें जर हें वर्ण आणि आश्रमविभाग नसले, तर समाजांत घोंटाळा व अव्यवस्था माजेल व परिणामीं सर्वनाश होईल.

**अशोक**—परंतु हा प्रयत्न म्हणजे दोन संपूर्ण परस्पर विरोधी सत्यांचा समन्वय करण्याचा अशक्य असा प्रयत्न नव्हे कां? भगवान् तथागत बुद्ध हे याच कारणासाठीं ब्राह्मणधर्माविरुद्ध उभे राहिले नव्हते कां? एका बाजूला त्याग व अहिंसा आणि दुसऱ्या बाजूला भोग व हिंसा, ह्या दोन्हींना एकाच समाजाच्या हृदयांत जागा मिळाली, तर समाजाचा भंग होईल, त्याचा विध्वंस होईल, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. दोन विरुद्ध धर्मांचा समन्वय होऊं शकत नाहीं, यांच्यामधून कोणतातरी एकच धर्म निवडला पाहिजे. नाहींतर नुसते मारून मुटकून दोन शत्रूंना एकत्र नांदावयास लावण्याचा प्रयत्न केला, तर त्यामध्यें द्वंद्वाचें बीज राहणारच. आणि शिवाय अशातऱ्हेची भेदबुद्धि वा वैषम्य असेल, तर त्यायोगें समाजांत विनाकारण मतभेद माजतात. शूद्राला वेदाधिकार नाहीं, एका आश्रमांतून दुसऱ्या आश्रमांत अनुक्रमानें न जातां मोक्षप्राप्ति कोणालाच होऊं शकत नाहीं—हीच अन्यायमूलक व अयुक्त समाज-व्यवस्था ही ब्राह्मणसमाजाच्या दुर्बलतेस व अधःपतनास कारण झाली.

**चंद्रगुप्त**—विषमता हा तर प्रकृतीचा नियम आहे—तूं आणि मी ती विषमता निर्माण केलेली नाहीं आणि ती आपल्याला घालविताहि येणार नाहीं. प्रत्येक माणसाचा स्वभाव आहे वेगवेगळा; आणि त्याच स्वभावावर आधारलेला जो स्वधर्म निर्माण होतो, तोच खरा

आणि स्वाभाविक धर्म. सर्वच काहीं निरुपद्रवी सात्विक होऊं शकणार नाहींत, तसेंच सर्वच कांहीं एकदम साधू बनूं शकणार नाहींत. कोणाचें बळ असतें ज्ञानाचें, तर दुसऱ्या कोणाचें असतें शारीरिक. कोणाची प्रतिभा स्थूलवस्तूंच्या प्रयोगानें, संस्पर्शानें जागी होते, तर दुसऱ्या कोणाची प्रतिभा सूक्ष्मवस्तूच्या प्रयोगानें. माणसामाणसांतील ही विषमता कबूल केलीच पाहिजे. विषमता असली म्हणजे तेथें द्वंद्व—संघर्ष—असलेंच पाहिजेत असें मुळींच नाहीं. व्यक्तिगत जीवनामध्यें कधींहि कुठल्याहि अवस्थेंत तो संघर्ष दिसूं शकेल ; पण ती झाली आंतरिक साधनेची बाब. परंतु समाजाच्या, समष्टीगत जीवनांत अशा तऱ्हेच्या द्वंद्वांस—संघर्षांस—स्थान नाहीं. अशातऱ्हेच्या नाना स्वभावांना नाना कार्यक्षेत्रें निर्माण करून देऊन, एका उच्चतर ध्येयास व लक्ष्यास त्यांना सुसंवादी करून ठेवणें हाच तर कोणत्याहि समाजव्यवस्थेचा उद्देश असतो. तुझी अध्यात्मसाधना म्हणजे एक चरम, अंतिम उद्देश्य व लक्ष्य होऊं शकेल; पण अधिकारभेदाप्रमाणें ह्या साधनेच्या नाना पायऱ्या व प्रकार असतात. म्हणून वैश्यशक्ति आणि क्षत्रियशक्ति यांच्या उद्भवाची जरूरी आहे. दुसऱ्या कशासाठीं नसूं दे पण निदान सामूहिक अध्यात्मसाधनेसाठीं तरी त्या दोन शक्तींची गरज आहेच. जो समाज, दैन्याच्या पीडेपासून मुक्त व समृद्ध आहे, अराजकता आणि बंडखोर प्रवृत्ती ऐवजीं जेथें सुव्यवस्था व शांति नांदत आहे—वैश्य व क्षत्रिय शक्तींनीं, जेथें सजीव, सुसंघटित असें विशाल जीवन निर्माण केलें आहे, तेथेंच ज्ञानचर्चा आणि अध्यात्मसाधना शक्य असते. समाजाचें जें अध्यात्माचें शिखर त्याचा पाया, समर्थ अशा वैश्य आणि क्षत्रिय शक्तीच घालत असतात. धर्मजीवनाचा आधिभौतिक पाया तरी निदान राष्ट्रशक्ति घालते.

**अशोक**—हें मला मुळींच मान्य नाहीं. जें राष्ट्र भोगशक्ति आणि बाहुबळ यावर आधारलेलें आहे, उभारलेलें आहे त्या राष्ट्रांतील समाजाच्या प्रत्येक अंगावर त्या भोगवासनेचा आणि आसुरी शक्तीचा छाप असतो. त्यामध्यें एक राष्ट्रीय धर्माची संघटना निर्माण होऊं शकत नाहीं. सर्व राष्ट्राला जर आध्यात्मिक सांच्यांत ओतावयाचें असेल, तर हें काम पायापासूनच सुरू केलें पाहिजे. राष्ट्राला अगदीं नवीन पाया घालून दिला पाहिजे. उच्च-नीच, ब्राह्मण-शूद्र, पुरुष-स्त्री ह्या प्रत्येकांनीं परस्परविरोधी धर्म स्वीकारून चालणार नाहीं. सर्वांनीं एकाच आदर्शानें, एकाच रस्त्यानें, एकाच रीतीनें उठून उभें राहिलें पाहिजे. असें झालें म्हणजे समाजांत एक संघटित स्वरूपाची व अजिंक्य धर्मशक्ति निर्माण होईल.

**चंद्रगुप्त**—अशोक, तूं निरंतरच एकाच चाकोरींतून जाणारा, एकाक्ष माणसासारखा झाला आहेस. एकावेळीं एकाच कल्पनेशिवाय दुसऱ्या कोठल्या कल्पनेला तुझ्या डोक्यांत जागा मिळत नाहीं. जेव्हां तूं योद्धा व सम्राट् होतास, तेव्हां हेंच बाहुबल सर्व बलांत श्रेष्ठ हें तत्त्व तुझ्यासारखें दुसऱ्या कोणालाच आकलन झालें नव्हतें. नंतर तूं एकाएकी जेव्हां साधू झालास तेव्हां, त्याग, करुणा, अहिंसा, मैत्री यांनाच सर्वोच्च मानून त्यांना कवटाळलेंस. पण या दोहींपैकीं कोणतीच दृष्टि मनाचा निकोपपणा दाखवीत नाहीं. शक्ति आणि प्रीति यांचा समन्वय असला पाहिजे आणि होऊं शकतोहि. आदर्श मानव व आदर्श समाज शक्ति व प्रीति या दोहोंना सारखाच वाव देतो. बाहुबल गर्हणीय नाहीं. बाहुबलाचा आत्मबलाशीं विरोध असलाच पाहिजे असें नाहीं. बाहुबलसुद्धां आत्मबलाचीच अभिव्यक्ति

असूं शकते. भारताच्या प्राचीन साधनेनें देह आणि आत्मा, ऐहिक आणि पारलौकिक यांचा समन्वय नेहमींच केलेला आहे. तुझ्या तथागत बुद्धानें एक नवीन तत्त्व आणन ती जुनी साधना मोडून टाकली आणि एका व्यर्थ विरोधाची सृष्टि निर्माण करून ठेवली. त्यांनीं आपल्या साधनेनें एका निराळ्या क्षेत्राची निर्मिति केली व ते त्यांतच संतुष्ट राहिले—तूं मात्र एका क्षेत्रांतील धर्माला दुसऱ्या क्षेत्रांत जबरदस्तीनें घुसवून मठनिवासी संन्याशांची साधना समष्टिगत राष्ट्रीय जीवनावर लादलीस; धर्मसंकर व साधनाविपर्यय केलास.

**अशोक**—परंतु मनुष्याच्या या सामान्य जीवनांतच तें असामान्य जीवन विकसित केलें पाहिजे—कारण त्या जीवनाचें, त्या जगाचें जें सत्य, तेंच खरें सत्य आहे. तें सत्य सामान्य जीवनांत आणणें हेंच तर माझें कर्तव्य होतें. तथागत बुद्धानें मानवाच्या आंतरजीवनाचें जें सत्य दिलें, त्या सत्याला मीं समाजाच्या व राष्ट्राच्या जीवनांत मूर्तरूपांत आणण्याचा प्रयत्न केला.

**चंद्रगुप्त**—अरे, हीच तर तुझी चूक झाली. तुला विसर पडला 'तूं राजा आहेस' याचा. तूं जें काम केलें म्हणतोस, तें राजाचें कर्तव्यकर्म नाहीं. तें कार्य होतें भिक्षु, साधुसंन्यासी व धर्मप्रचारक यांचें. तुला जर तें काम प्रिय होतें, तर मग राजदंडाचा त्याग करून व्यावहारिक जीवनापासून दूर जाऊन तें तूं करावयास पाहिजे होतेंस; बुद्धदेवांनीं तरी स्वतः असेंच केलें. राजसिंहासनावर बसायचें तर राजधर्मच आचरला पाहिजे. राजा म्हणजे क्षात्रशक्तीचें केंद्र—त्यावर ब्राह्मणधर्म लादून तूं विभिन्न कार्यक्षेत्रांची सरभेसळ करून ब्रह्म-घोंटाळा करून सोडलास.

**अशोक**—राजधर्म म्हणचे युद्ध, संघर्ष, भोग व व्यसन येवढेंच कां? देशाचें, समाजाचें नेतृत्व ज्यांकडे आहे, ते ज्या रस्त्यानें चालतील, जो मार्ग दाखवितील त्याचेंच अनुकरण सर्व-सामान्य लोक करणार नाहींत कां? राजा स्वतः जर आसुरीप्रवृत्तीचा असेल, तर प्रजेनें दैवी प्रवृत्तीचें बनावें असें तो कसा सांगूं शकेल?

**चंद्रगुप्त**—सृष्टीचें वैचित्र्य हेंच एक फार मोठें सत्य आहे. आसुराचें सत्य, देवाचें सत्य, ऐहिकाचें सत्य, पारलौकिकाचें सत्य—प्रत्येक मनुष्याचें पृथक् पृथक् सत्य आहे. सर्व सत्यांचा एक गोलंकार न करतां प्रत्येक सत्याचें विकसन व सार्थक्य, साफल्य ज्या सत्यानें होऊं शकतें तेंच पूर्ण सत्य होय.

**अशोक**—दार्शनिक तत्त्व म्हणून हें कदाचित् खरें असेल. परंतु ती म्हणजे प्रकृतीची एक स्वाभाविक लीला आहे—प्रकृतीच्या या लीलेंत मनुष्याचा आदर्श प्रतिष्ठित करण्यांतच मनुष्याचें मनुष्यत्व आहे.

**चंद्रगुप्त**—मानवाचा आदर्श, प्रकृतिधर्माला डावलून, जोरजबरदस्ती करून चालूं शक-णार नाहीं. प्रकृतिधर्माची पूर्ति करणें हीच मानवाच्या जीवनाची सार्थकता.

**अशोक**—प्रकृतीवर विजय मिळविणें हीच मानवाची साधना, त्यांतच प्रकृतीची खरी परिपूर्ति आहे.

लेखक—श्री नलिनीकांत गुप्त
अनुवादक—ज. ना वेलिंगकर

# सर्वांगीण विकासासाठीं

## दैनंदिन जीवनाची आंखणी

श्रीअरविंद आंतरराष्ट्रीय विद्याकेंद्रांत व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची दृष्टि ठेवून सर्वांगपूर्ण शिक्षण देण्याकडे विशेष कटाक्ष आहे. सर्वांगीण शिक्षणांत व्यक्तीच्या अस्तित्वाच्या सर्वांगांना समान महत्त्व असतें; व त्यांचा समसमान विकास होत राहील अशा पद्धतीनें अखिल जीवनाची रचना करण्यांत येते. तशी रचना आवश्यक असते. एका अंगाचा विकास होत असतां, दुसऱ्या अंगांकडे दुर्लक्ष न व्हावें अथवा दुसऱ्या अंगांच्या विकासाच्या मार्गांत अडचण उत्पन्न न व्हावी इकडे सावधानतेनें लक्ष पुरविणें हेंहि आवश्यक असतें. या महत्त्वाच्या गोष्टी ध्यानांत धरूनच नित्यजीवनाची आंखणी करावयास पाहिजे. अन्य कोणत्या विचाराचा पगडा ही आंखणी करतांना असतां कामा नये.

येथें अधिकाधिक संख्येनें विद्यार्थी, शिक्षणार्थ येत असून त्यांच्या सबंध जीवनावरच विशिष्ट दृष्टीनें संस्कार घडविण्याची जबाबदारी आहे. त्याकरितां त्यांच्या नित्यजीवनाच्या आंखणी-करितां कांहीं सूचनात्मक विचार व सामान्य रूपरेखा देणें त्यांना उपयुक्त होईल.

वैयक्तिक दृष्ट्या या बाबतींत मी खालीलप्रमाणें नित्याच्या कार्यक्रमाची आंखणी सुचवेन; अर्थात् प्रत्येकजण आपापल्या भिन्न क्षमतेनुसार व गरजेनुसार त्यांत आवश्यक तेवढा बदल करून घेऊं शकेल. तरीपण मीं सुचविलेला कार्यक्रम पायाभूत कल्पना स्पष्ट करण्यास पुरेसा आहे.

| | |
|---|---|
| शालेय शिक्षण | ५ तास |
| शारीरिक शिक्षण व मनोरंजन | २ तास |
| उपयुक्त व सेवा भावनेनें, पूजन भावानें करावयाचें कर्म | २ तास |
| साहित्यिक व सांस्कृतिक कार्य | २ तास |
| प्रार्थना आणि ध्यान-चिंतन | १५ मिनिटें |
| रात्रींची झोंप (वाढत्या वयांत अत्यावश्यक) | ८ तास |
| दुपारीं भोजनोत्तर विश्रांति (झोंपच पाहिजे असें नाहीं) | १ तास |
| स्नान (दोन वेळ) चार वेळचें खाणें, अन्य दैनिक शौच मुखमार्जनादि विधि; व्यक्तिगत साफसफाई ई० | ३ तास |
| एक काम संपवून दुसरें काम हातीं घेतांना खर्च होणारा मध्यंतरींचा वेळ | ४५ मिनिटें |
| | २४ तास. |

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांना सर्वांगपूर्ण शिक्षण द्यावें असें खरोखरीच मनापासून आपणांस वाटत असेल, तर अशा प्रकारचें कार्यक्रमबद्ध जीवन जगण्याचा अभ्यास त्यांच्याकडून आपण करून घ्यावयास पाहिजे. सर्वांगीण विकास व सर्वांगपूर्ण शिक्षण या उच्च ध्येयाविषयीं पुष्कळ विवेचन करायचे व गोष्टी बोलावयाच्या आणि प्रत्यक्ष

व्यवहारांत मात्र जुनी चाकोरी सोडण्यास खळखळ करावयाची आणि त्याबरोबरच वाढत्या वयांत असलेल्या विद्यार्थ्यांच्या इतर क्षमतेवर व विशेषतः झोंपेवर व विश्रांतिकाळावरहि बौद्धिकशिक्षणाचें अतिक्रमण व्हावयाचें ही गोष्ट केव्हांहि योग्य नाहीं.

अर्थात् कांहींहि असलें तरी सर्वांगपूर्ण जीवनाचें तत्त्व शेवटीं सर्वमान्य झाल्याशिवाय राहणार नाहीं हें निश्चित. त्या सत्यतत्त्वाचा अंगीकार सर्वांकडून होण्याच्या कामीं, नाना क्षेत्रांतील आपलें अज्ञाननिष्ठवर्तन थोडा विलंब लावील वा अडचणी आणील हेंहि कांहीं खोटें नाहीं. मुख्यतः याच कारणासाठीं, एकांगी व कोणत्या तरी एकाच बाजूस अधिक महत्त्व देण्याचे जे प्रयोग चालतात त्यासंबंधीं सावधानता बाळगली पाहिजे असें आम्हांस सांगावयाचें आहे. या प्रगतिशील सत्यतत्त्वाचा स्वीकार करून, त्यानुसार धिटाईनें व मनःपूर्वक वर्तन करण्यास पुढें होणें हाच एक शहाणपणाचा मार्ग आहे असें आम्हांस वाटतें.

ऑगस्ट ५९ च्या बुलेटिन वरून

# साहित्य-सत्कार

**हिंदी विभाग:—**

१ गीता-नवनीत भाग १ व २. किं० प्रत्येकी ३॥, पृष्ठें २४२.

२ सत्यका रहस्य-किं. ४॥, पृष्ठें ३१२.

३ आत्म-समर्पण-योग किं. ७५ न. पै. पृष्ठें ४०.

लेखक:——केशवदेव आचार्य. प्रकाशक-श्रीअरविंद पुस्तकालय रेल्वे रोड, पो. हापूड जि. मेरठ.

**गीतानवनीत (भाग १ ला):—**

लेखक स्वतः श्रीअरविंदप्रणीत योगाचे साधक असून श्रीअरविंद-वाङमयाचा त्यांचा अभ्यास सखोल आहे. श्रीअरविंदांच्या 'एसेज ऑन् दी गीता' या ग्रंथांतील निबंधांचा सारांश, मुळांतील कांहीं कमी होऊं न देतां, आपल्या सोप्या पण प्रभावी हिंदी भाषेंत लेखकानें वाचकांस सादर केला आहे. दैनंदिन जीवनव्यापी साधनेमध्यें मार्गदर्शक दीप या दृष्टीनें हिंदी वाचक वर्गाकडून या ग्रंथाचें यथायोग्य स्वागत होईल अशी आम्हांस खात्री आहे.

**सत्यका रहस्य:—**सत्याच्या दार्शनिक स्वरूपाच्या विवेचनानें प्रारंभ करून, जीवनाच्या विविध क्षेत्रामध्यें त्याचा उपयोग कसा करावयाचा या दृष्टीनें सत्याचें व्यावहारिक स्वरूप, निरनिराळ्या कथांद्वारां लेखकानें विस्तृतपणें समजावून दिलें आहे. अर्थात् विवेचनामध्यें नैतिक दृष्टिकोनावर विशेष भर दिलेला दिसला, तरी कोणत्याहि नीतिशास्त्राला आध्यात्मिकतेचा बळकट पाया असल्याखेरीज तें टिकाऊ ठरणार नाहीं याची जाणीव लेखकास असल्याचें ग्रंथांतील शेवटच्या विभागावरून स्पष्ट होतें.

लेखकाचा प्रयत्न स्तुत्य असून, तरुण पिढीला उच्चतर आदर्शांकडे प्रवृत्त करण्यास या पुस्तकाचें बहुमोल साह्य निश्चित होऊं शकेल.

**आत्म-समर्पण-योग:——**श्रीअरविंदप्रणीत पूर्णयोगाचें पायाभूत तत्त्व जें आत्मसमर्पण, त्याची प्रक्रिया पायरीपायरीनें विशद करून दाखविलेलें हें पुस्तक या योगमार्गांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या साधकांना निःसंशय उपयुक्त आहे.

श्रीअरविंदप्रणीत योगमार्गाच्या अन्य भिन्न अंगांचाहि सुलभ परिचय लेखकानें करून दिला तर त्याचेंहि स्वागत हिंदी वाचकवर्ग निश्चित करील.

**साभारपोंच:——**१) धर्म-निर्णय-मंडळाचा रौप्यमहोत्सवी वृत्तांत. धर्मनिर्णयमंडळ—लोणावळें

२) East and West series—

No. 52 Pilgrims of knowledge,

No. 53 The ancient one (Gita : an outline)

No. 54 Pebbles on the sea-shore

No. 55 Shradhanjali (offerings of the heart)

By T. L. Vaswani—10 Connaught Road, Poona-1.

३) सच्चिदानंद महाराजांचें चरित्र.

४) अणुव्रत (पाक्षिक) -उपासना विशेषांक.

# आश्रम-वृत्त

**शैक्षणिक :—**

बहिःशाल व्याख्यानमालेंत, (Extension Lectures) एल्फिन्स्टन कॉलेज (मुंबई) मधील डॉ. चब् यांनीं "ए रेव्होल्युशन इन फिलॉसॉफी (लॉजिकल पाझिटिव्हिजम)" या विषयावर दोन व्याख्यानें दिलीं व शेवटीं विचारल्या गेलेल्या प्रश्नांना उत्तरें दिलीं.

मद्रास विश्वविद्यालयाचे डॉ० एम वेंकटरामन् यांचीं हायर मॅथेमॅटिक्स वरील व्याख्यानें चालू आहेत.

विश्वभारती विश्वविद्यालयाचे डॉ० शिशिर कुमार घोष यांनीं श्रीअरविंदांच्या "The significance of Indian art" याचा केलेला बंगाली रसाळ अनुवाद २५ आक्टोबर रोजीं वाचून दाखविला.

**शारीरिक-शिक्षण :—**

या तिमाहींत झालेल्या चढाओढींमध्यें मुख्यतः पॅरलल बारस्, रोमन रिंगस्, हॉरिझांटल बारस्, पाम्लेड हॉर्स, लॉंग हॉर्स, अनइव्हन बारस्, फ्री स्टॅंडिंग एक्सरसाइजेस् इ० प्रकार होते. शेवटीं सामुदायिक कवायतींच्या चढाओढी झाल्या. २४ नोव्हेंबरच्या दर्शनदिनीं श्रीमाताजींनीं पारितोषिकें दिलीं.

या चढाओढींसाठीं श्रीमाताजींनीं एक संदेश दिला होता—"मैदानी खेळाच्या सामन्यांच्या वेळीं मी जें तुम्हांला सांगितलें होतें, तेंच याहि चढाओढींना लागू आहे; चढाओढी चालू असतांना, तुमच्या प्रयत्नांना मदत करण्याकरतां व तुमचे सामने आनंदानें पहाण्यासाठीं मी तुम्हां सर्वांबरोबर असेन. माझे आशीर्वाद."

२ डिसेंबर रोजीं शाळेच्या संमेलनप्रसंगीं नेहमींप्रमाणें मोठ्या प्रमाणांत शारीरिक खेळांचा कार्यक्रम झाला.

शारीरिक शिक्षणामध्यें, सर्वांगीण विकास व्हावा व क्रीडानैपुण्य वाढावें म्हणून नवीन वर्षापासून खेळांच्या गटांमध्यें पुनर्रचना व पुनर्विभागणी करण्यांत आली आहे. कांहीं कारणांनीं ज्यांना नियमित गटांमध्यें भाग घेतां येत नसे, त्यांच्यासाठींहि नवीन विभागणीमध्यें सोय करण्यांत आलेली आहे. या पुनर्रचनेचें विशेष उत्साहानें स्वागत होत असल्याचें दिसून येत आहे

**कलाविभाग :—**

लहान मुलांच्या कलांचें अत्यंत प्रेक्षणीय असें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. रंग आणि आत्मप्रकटन यांबद्दल मुलांमध्यें असलेली उपजत आवड कशी विकास पावत जाते हें या प्रदर्शनावरून चांगलेंच प्रत्ययास येत होतें.

**ग्रंथालय :—**

१९५९ या वर्षांत एकूण २८४१ पुस्तकांची भर पडली. उल्लेखनीय ग्रंथ म्हणजे "इस्तवार जेनेरेराल दे सिव्हिलिझासिआं" याचें फ्रान्सहून आलेले सात खंड.

विमानामधून जर्मनीचें विहंगम दृश्य कसें दिसतें ह्याचें वर्णन असलेले तीन सचित्र सुंदर ग्रंथ.

'दि डिव्हाइन कॉमेडी'ची बिब्लिओफिल आवृत्ति (Bibliophile Edition)

ग्रीक स्थापत्य कलेवर विशेष प्रकाश टाकणारा, 'लांद्र ग्रेक' हा विवरणासहित असलेला फोटोसंग्रह.

**मनोरंजन :—**

बंगालचे सुप्रसिद्ध नृत्यकार मणिवर्धन यांनीं आश्रमांतील आपल्या अल्पकाल वास्तव्यामध्यें येथील विद्यार्थ्यांना 'चंडाशोक' हें नृत्य शिकवून त्याचा यशस्वी प्रयोग करून दाखविला. श्री० मणिवर्धन यांनीं स्वतः अशोकाची भूमिका केली होती.

यानंतर लगेचच आलेल्या कलकत्त्याच्या प्राच्यवाणी मंदिरांतील कलावंतांनीं आपल्या तीन दिवसांच्या वास्तव्यांत तीन संस्कृत नाटचप्रयोग केले. "शक्ति-शारदा" (श्रीरामकृष्णांच्या पत्नि) "भारतहृदयारविंद" (श्रीअरविंद) व "महाप्रभू हरिदासम्" (श्रीचैतन्यभक्त मुसलमान वैष्णव). श्री. जतींद्रविमल चौधरी यांनीं लिहिलेल्या या नाटकांचें दिग्दर्शन डॉ० रमा चौधरी यांनी केलें होतें.

३१ आक्टोबर रोजीं कालीपूजा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनीं एक कार्यक्रम आयोजित केला होता. श्रीअरविंदांच्या "आवर आॅफ गॉड" मधील पाठांतरानें सुरुवात होऊन नंतर अनेक पाठांतरें व निरनिराळ्या भाषांतून कालीविषयक गीतांचें गायन झालें. श्रीअरविंदांनीं लिहिलेल्या 'दि मदर' या पुस्तकांतील महाकालीविषयक भागाचें श्रीमाताजींचें ध्वनिमुद्रित वाचन ऐकविण्यांत आलें.

७ नोव्हेंबर रोजीं विद्यार्थ्यांनीं "ध्रुव" हें हिंदी नाटक व १३ डिसेंबर रोजीं "मुकुट" हें टागोरांचें नाटक करून दाखविलें.

शाळेच्या सोळाव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ १ डिसेंबर रोजीं श्रीअरविंदांच्या 'इलियन' (Ilion) मधील कांहीं भागांचें नाटचीकरण करण्यांत आलें. ३ डिसेंबर रोजीं बाहेरील मंडळींसाठीं पुनः प्रयोग करण्यांत आला.

२५ डिसेंबर रोजीं ख्रिसमसचा कार्यक्रम नेहमींप्रमाणें मोठ्या आनंदानें साजरा झाला.

५ जानेवारी रोजीं नृत्य व संगीत विभागातर्फे आश्रमाच्या थिएटरमध्यें नृत्याचा व संगीत-वादनाचा कार्यक्रम मनोरंजक व सुश्राव्य झाला.

**सहली :—**

३ डिसेंबर ते १६ डिसेंबरच्या दरम्यान, आश्रमाची 'लेक प्रॉपर्टी', महाबलीपुरम्, जिंजीचा किल्ला, सातवानूर डॅम इत्यादि ठिकाणीं विद्यार्थ्यांच्या सहली झाल्या.

**संकीर्ण :—**

श्रीअरविंदांच्या महाप्रयाण व महासमाधी दिनानिमित्त दि० ५ व ९ डिसेंबर रोजीं श्रीमाताजींसमवेत ध्यानाचा कार्यक्रम.

आश्रमाच्या "ला फूशायर" या फुलबागांना ५ डिसेंबर रोजीं श्रीमाताजींनीं भेट दिली. फुलांची नयनमनोहर सुरचना करण्यांत आली होती.

आश्रमाच्या औद्योगिक विभागामध्यें ९ डिसेंबर रोजीं श्रीमाताजींच्या हस्तें एक हातकागदाची गिरणी उघडण्यांत आली. खादी व ग्रामोद्योग कमिशननें यासाठीं मदत केलेली आहे.

१ जानेवारी रोजीं सकाळीं श्रीमाताजींनीं नववर्षसंदेश प्रथम फ्रेंचमध्यें व नंतर इंग्रजीमध्यें वाचून दाखविला व नंतर त्यांचे उत्स्फूर्त पेटीवादन (आर्गन वादन) झालें.

**नवीन इंग्रजी प्रकाशनें :—**

1) Evening Talks with Sri Aurobindo—by A. B. Purani
2) Japa—by M. P. Pandit.

## दिव्य-जीवन प्रकाशन

दिव्य-जीवन प्रथम खंड २१ फेब्रुवारी रोजीं प्रसिद्ध झाला आहे हें कळविण्यांस आम्हांस आनंद होत आहे. पूर्वीं कळविल्याप्रमाणें पुणें, नागपूर, नगर व मुंबई या ठिकाणच्या केंद्रांतून पावती दाखवून ग्रंथ नेल्यास टपालखर्च पडणार नाहीं. अन्य ठिकाणच्या ग्राहकांनीं पत्रव्यवहार करावा. सर्व खंडांची मिळून सवलतीची किंमत रु० २५ दुसरा खंड प्रसिद्ध होईपर्यंत चालू राहील. प्रथम-खंडाच्या प्रसिद्धीस अनेक अपरिहार्य कारणांमुळें अत्यंत विलंब लागला याबद्दल दिलगीर आहों.

व्यवस्थापक,
भा.द.लिमये.
संजीवन कार्यालय
श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी

## मराठी प्रकाशनें

१ श्रीअरविंद-दर्शन (वार्षिक मुंबई सर्कल) किं २ रु.
२ योग व त्याचे उद्देश – श्रीअरविंद किं.१२ आणे
३ कारागृहांत श्रीकृष्ण दर्शन (उत्तरपारा भाषण) – श्रीअरविंद किं.४ आणे
४ 'वंदेमातरम्' (लेखसंग्रह) – श्रीअरविंद किं. ४ आणे
५ परम शोध – श्रीमाताजी किं. ६ आणे
६ चार तपस्या व चार मुक्ती – श्रीमाताजी किं. १२ आणे
७ महान् रहस्य (नाटिका) – श्रीमाताजी किं.१ रु.
८ श्रीअरविंदांचा संदेश व आश्रम कि.१२ आणे
९ बाळ गंगाधर टिळक – श्रीअरविंद किं. ८ आणे
१० खेडीं हा स्वराज्याचा पाया (व्याख्यान) – श्रीअरविंद किं. ४ आणे
११ दिव्य जीवन (संकलित वेचें) – श्रीअरविंद किं. २५ न.पै.
१२ सत्यगिरीचें आरोहण (नाटिका) – श्रीमाताजी किं. ५० न.पै.

ट.ख.वेगळा

श्रीअरविंद सर्कल ३९१ सदाशिव पुणे २.
'संजीवन कार्यालय' श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी